साकेत
प्रकाशन

काली जोगीण

नारायण धारप

काळी जोगीण

नारायण धारप

काळी जोगीण
कादंबरी
नारायण धारप

प्रकाशन क्रमांक - 1718

प्रकाशक
साकेत बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
115, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - 431 005,
फोन- (0240)2332692/95.
www.saketpublication.com
info@saketpublication.com

पुणे कार्यालय
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
ऑफिस नं. 02, 'ए' विंग, पहिला मजला,
धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, 373 शनिवार पेठ,
कन्या शाळेसमोर, कागद गल्ली, पुणे -411 030
फोन- (020) 24436692

Table of Contents

प्रकाशकीय
1
2
3
4
5
6
7
8
9
10
11

प्रकाशकीय

नारायण धारप हे नाव आताच्या वाचन करणाऱ्या पिढीला नवीन असलं, तरीही आपल्या रहस्यमय लेखनाने त्यांनी एक काळ गाजवला होता, ही गोष्ट कधीच न विसरण्यासारखी आहे. गेल्या शतकातील साठच्या दशकात त्यांनी लेखनाला सुरुवात केली आणि त्यानंतर अखेरपर्यंत ते सातत्याने लिहीत राहिले आहेत. मराठी साहित्यात रहस्यकथेचे आणि कादंबरीचे दालन समृध्द करणारे जे काही मोजकेच स्वतंत्र लेखन करणारे लेखक आहेत, त्यांत नारायण धारपांचे स्थान अव्वल आहे.

कथानकात पुढे काय होणार याची उत्सुकता कायम ठेवत, वाचकाला आपल्या लेखनात गुंतवून ठेवणे, इतकेच नाही तर त्या वातावरणाचा एक भाग बनविण्याचे कसब ज्या काही लेखकांना साध्य झाले; त्यापैकी नारायण धारप एक आहेत, ही गोष्टही आवर्जून नमूद करण्यासारखी आहे. त्यामुळेच दूरदर्शन आणि इतर प्रसारमाध्यमांची फारशी चलती नव्हती, त्या काळात सामान्य वाचक अतिशय आतुरतेने त्यांच्या लेखनाची वाट पाहत असत. वाचनालयात विशेषत: सर्क्युलेटिंग लायब्ररीजमधून त्यांची पुस्तके वाचायला मिळविण्यासाठी वाचक रांगा लावीत असत, ही गोष्ट त्यांच्या लेखनाची वाचकप्रियता स्पष्ट करण्यास पुरेशी आहे.

माणसाला नेहमीच कोणतेही रहस्य जाणून घेणारी मुळातच उत्कंठा असते. हे समाधान वाचनातून मिळते, तितके दुसऱ्या कोणत्याही माध्यमातून मिळत नसल्यामुळे वाचनाकडे आकर्षित झालेली नवी पिढी रहस्यमय कथा, कादंबऱ्याच्या प्रतीक्षेत आहे. या वाचकांची वाचनाची भूक भागविण्यासाठी नारायण धारप यांचे रहस्यमय साहित्य पुन्हा नव्याने प्रकाशित करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे.

नारायण धारप यांचे रहस्यमय साहित्य चांगल्या आणि दर्जेदार स्वरूपात प्रकाशित केल्यामुळे वाचकांना त्याचा अतिशय योग्य प्रकारे आणि मनासारखा आस्वाद घेता येईल, असे वाटते. नव्या स्वरूपातील या अस्सल मराठी रहस्य साहित्याचे वाचक नक्कीच स्वागत करतील, अशी खात्री आहे.

- प्रकाशक

1

रिक्षा दाराशी थांबून अर्धा मिनिट झालं तरी अच्युत जागचा हलायची चिन्हं दिसेनात. शेवटी नलिनीच खाली उतरली. अवजड ट्रंक तिने कशीतरी फरपटत बाहेर काढली आणि पैसे देण्यासाठी पर्समधलं पाकीट काढलं. पैसे काढता काढता ती अच्युतला म्हणाली,

''अहो ! उतरता ना आता? घर आलंय आपलं.''

पैसे घेताघेता रिक्षावाला तिच्याकडे आणि अच्युतकडे नवलाने पाहत होता. त्याच्या नजरेला नजर द्यायची नलिनीची हिंमत होत नव्हती. प्रवासात सर्व वेळ ती स्वत:ला सांगत आली होती, आता संपत आलं; हा शेवटचाच लाज लावणारा प्रसंग; आता घर येईल आणि हा प्रवास एकदाच संपेल... पण अजूनही संपलं नव्हतं तर ! घराची पायरी चढेपर्यंत शरम तिचा पाठपुरावा करणार होती !

रिकाम्या नजरेने अच्युत तिच्याकडे पाहत होता. रिक्षावाला अधीर झाला होता. सर्रर्र आवाज करीत त्याने मीटर फिरवला. जरुरीपेक्षा जास्त जोराने गाडीचे हँडल मारले. त्यांना कळत नाही का की यांची अवस्था जरा नाजूक आहे? त्यांना जराही सहानुभूती वाटत नाही का? नलिनीच्या मनात रागाने विचार आला. अच्युतवरही तिचा राग होता. वाटले की हात धरून जोराने ओढून बाहेर काढावे त्याला... पण तो रागही क्षणातच विरघळून गेला. रागावून काय फायदा होणार होता? तिची मात्र शोभा झाली असती...

नशिबाने अच्युत रिक्षातून खाली उतरला. तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटत रिक्षावाल्याने गर्रकन वळण घेतले आणि फर्रर्रर्र आवाज करीत रिक्षा निघून गेली. ते दोघे रस्त्यावर एकटेच राहिले.

''ट्रंक उचला तेवढी-मला पेलत नाही-'' नलिनी म्हणाली. तिची नजर आसपासच्या खिडक्यांवर होती. कोणी पाहते आहे का याचा शोध घेत होती. एखादी खिडकी उघडली असती किंवा एखादा पडदा हलला असता तर ती मनातल्या मनात चुरमडून गेली असती. अजून मन निर्ढावलेले नव्हते...

अच्युत नुसताच उभा होता. तिचे शब्द त्याने ऐकले तरी होते का नाही कोणास ठाऊक. त्याचा खांदा जरासा हलवीत नलिनी म्हणाली.

''अहो ट्रंक घेता ना वर? मी दार उघडते- चला''

आता कोठे तो भानावर आलेला दिसला. त्याची नजर सगळीकडे फिरली आणि मग घराच्या दारावर खिळली. नजरेत ओळख आली.

''आपण कोठे निघालो आहोत?'' तो सावकाश म्हणाला.

''निघालो नाही, वन्संकडे जाऊन परत आलो आहोत-'' तिचा आवाज इच्छा नसतानाही तिखट झाला होता.

''ती ट्रंक उचला आधी.''

आज्ञाधारकपणे अच्युतने ट्रंक उचलली. तिच्या मागोमाग तो पायऱ्या चढून वर आला. दार उघडून नलिनी आत आली. दारे-खिडक्या बंद होती. दुपारच्या उन्हाने घराची एक संपूर्ण बाजू तापली होती. आतली हवा शिळी होती. भट्टीसारखी तापली होती.

सगळीकडे धूळ पसरली होती. शारीरिक आणि मानसिक श्रमाने तिचे डोके अतिशय कलकलत होते. एखादा कप कडक चहा जर मिळाला असता तर....
पण घरात दूधच काय, पाणीसुद्धा नसणार. दातांखाली ओठ गच्च आवळून तिने स्वत:ला आवरले. गच्चीचे दार उघडले. गरम हवेचा झोत आत आला. मग खिडक्या उघडल्या. अच्युत आत आला होता; पण दाराच्या आतच ट्रंक घेऊन उभा होता. त्याच्याकडे पाहताच तिला वाटले मोठ्यांदा किंचाळावे....तिने स्वत:ला आवरले.
''ट्रंक तिथेच ठेवा. कॉट जरा साफ करते तोवर कपडे काढा. मग पडून राहा. मी पाहते चहाचे काही जमते का...'' पाणी आणि दूध जमवायला तिला शेजारची दोन दारे ठोठवावी लागली. पाणी कोमट होते, दुधावरची साय काढलेली होती.
''अगंबाई! नलिनीबाई का! केव्हा आलात? बरं आहे का अच्युतरावांचं?'' परक्यांचे परके प्रश्न. उत्तराचीही फारशी फिकीर नाही. तोंडदेखले हसून ''हं, हं'' करीत नलिनी परत आली.
अंगातल्या कपड्यांनिशीच अच्युत कॉटवर झोपला होता. त्याच्याशी वाद घालायला तिच्यात त्राणच नव्हते. स्टोव्ह पेटवला, त्यावर दूध - पाणी - साखर - चहा सगळेच मिश्रण एकदम ठेवले. त्याला उकळी फुटेपर्यंत उधारीच्याच थोड्याशा कोमट पाण्याने चेहरा धुतला. कुंकू लावण्यासाठी ती आरशासमोर उभी राहिली; पण आरशावर धूळ माखली होती आणि तिचेही डोळे चुरचुरायला लागले होते. थरथरत्या हाताने तिने कुंकवाचा टिळा लावला.
चहा उकळत होता. गाळल्यावर त्याचा रंग फारसा आकर्षक दिसत नव्हता. पण तिकडे न पाहता तिने दोन कप भरले. त्यातला एक अच्युतच्या उशापासच्या टेबला ठेवला. आता येता येता ती त्या म्हणाली,
''चहा ठेवलाय बरं का - तेवढा घ्या.'' तिने चहाबरोबर दोन अॅस्पिरीन घेतल्या आणि मग भिंतीला पाठ लावून डोळे मिटून ती अगदी शांत बसून राहिली.
तीन आठवड्यांपूर्वी ती केवढ्या आशेने वन्संच्याकडे गेली होती ! हवापालट झाला, पथ्यपाणी झाले, चांगल्या डॉक्टरांची ट्रीटमेंट मिळाली, विश्रांती मिळाली की अच्युतमध्ये सुधारणा होईल - लोकांच्या भरवशावर तिनेही मनात आशेचा किल्ला उभा केला होता.
इतकी आपुलकीची माणसं तिच्या साहाय्याला उभी राहिल्यावर तिचा धीर बराचसा परत आला होता.
तिचं एक पत्र जायचा अवकाश - अच्युतची बहीण आणि तिचे यजमान दोघेही दाखल झाले होते. त्यांना दारात पाहूनच नलिनी रडायला लागली होती. अच्युतच्या वर्तनाने मनाचा गोंधळ झाला होता - पण तरीही मनाचा एक कोपरा वन्स आणि त्यांचे यजमान यांचे स्वच्छ सामान आणि उंची, टापटिपीचे कपडे आणि आपल्या घरातला गोंधळ आणि कचरा यांची मनोमन तुलना करीत होता. ती अगदी भांबावून गेली होती. (पूर्वी कितीदा तरी बोलावलं होतं तेव्हा वन्सं आल्या असत्या तर त्यांना आपला मध्यमवर्गाचाच, पण सुखी आणि टापटिपीचा संसार दिसला असता; एक अनाहूत विचार याही क्षणी तिच्या मनात डोकावून गेला-)

‘‘अगं ! अगं ! अगं !’’ वन्सं म्हणाल्या- ‘‘असं काय करतेस? आता आम्ही आलो आहोत ना ! पूस बरं डोळे ! अची कोठे आहे?’’
‘‘आतल्या खोलीत आहेत, झोपलेत-’’
‘‘आताच्या वेळी?’’
‘‘ते सदान्कदा पडूनच असतात-’’ नलिली कसेबसे म्हणाली.
तेवढ्यात शंकरराव दुसरी बॅग घेऊन आत आले. त्यांच्याकडे पाहताना मात्र नलिनीला खरा धीर आला.
‘‘हं ! काय म्हणताहेत अच्युतराव ! कोठे आहेत !’’
आत आहे समजताच बॅग तशीच ठेवून ते सरळ आत गेले होते. त्या दोघी आत येईपर्यंत अच्युतच्या कॉटपाशी त्यांनी एक घडीची खुर्ची ओढलीही होती. त्या दोघी दारापाशीच थांबल्या.
त्यांचे इतके बोलणे झाले होते तरी घरात कोणी परके आल्याची अच्युतला गंधवार्ताही नव्हती. गेले चार दिवस तो जसा कॉटवर वर पाहत पडून राहत होता तसाच आताही पडून राहिला होता. चेहरा ढिला पढला होता, नजर विलक्षण भकास होती.
‘‘ए अच्युत !’’ शंकरराव मोठ्याने म्हणाले. ‘‘इकडे पहा की जरा!’’
अच्युतच्या डोळ्यांची पापणीही लवली नाही. जरा पुढे सरकून शंकररावानी त्याचा खांदा जरासा हलवला.
‘‘अच्युत ! अच्युत ! हे बघ आम्ही आलो आहोत, ही बघ ताई!’’
‘‘इकडे पहा बरं!’’
अच्युतची मान शेवटी त्यांच्याकडे वळली. सर्वसाधारणपणे तो शंकररावांशी अतिशय अदबीने वागायचा; पण आता त्यांच्याकडे तो नुसता पाहत पडून राहिला होता. डोळे लालसर-तापट होते, पण आता ते अगदीच निर्विकार नव्हते. माणसांची आठवण आत, खोल कोठेतरी, जागी व्हायची धडपड करीत होती. पण त्यासाठी त्याला केवढे सायास पडत होते !
‘‘ओळखलंस का मला? ऊठ बरं जरा !’’ शकंरराव म्हणाले.
अच्युत सावकाश सावकाश उठून बसला.
नलिनी आणि ताई आतल्या खोलीत गेल्या. ते स्वयंपाकघर होते. चहासाठी नलिनी कपाने आधण मोजू लागली. ताई भिंतीला टेकून तिथेच खाली बसली. स्टोव्ह पेटताच नलिनीही खाली बसली.
‘‘वहिनी, काय झालं ते तरी सांग ! पत्र अगदीच मोघम होतं-’’
‘‘जे पत्रात लिहीलं तेवढंच सांगण्यासारखं आहे - असेच एका संध्याकाळी ऑफिसातनं परत आले नि कॉटवर पडून राहिले - तेथूनच सुरुवात झाली.’’
त्या क्षणापासून तिच्या आयुष्याचे जणू दोन भाग झाले होते. एक त्या आधीचा, सुखी, समाधानी, आशेचा आणि दुसरा त्यानंतरचा - संभ्रमाचा, शोकाचा, निराशेचा, एखाद्या दु:सह स्वप्नासारखा वाटणारा. अमुक एक केले असते तर हा प्रसंग टळला असता असा विचारही शक्य नव्हता - कारण करता येण्यासारखे काही नव्हतेच. प्रसंगाची सुरुवात तिच्या नजरेआड, दूरवर कोठेतरी झाली होती. तिला जाणवला होता तो अखेरचा

उत्पात....
अच्युत कपड्यांनिशी कॉटवर पडला होता. कधी कधी तो खूप थकून घरी येई तसाच आजही थकला असेल; काही मिनिटातच नेहमीच्या उद्योगाला लागेल अशी तिची कल्पना होती. पण पाच मिनिटे झाली, दहा झाली - त्याच्या हालचालीचा काही आवाज कानावर येईना, तशी ती बाहेर आली -
''का हो ? पडूनसे राहिलात?'' त्याच्याजवळ बसत ती म्हणाली,
''चहा झालाय - येता ना आत?''
तो काही बोलला नाही, हललाही नाही. तिने जरा पुढे होऊन त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले मात्र - त्याची ती भकास नजर पाहताच तिच्या काळजात एकदम धस्स् झाले.
''अहो !'' त्याला हलवीत ती म्हणाली, ''असे काय पडून राहिलात? काही ताप वगैरे चढतोय का?'' तिने त्याच्या हाताला, कपाळाला, गळ्याला हात लावून पाहिला. पण अंग अगदी गार होते. काय करावे ते तिला क्षणभर सुचेनाच. त्याला जरा जोराने हलवीत ती म्हणाली,
''अहो ! मी काय म्हणतेच ते ऐकताहात का? चला न चहाला -'' तिच्या धक्क्याने अच्युत एकदम दचकला होता. क्षणभर त्याने शरीराची पोटाशी जुडी करून घेतली होती आणि मग एक मोठा उसासा सोडून तो उठून बसला होता.
''काय? काय म्हणालीस?''
''चहाला चला म्हणून मघापासून सांगतेय -'' ती उठत म्हणाली. प्रसंगाच्या क्षुल्लकपणाला न साजेशी एक खूप मोठी सुटकेची भावना तिला जाणवत होती. नको बाई काही भलतंसलतं - ती मनाशी म्हणत होती. अच्युत उठला, कपडे बदलून, हात-तोंड धुऊन स्वयंपाकघरात आला.
पण नलिनीची सुटकेची भावना अल्पजीवी ठरली. क्षणभर जरी अच्युतकडे दुर्लक्ष झाले तरी त्याचे चित्त भिरभिरत कोठेतरी जायचे; हातातले काम तो विसरून जायचा, कोठेतरी शून्य नजर लावून बसायचा. नलिनीने त्याला हजार वेळा तरी विचारले -
''तुम्हाला काय होतयं? असे गप्प का बसता ? एवढा कशाचा विचार करता? तुमचे लक्ष जाते तरी कुठे?'' पण त्याने काहीच उत्तर दिले नाही. फारच निकड लावली तर तोच बावरून जाऊन ''काय? काय? कोठे काय? काही नाही... काही नाही...'' म्हणायला लागायचा.
ऑफिसमध्ये जाणे तर शक्यच नव्हते. त्याला तर साधी सिकनोटसुद्धा लिहिता येईना. शेवटी नलिनीच मनाचा हिय्या करून त्याच्या ऑफिसमध्ये गेली. सर्वांच्या नजरा तिला सुयांसारख्या बोचत होत्या. साहेबांच्या खोलीत जाईपर्यंत ती घामाघूम झाली होती. मोडक्या-तोडक्या शब्दात तिने अच्युतची स्थिती वर्णन केली. त्यांना तिच्याबद्दल सहानुभूती होती, पण ऑफिसचे नियम त्यांनाही मोडता येत नव्हते. रजेच्या अर्जाचा फॉर्म त्यांनीच भरून दिला; त्यावर अच्युतची सही आणायला सांगितली. शक्य झाले तर सोबत डॉक्टरांचे सर्टिफिकेटही जोडायला सांगितले. ती त्यांना सगळ्याला ''हो हो -'' म्हणत होती. पण मन या अपरिचित ओझ्याखाली दडपत होते.
ती घरी परत आली. अच्युत तसाच निजून राहिला होता. त्याला तिने दोनतीनदा त्या

कागदावर सही करायला सांगेतली, पण त्याला कशाचा अर्थच समजत नव्हता. एकाएकी तिच्या डोळ्यांना पाणी आले.
डॉक्टरांना घरीच घेऊन यायला हवे. अच्युतला अशा स्थितीत त्यांच्याकडे न्यायची कल्पनाच करवत नव्हती. आपला एकाकी असहायपणा तिला या क्षणी प्रथम तीव्रपणे जाणवला. तिच्या मदतीला कोणी नव्हते. त्या दोघांचे कोणी जवळचे नातेवाईक गावात नव्हते, अच्युतचा कोणी निकटचा मित्रही नव्हता. आसपास शेजारी होते, पण त्यांच्याकडे जायची तिला शरम वाटत होती. मनात विलक्षण संकोच होता.
घरातली सकाळची गाडाभर कामे तशीच पडली होती. अनाहूतपणे उपस्थित झालेल्या या नव्या जबाबदारीतच तिची सगळी धावपळ चालू होती; पण तिच्याशिवाय हे सारे करायला होते तरी कोण ? आल्या प्रसंगाला धीराने तोंड द्यायला हवे, अडचणी काही कायमच्या राहत नाहीत. काही दिवसांत सर्व काही पूर्वीसारखे सुरळीत होईल - ती मनाला धीर द्यायचा खूप प्रयत्न करीत होती - पण कशाचाच उपयोग होत नव्हता. आता डॉक्टरांची भेट, मग त्यानंतर त्यांचे उपचार... आणि समजा, त्यानीही अच्युतमध्ये काही सुधारणा झाली नाही तर... मनासमोर एकाहून एक भयानक चित्रे उभी राहात होती... डोळयातले पाणी काही केल्या थांबत नव्हते...
नलिनी डॉक्टरांकडे गेली. शेजारचे एक वयस्क जी.पी. आजवर कधी चिल्लर थंडी-खोकल्याखेरीज तिला कधी डॉक्टरांकडे जावेच लागले नव्हते. ती गजबजलेली वेटिंग रूम, लोकांचा गराडा, प्रत्येक केस झटपट उरकण्याकडे डॉक्टरांचा उघड दिसणारा कल... अशा या वातावरणात ती अधिकच गांगरली. अच्युतला काय होत आहे हेही तिला धड सांगता येईना. डॉक्टर ताडताड प्रश्न विचारत होते. ताप आहे का? चक्कर आली का? पोट बिघडले आहे का?... ती सगळ्याला नाही नाही म्हणत होती.
‘‘पण ही गर्दी पहा- मला यायचं कसं जमणार?’’ ते शेवटी जरा त्रासिकपणे म्हणाले. पण तिचा रडवेला चेहरा पाहून त्यांची त्यांना जरा शरम वाटली असावी.
‘‘हे पहा पत्ता देऊन ठेवा - दीड - दोनच्या सुमारास डिस्पेन्सरी बंद केली की येऊन पाहतो. आणि दहा रुपये कंपाऊंडरपाशी देऊन ठेवा.’’
‘‘मी पैसे आणले नाहीत हो, तशीच घाईगर्दीने आले आहे.’’
तिच्याकडे पाहून ते रागाने काहीतरी बोलणार होते; पण पुन्हा एकदा तिची नजरानजर होताच त्यांनी ओठावरचे शब्द मागे घेतले.
‘‘च् ! ठीक आहे तर - मी येतो-’’
‘‘मी घरी जाऊन पैसे आणू का आत्ता?’’
‘‘नको-नको- मी येतो आणि प्रत्यक्षच पाहतो.’’
तेव्हा मग घरी परत. अच्युत बाहेरच्या खोलीत एका खुर्चीत बसला होता. हालचाल केली असली तर तेवढीच. तेच ते विस्कटलेले केस, भकास डोळे, अर्थशून्य नजर. त्याने तिच्याकडे पाहिलेही नाही, तिला काही विचारलेही नाही. डॉक्टर पाहतील, काहीतरी उपाय सुचवतील आत्ताच त्याला काही विचारायला नको, असा विचार करीत ती आत गेली.
भात-वरण कसेतरी केले. अच्युतला हात धरून घरात आणले, बोलून बोलून दोन घास

खायला लावले, स्वत: दोन घास कसेतरी घशाखाली ढकलले. त्याला उठवून त्याचे हात धुवायला लावले आणि मग त्याला बाहेर झोपायला जाऊ दिले. मग उरलेली कामे कशीतरी उरकली आणि बाहेर येऊन ती डॉक्टरांची वाट पाहत बसली.
साडेबारापासून दोनपर्यंत ती ताटकळत बसली होती. दारापाशी एखादे वाहन थांबल्याचा भास झाला की ती खिडकीतून डोकावून पाही, परत आपल्या जागी येऊन बसे. दर दोन मिनिटांनी घड्याळाकडे नजर जात होती. एक वाजला, दीड वाजला, दोनचे टोले पडले.
डॉक्टर आले ते घाईगर्दीतच आले. आतल्या खोलीत जाता जाता त्यांची नजर घरातल्या सामानावरून (सवयीनेच) फिरली. अच्युतची तपासणी करायला त्यांना दहा मिनिटेसुद्धा लागली नाहीत. अच्युत तर त्यांच्याकडे पाहतही नव्हता. त्यांच्या प्रश्नांना उत्तरेही देत नव्हता.
ते बाहेर आले. दारापाशीच हातावर स्टेथास्कोप आपटीत उभे राहिले. नलिनी त्यांच्याजवळच धडधडत्या काळजाने उभी होती.
''काल संध्याकाळपासून असे करताहेत, म्हणता नाही का?'' ते शेवटी म्हणाले.
''खरं सांगू का, शारीरिक दोष तर काही दिसत नाही. काही शॉक वगैरे बसला असावा. पण तो प्रांत माझा नाही. तुम्ही त्यातल्याच कोणाकडे तरी न्यायला हवं''
''एखादे नाव सुचवता का? मला यातलं काहीच माहिती नाही.''
''तसं खाजगी जाऊ नका - ते परवडायचे नाही - सरळ सरकारी दवाखान्यातच तपासणी करून घ्या.''
''पण कोणता सरकारी दवाखाना !''
''अहो आपलं मेंटल हॉस्पिटल-''
नलिनी जवळजवळ खालीच बसली.
''अहो, इतक्या घाबरू नका काही ! तिथे मानसिक तपासणीची सोय चांगली आहे आणि काहीही खर्च होत नाही म्हणून ते सांगितलं - हे पहा, एखाद्या मोठ्या माणसाला बोलावून का नाही घेत इथे ! प्रकार सीरियस नसला तरी एखादेवेळी लवकर आटोक्यात यायचाही नाही - आहे ना बोलावण्यासारखं कोणी? मग बोलवा तर... बरं, मी जातो''
''थांबा ना... तुमची फी द्यायची राहिली आहे...''
''नको-नको- असू द्या-'' ते घाईने म्हणाले आणि निघून गेले.
त्याच दुपारी तिने वन्संना पत्र टाकले होते आणि अच्युतकडून रजेच्या अर्जावर कशीतरी सही करून घेऊन तो कागद त्याच्या ऑफिसात नेऊन दिला होता. तिला करता येण्यासारखे सर्व काही तिने केले होते. आता मन एकदम रिकामे झाले होते. आणि त्या रिकाम्या जागेत कोणत्या तरी सांदीकोपऱ्यात भीतीची पाल चुकचुकली होती.
वन्संच्या मुंबईतल्या फ्लॅटवर ती अच्युतबरोबर एकदोनदा गेली होती. तिथला रुबाब आणि ऐश्वर्य पाहून तिचा जीव दबून गेला होता. आता ते दोघे अचानकपणे घरी दाखल होताच आपले कनिष्ठ मध्यमवर्गीय घर आणि त्यांची आलिशान जागा यांची तुलना

मनात अपारेहायेपणे होत होती. तो त्यांचा हेवा मुळीच करत नव्हती- पण-पण वन्सं आपली पोझिशन निदान भावाशी वागताना तरी जरा दूर ठेवू शकत नव्हत्या का? अच्युतने पायपीट करून त्यांचा विवाह जमवला तेव्हा शंकरराव जेमतेम तीनशे रुपये मिळवीत होते. हे पुढचे सोन्याचे दिवस कोणाच्या स्वप्नात होते? अर्थात वन्सं सुरेख होत्या. संपत्तीचा साज त्यांच्या रूपाला शोभत होता हे सगळं खरं - पण एकेकाळी त्या याच भावाला मीठभाकरी करून घालत होत्या ना ! निदान त्याच्याशी तरी त्यांनी असं गर्वाने, तुच्छतेने वागायला नको... तिला त्यांचे वागणे खटकले होते, अच्युतशी यावर बोलताच तिने त्याचा रागही ओढवून घेतला होता.
पण आता तो गप्प होता. शंकरराव त्याला पुन: पुन्हा विचारत होते आणि मध्येच तो एखादा हुंकार देत होता. ती स्वयंपाकघरात बसून वन्संना सगळं सांगत होती. शंकरराव आणि अच्युत या दोघांचा चहा तिने बाहेर नेऊन दिला होता. शंकरराव स्वत:चा रिकामा कप आणि अच्युतचा स्पर्श न केलेला भरलेला कप घेऊन आत आले. नलिनी गडबडून उभी राहिली.
काही बोलतच नाही बुवा हा !'' त्यांचे रक्ताचे नाते असूनही वन्संपेक्षा त्यांचीच काळजी खरी वाटत होती.
''मेंटलमध्ये तपासून घ्या, हिचे डॉक्टर म्हणतात.'' वन्सं म्हणाल्या.
''आता किती वाजलेत?'' शंकररावानी मनगटावरचे घड्याळ पाहिले. ''याचे ऑफिस अजून बंद झाले नसेल ना? मग ती तिथे एकदा जाऊन येतो. त्या दिवशी काही विशेष झालं का याचा तपास करतो - मग आल्यावर पाहू काय करायचं ते...''
शंकरराव गेलेसुद्धा. त्यांच्यापाशी अच्युतच्या ऑफिसचा पत्ता असणार. कारण ते फारच व्यवस्थित होते. आणि ते सरळ साहेबांच्या खोलीत जातील त्यांच्याशी न कचरता, न संकोचता बोलतील... नलिली विचार करीत होती.
शंकरराव गेल्यावर त्या दोघी अच्युतजवळ बसल्या. वन्संच्यासमोर त्याच्याशी बोलायला नलिनी जरा कचरतच होती. पती-पत्नी हे सर्वांत जवळचे नाते. त्यात खरोखर संकोचाचा स्पर्शसुद्धा नको. त्यातून वन्सं म्हणजे काही कोणी परक्या नाहीत- हे सर्व समजत असूनही नलिनीची जीभच रेटत नव्हती. वन्संनाही काही बोलायला सुचत नव्हतेसे दिसले.
''अच्युत ! अची !'' त्यांनी एकदोन क्षीणसर हाका मारल्या आणि मग त्याही गप्प बसल्या. संभाषणातला हा खंड नलिनीला काही केल्या जोडता येईना. वन्संनी एखाददुसऱ्या प्रश्नाने ही कोंडी फोडायचा प्रयत्न केला असता तर ते जमले असते, त्याही गप्प बसल्या होत्या.
सहाच्या सुमारास शंकरराव परत आले. त्यांच्या चेहऱ्यावरून फारशी आशा करायला वाव नव्हता. रुमालाने मान, गळा पुसत ते खुर्चीवर बसले.
''काही तपास लागत नाही बुवा !'' ते शेवटी म्हणाले, ''येता तुझ्या त्या डॉक्टरांनाही भेटून आलो - त्यांचाही अंदाज चालत नाही - अर्थात हा त्यांचा भाग नाही हे तर आहेच म्हणा...''
''मला वाटतं तुम्ही दोघं मुंबईलाच चला आमच्याबरोबर - तिथे डॉक्टरी तपासणीही

चांगली होईल आणि तुलाही जराशी मदत होईल -''
भांबावलेली नलिनी कशालाही तयार होती. शंकररावांनी सगळं ठरवलेलंच दिसत होतं. रात्रीच्या गाडीची चार तिकिटेही रिझर्व्ह केली होती. वन्संचा सल्ला त्यांनी घेतला नाही, नलिनीच्या लक्षात आले किंवा मुंबईहून निघतानाच ते आधीच असे काहीतरी ठरवून आले असतील.
''नलिनी, रात्री दहाला गाडी आहे. तेव्हा तुझं आवरायला लाग, आत जेवणाबिवणाचं काही नको. स्टेशनवरच घेऊ काहीतरी. आणि हे बघ अशी घाबरून जाऊ नकोस - आधी तपासणी होऊ दे... एकदम काही वेडंवाकडं मनात आणू नकोस... आम्ही आहोत ना मदतीला?''
चोवीस तासांत ती प्रथमच सहानुभूतीचा शब्द ऐकत होती. मनाचा सगळाच गोंधळ झाला आणि खाली बसून ती ओक्साबोक्शी रडायला लागली.
''च् ! च् ! वहिनी ! असं नको गं करूस'' - वन्सं दूरच उभ्या राहून बोलत होत्या.
''ए ! जा बघ बरं ! तिला आवरायला जरा मदत कर !'' शंकरराव म्हणाले.
नलिनीच्या कानालाही तो आवाज नेहमीपेक्षा जरा जास्त तिखट वाटला. वन्संना कामाला लावायचं? त्या एका विचारानेच ती भानावर आली. डोळे पुसून घर आवारायला लागली. पॅकिंगचा तिला अनुभव नव्हता. नाही नाही त्या वस्तू ती बॅगेत भरत होती. अच्युत त्याच्या बहिणीकडेच जातो आहे - तेथे कशाची उणीव भासणार नाही, हे काही तिला सुचले नाही.
अच्युत बर्थवर पडून राहिला होता. नलिनी त्याच्याच पायथ्याशी एका कोपऱ्यात बसली होती. शंकररावानी तीनचारदा तरी तला वरच्या बर्थवर झोपायला सांगितले होते. मी खाली आहे, त्याच्याकडे लक्ष आहे ते म्हणाले होते; पण हो हो म्हणूनसुद्धा ती जागची हलली नाही. छतातला लहानसा निळसर दिवा जळत होता. काचेला डोळे टेकवून नलिनी बाहेरच्या अंधाऱ्या सृष्टीवर नजर खिळवून बसली होती. काचेत डब्यातले अस्पष्टसे प्रतिबिंब दिसत होते, पण त्या प्रतिबिंबावर बाहेरची सरकणारी, अज्ञात ठिणग्यांनी फुललेली, भयानक काळी रात्र आक्रमण करीत होती. तिला वाटले, आपल्या आयुष्याचीही या क्षणी हीच गत झालेली आहे. रोजचे सरावाचे जीवन एकदम धूसर, काचेवरच्या प्रतिबिंबासारखे भ्रामक झाले आहे-पायाखालचा आसरा सरकायला लागला आहे- आणि या रहस्यमय रात्रीसारखेच काहीतरी अज्ञात, निष्ठुर, अगम्य काहीतरी आपल्या आयुष्यावर आक्रमण करीत आहे - आपले लहानसे जग अंधारात बुडून नामशेष होणार आहे. या विचाराने असेल किंवा रात्रीच्या गारव्याने असेल, तिचे सर्व अंग एकदम शहारून उठले...
पहाटे पहाटेस तिला डुलकी लागली असावी. गडबडीने तिला जाग आली तेव्हा गाडी दादरला लागत होती. समयसूचकता दाखवून तिने अच्युतला आधीपासूनच हलवायला सुरुवात केली. तेव्हा कोठे ते सर्वजण वेळेवर खाली उतरू शकले. बाहेरचा प्लॅटफॉर्म आणखीनच गार होता. विचाराने आणि जागरणाने ती विलक्षण थकून गेली होती.
वन्संकडे तिच्या सासूबाई होत्या. नलिनी आता त्यांना प्रथमच पाहत होती. आपण येथे आलेले त्यांना फारसे आवडलेले नाही अशी तिची कल्पना झाली. पण शंकररावांसमोर

बोलायची कोणाचीच हिंमत नव्हती. आल्याआल्या त्यांनी एक खोली त्यांच्या वापरासाठी रिकामी करून दिली. सर्वांपेक्षा तेच तिची खरी अवस्था जाणत होते.
''नलिनी, आता चहा घे आणि जरा वेळ झोप. अगदी चिंता करू नकोस अच्युतची- आता संध्याकाळी मी डॉक्टरांना बोलावून घेतो आणि मग पाहू. तू चांगली विश्रांती घे - नाहीतर तुलाच औषधपाणी करायची वेळ यायची.''
वन्संची दोन लहान मुलं जरा नवलाने या अचानक आलेल्या पाहुण्यांकडे पाहत होती.
''हा मामा बरं का -'' शंकरराव त्यांना सांगत होते. ''आणि ही मामी - पण आता मामाला बरं नाही - तेव्हा मामा-मामींना त्रास द्यायचा नाही बरं का -''
सकाळच्या, कामाच्या वेळी आणि तेही लोकांकडे पाहुणे म्हणून आले असताना झोप काढणे नलिनीच्या कोणत्याच नियमात बसत नव्हते. पाचसात मिनिटे आराम करून घरात कामाला जायचा तिचा विचार होता. शंकरराव म्हणाले होते ते एकाअर्थी खरे होते. तिची बरीचशी काळजी आता कमी झाली होती. तेव्हा ती जरावेळासाठी म्हणून कॉटवर आडवी झाली - पण तिला अगदी गाढ झोप लागली.
तिला जाग आली तेव्हा दुपारचा एक वाजला होता ! शंकरराव कामाला गेले होते. घरात सामसूम होती. वन्संही झोपल्या असाव्यात. अच्युत मात्र शेजारच्या कॉटवर निश्चल पडून होता. त्याच्या खाण्यापिण्याची कोणी चौकशी केली का? तिच्या मनात पहिला विचार आला. ती उठून स्वयंपाकघरात आली. मोलकरीण घासून आणलेली भांडी लावीत होती. नलिनीचा आवाज ऐकताच वन्संही आत आल्या. नलिनी जरा शरमिंदी होऊन म्हणाली,
''वन्स ! मला झोपच लागून गेली - काही ध्यानच राहिलं नाही पहा-''
वास्तविक त्यांनी ते हसण्यावरी न्यायला हवं होतं; पण त्या नुसत्याच ''हं -'' म्हणाल्या आणि मग मोलकरणीकडे वळून जरा त्रासिक आवाजात म्हणाल्या,
''जाई, या दोघांची जेवणं व्हायची आहेत अजून - संध्याकाळी पुन्हा एकदा येशील का भांड्यासाठी?'' आपल्यासमोर ही चर्चा कशाला? नलिनीला वाटत होतं. मोलकरीणही तोऱ्यात ''पाहते बाई जमलं तर -'' म्हणत दार दाणदिशी लावून घेत निघून गेली. नलिनी तशीच गोंधळून तिथे उभी राहिली. वन्संना काय वाटलं कोणास ठाऊक, जरा पुढे येऊन त्यांनी तिला दुपारचे अन्न कोठे ठेवले आहे ते दाखवलं, ताट-वाट्या-भांडी दाखवली.
नलिनी अच्युतला उठवायला गेली. तो झोपला नव्हताच, नुसताच वर पाहत पडून राहिला होता. त्याला जरा हलवताच तिला दिसले की त्याने गादी खराब केली होती. क्रिया नैसर्गिक होती, त्याच्याकडे दोष नव्हता हे सर्व समजत असूनही तिला त्याचा विलक्षण राग आला. आता वन्संना हे सांगायचं तरी कोणत्या तोंडाने? शेवटी सगळी शरम गिळून तिला ते सांगावच लागलं - ''अगंबाई!'' वन्सं म्हणाल्या. ''मग, आधी कसं ध्यानात नाही आलं तुझ्या? एखादा रबराचा शीट तरी घातला असता -''
नलिनी मनातल्या मनात चडफडत होती. तिला कशी कल्पना येणार याची? तिला कधी असल्या प्रकारांचा अनुभव होता का? आणि आली तेव्हा ती किती थकली होती ! या गोष्टींचा विचार करायचं तरी त्राण होतं का मनात ! तिने अच्युतची गादी साफ केली.

त्याला हाताला धरून बाथरूममधे नेले. त्याचे डोळे-तोंड-हात-पाय धुतले, टॉवेलला पुसले, त्याला घरात नेले, दोन घास खायला घातले... पण तिची स्वत:ची अन्नावरची वासना मात्र पार उडून गेली होती... थंडगार पाण्याचा एक ग्लास तेवढा तिने घेतला.
तिला दिलेल्या खोलीत ती बसून होती, अच्युत निजून होता. वन्संकडे कोणी कोणी बायका येत होत्या. त्यांच्या आवाजाची गुणगुण तिच्या कानापर्यंत पोहोचत होती. त्या कंपनीत ती स्वत: अस्वस्थ झाली असती. वन्संनी आपली कोणाशी ओळख करून द्यावी अशीही तिची इच्छा नव्हती. फक्त त्यांच्या सख्ख्या भावाशी त्यांनी जरा आपुलकीने वागावं एवढीच तिची इच्छा होती.
पाचला शंकररावांचा फोन आला. ते डॉक्टरांना घेऊन येत होते. वन्सं लगबगीने तिच्या खोलीत आल्या. तिला त्यांनी कपडे बदलायला, वेणीफणी करायला सांगितले... तिला समजेना... डॉक्टर येत होते ते तिला पहायला की अच्युतला तपासायला? पण ती काहीच बोलली नाही.
शंकरराव आले ते सरळ तिच्या खोलीत आले. ‘‘काय म्हणतोय अच्युत? काही खाल्लं का त्याने?’’ मग तिच्याकडे निरखून पाहत - ‘‘आणि तू? काही झोपबीप घेतलीस की नाही? चेहरा असा का सुकलेला दिसतोय? आता इथे आलीस ना - आता कशाला त्याची एवढी काळजी करतेस?’’
ती त्यांना काय सांगणार कपाळ?
‘‘आणू का डॉक्टरांना इथेच? कोणी परके समजू नकोस बरं का -’’
तरीही डॉक्टर आले तशी ती एका बाजूला उभी राहिली. ते अच्युतची तपासणी करीत होते. त्यांच्या क्रिया, त्यामागचे हेतू आणि त्यांच्या अपेक्षा यातले काहीच तिला कळण्यासारखे नव्हते. शेवटी एक उसासा सोडून त्यांनी आपली उपकरणे बॅगेत भरली. बॅग उचलून ते म्हणाले,
‘‘आपण बाहेर बसू या का?’’ त्यांनी नलिनीचाही त्यांच्या प्रश्नात अंतर्भाव केला होता. एकवार अच्युतकडे पाहून ती बाहेर आली. डॉक्टरांचा चेहरा गंभीर वाटला आणि मन आणखीनच खचले. भविष्याला आणखीनच गडद काळा रंग चढत होता. मनाचा तोल सुटला होता आणि ते दशदिशांना सैरावैरा धावत होते. डॉक्टर तिला उद्देशून बोलत होते, पण तिच्या मनात त्या शब्दांना अर्थच येत नव्हता. मग तिच्या ध्यानात आले की ते आपल्याला प्रश्न विचारीत आहेत. मग मात्र तिला आपले लक्ष संभाषणात आणावेच लागले. त्यांचे प्रश्न असंख्य आणि अनपेक्षित होते. लग्नाला किती दिवस झाले? अच्युतचा स्वभाव कसा होता? त्यांचे मतभेद होत असत का? सौम्य का तीव्र? त्याच्या कामात त्याला आवड होती का? तो कधी निराशा वाटायचा का? दुसरे काही करण्याची इच्छा त्याने कधी बोलून दाखवली होती का? जवळचे मित्र होते का? इतरांच्या घरी जाणेयेणे कितपत होते? लोकांत मिसळायला त्याला आवडायचे का? त्याच्या आवडीनिवडी काय होत्या? मनासारखं राहता येत नाही म्हणून कधी चिडचिड करायचा का?
जणू तिच्या आजवरच्या वैवाहिक आयुष्यावरचा एक एक पापुद्राच ते ओढून दूर करीत होते. तिच्या उत्तरांनी त्यांचे समाधान होत होते का हे कळायलाही मार्ग नव्हता; पण त्यांचे कुतुहल थांबणारच नाही असे वाटत होते. त्यांना खाजगी असे काहीच वाटत

नसावे... ज्या गोष्टींचा विचार करायलाही ती धजली नव्हती अशा विषयांवरही ते प्रश्न विचारीत होते... तिचा चेहरा शरमेने लाल झाला, तिची मान लाजेने खाली गेली... पण त्यांचे प्रश्न संपतच नव्हते. शेवटी तिचीच वाणी अडखळली आणि थांबली.
डॉक्टर शंकररावांशी बोलत होते. तिला त्यांच्या बोलण्याचा अर्थच समजत नव्हता. ''कॅटाटोनिया'', ''डिप्रेसिंव्ह स्टेज'' असले शब्द कानांवरून नुसते जात होते. शंकररावांशी काहीतरी ठरवून ते शेवटी गेले. तिला कोणतेही आश्वासन त्यांनी दिले नही. ते विसरले का त्यांना ती शक्यता वाटत नव्हती...
सुन्न मनाने ती अच्युतच्या खोलीत येऊन बसली होती. काही मिनिटांतच शंकरराव खोलीत आले. त्यांच्या चेहऱ्यावर आशेचे काही चिन्ह दिसते का इकडे ती बारकाईने पाहत होती. आशा-निराशा, भीती-समाधान, सगळे काही आपल्यापर्यंत असे परावर्तित स्वरूपात, द्वितीय हस्ते पोहोचते, तिला वाटत होते. डॉक्टर काय म्हणाले हे शकंररावांना विचारायचाही तिला धीर होत नव्हता.
''नलिनी,'' ते जरा वेळाने म्हणाले, ''डॉक्टरांना अच्युतच्या या आजाराचा नीटसा उलगडा झालेला नाही. त्यांना एकच शंका येत आहे - पण त्यासाठी त्यांना हॉस्पिटलमध्ये नेऊन त्यांची नीट तपासणी व्हायला हवी - मगच काय उपचार करायचे ते ठरवता येईल...''
''तुम्हाला योग्य वाटेल तसे करा -'' खाली पाहत ती पुटपुटली.
''उद्याची अपॉईंटमेंटसुद्धा घेऊन ठेवली आहे मी. उद्या संध्याकाळी आपण जाऊ आणि फारशी चिंता करीत बसू नकोस बरं का -'' ते उठता उठता म्हणाले. अच्युत लवकरच बरा होईल असे मात्र ते म्हणाले नाहीत, ती मनाशी विचार करीत होती. आतापर्यंत दरवेळी ते तिला असा धीर देत आले होते - पण आता मात्र त्यांनी ते शब्द उच्चारले नाहीत - का? त्यांना सुधारणेची आशा नाही का? डॉक्टरांनी त्यांना काही निश्चित सांगितले का? ही हॉस्पिटलमधली तपासणी म्हणजे केवळ आपल्या मनाच्या समाधानासाठी आहे का? अच्युत आहे असाच जन्मभर राहणार आहे का? का त्याच्यात आणखीच काही चमत्कारिक बदल होत जाणार आहेत?
मनात एकदा शंका यायला लागल्या त्या एखाद्या पाणलोटासारख्या आल्या. काही केल्या तिला आपल्या मनाला आवरच घालता येईना. एखाद्या घुमटात आवाज घुमत राहावा तसे ते दुष्ट विचार डोक्यात घुमत होते. आतल्या आत कोंडले गेलेले हे घणाघातासारखे विचार असह्य होत होते. दोन्ही हातांनी तिने आपले डोके घट्ट दाबून धरले; पण अगदी आत उसळलेल्या या कल्लोळापासून काही बचाव नव्हता. या साऱ्यांचा उगम असलेल्या अच्युतकडे ती पाहत होती. राग, प्रेम, सहानुभूती, भीती, अनुकंपा... अनेक भावनांचे मिश्रण तयार होत होते... पण अच्युत मात्र त्या सर्वांपासून संपूर्ण अलिप्त होता... त्याला जणूकाही बाह्यजगाचा स्पर्शच होत नव्हता... आता प्रथमच तिच्या मनात कुतूहल जन्माला आले... तो इतका निश्चलपणे पडून राहतो खरा... पण ही शांतता आतपर्यंत पोहोचत असेल का? का वरवर शांत दिसणाऱ्या सागराच्या पोटात जसा वडवानळ धुमसत असतो तसे त्याच्या अंतर्मनात विचारांचे काहूर माजलेले असेल? या शांत, थंड, निर्विकार पोलादी कवचात सापडलेले त्यांचे मन सुटकेसाठी

प्राणांतेक धडपड करीत असेल? त्याच्या त्या परक्या, अनोळखी, विक्षिप्त जगापर्यंत ती कशी पोहोचू शकेल? कोणत्या उपायांनी ती त्याच्याशी संपर्क साधू शकेल? या प्रश्नाचा आपण प्रथमच विचार करीत आहोत हे तिला जाणवले नाही; पण परिस्थितीच्या ताणाखाली तिच्यात एक सूक्ष्म परिवर्तन होत होते.
संध्याकाळी ती, अच्युत आणि शंकरराव हॉस्पिटलमध्ये जायला निघाले. अच्युतचे कपडे बदलणे, त्याला घराबाहेर काढणे हे एक दिव्यच ठरले. एक वर्षाच्या मुलापेक्षाही त्याची समज कमी होती. नलिनीला आपल्या आवाजात आवश्यक ती करारी धार आणता येत नव्हती. परक्यांच्या नजरांचा दबाव सतत मनावर होता. संकोचाखाली ती दडपून गेल्यासारखी होत होती. अच्युत आणि आपण पती-पत्नी आहोत, त्याच्या भल्यासाठी जे जे आवश्यक ते ते केलेच पाहिजे, इतरांचा विचार करता कामा नये, हे सर्व तिला समजत होते; पण वर्तन मात्र घडत नव्हते. अच्युतच्या मतिहीन वागणुकीचा, निर्बुद्धतेचा तिला या वेळेइतका कधीही संताप आला नव्हता.
हॉस्पिटलमध्ये गेल्यावर सर्व तमाशा पुन्हा एकदा झाला. मजा पाहणाऱ्यांची गर्दी होती, सहानुभूती फारच थोड्यांच्या नजरात होती. अच्युतला आत नेले. त्या खोलीत अनेक अगम्य, जवळजवळ भयप्रदच अशी अनेक उपकरणे होती. तेथले डॉक्टर ओळखीचे नव्हते, त्यांच्या वागणुकीत आणि अच्युतला हाताळण्याच्या पद्धतीत एक निर्विकार परकेपणा होता. तेथे न बसवून नलिनी बाहेरच्या कॉरिडॉरमध्ये येऊन एका बाकावर बसली. तिच्यावरूनच डॉक्टर, नर्सेस आणि रोगी यांची वर्दळ होती. आणि हळूहळू तिच्या लक्षात आले की येथे येणारे किंवा आणले जाणारे पेशंट नेहमीसारखे नाहीत. त्यांच्यातले काही हातवारे करीत स्वत:शी बरळत होते, काहींचे तारवटलेले डोळे आसपासच्या सर्वांवरून फिरत होते, काहींना तर स्ट्रेचरला बांधूनच आणावे लागत होते... अच्युत यांच्या रांगेत जाऊन बसणार आहे का ? मन चिरीत जाणारा विचार समोर आला... तोही यांच्यासारखाच वेडापिसा होणार आहे का? रोजच्या जगाची ओळख हरवून बसणार आहे का? स्वत:च्याच एखाद्या विक्षिप्त, काळोख्या, असंदर्भ, वेदनामय विश्वात कोंडला जाणार आहे का?... तिने डोळे मिटून घेतले.
शंकरराव तिच्याजवळ येऊन उभे राहिले होते. तिने वर मान करताच ते म्हणाले, ‘‘चल, अच्युतला घेऊन जाऊ. त्यांनी तपासणी केली आहे. रिपोर्ट यायला एकदोन दिवस लागतील. मग ट्रीटमेंट काय द्यायची, कशी द्यायची हे सुचवतील. चल आता.’’
तेव्हा मग तो परतीचा प्रवास. आणि घरी येऊन वाट पाहणे. जीव नुसता टांगणीला लागलेला. अच्युतला आजार गंभीर न ठरू दे... हे शब्दसुद्धा आता जिभेला रेटता येत नव्हते... कारण काहीतरी गंभीर प्रकार उपस्थित झाला होता यात आता तिलाही शंका उरली नव्हती. ती अच्युतकडे पाहत होती. वन्संना जमेल तेवढी मदतही करीत होती. पण त्या काही समजुतीचे चार शब्द बोलल्या नाहीत. तिच्याजवळ नाही तर नाही... पण अच्युतकडेही त्या फिरकल्या नाहीत. नलिनी आणि अच्युतचे येणे त्यांना पसंत पडले नव्हते. त्यांचा दोघांचा मुक्काम लांबत चालला तशी त्यांच्या नजरेतील नाराजी जास्त स्पष्ट होऊ लागली होती. नलिनी पाहत होती, सहन करीत होती.
रिपोर्ट चार दिवसांनी आला. त्यांनी आजाराचे निदान काय केले होते हे तिला समजले

नाही. विजेचे शॉक देण्याची ट्रिटमेंट सुचवली होती. आठवड्यातून दोन वेळा. दहा शॉक झाल्यावर पुन्हा एकदा त्यांची तपासणी होणार होती. पण खरा प्रश्न होता अच्युतला तिथे नेण्याचा. शंकररावांचे ऑफिस होते. त्यांना वेळ नव्हता. नलिनीला मुंबईची माहिती नव्हती; असती तरी लोकल आणि बसमधून अच्युतला नेणे केवळ अशक्य होते. उपाय एकच राहिला - टॅक्सी. आणि तीही परतीची ठरवायला हवी. कारण हॉस्पिटलपाशी तरी नलिनी एकटी जाऊन टॅक्सी कोठून आणणार?
जीव ओझ्याखाली चुरमडत असतानाही तिला ते करावेच लागले. टॅक्सीच्या मीटरवरचे रुपयांचे आकडे सरकताना पाहून तिची नुसतीच तळमळ चालली होती. प्रत्येक खेपेस इतका खर्च - अशा दहा खेपा मग पुन्हा तपासणी... हे गणित तिच्या आवाक्यातले होते... हा खर्च आता शंकरराव करीत होते... पण हे कोठपर्यंत चालणार?
त्या संध्याकाळीच ती भीतभीत त्यांच्या खोलीत गेली होती. ती आत जाताच वन्सं एकदम गप्प बसल्या होत्या.
''ये ना ग, ये बस -'' शंकरराव म्हणाले होते. नलिनी अवघडल्यासारखी खुर्चीच्या कडेवर बसली होती. मनाशी ठरवून आणलेले बोलून टाकायची तिला घाई झाली होती. ती खाली पाहतच म्हणाली,
''आज जवळजवळ बारा रुपयांचे बिल झाले. आणि हॉस्पिटलचीही काहीतरी फी असेलच ना !''
''बरे... मग काय?'' शंकरराव साध्या आवाजात म्हणाले.
''आणखी दहा खेपा आहेत... त्यांच्या तपासण्या आहेतच - मी हे आणलं होतं...'' तिने आपली मूठ उघडून पुढे केली. मुठीत घामेजलेली दोन पदरी सोन्याची साखळी होती.
''अगं !'' शंकरराव एकदम उठून तिच्याजवळ आले होते.
''तुम्हाला तरी किती खर्चात टाकायचं? आणि एवढं आपुलकीने करतो तरी कोण?'' नलिनीचा आवाज अस्पष्ट झाला होता.
''ही पैशाचा हिशेब करायची वेळ आहे का?'' ते उसन्या करड्या आवाजात म्हणाले, ''दे ठेवून ते आत. अच्युत बरा झाला की मग पाठवीन सगळं बिल - त्यात माझाही खर्च घालीन -''
''खरंच हे तुमच्यापाशी राहू दे -'' नलिनी अजून वर पाहत नव्हती. ''आता उपयोग नाही करायचा तर मग केव्हा?''
''च् !'' असा आवाज करून शंकरराव पत्नीकडे वळले, ''ए, तू सांग बरं तिला... नाहीतर तूच तिच्या गळ्यात घाल ते...''
पहिल्या दोन खेपात अच्युतमध्ये काहीच फरक पडला नाही. प्रेमाने आणि भीतीने नलिनीची नजर तीक्ष्ण झाली होती. त्याच्यातला एवढासाही फरक तिच्या नजरेतून सुटला नसता; पण फरक नव्हताच. ज्या कोणत्या कवचात त्याची अस्मिता बंदिस्त झाली होती ते अजूनही अभंग होते, बाह्यजगाचे रंग, नाद, गंध, स्पर्श या सर्वांपासून त्याची जाणीव अजूनही संपूर्ण अलिप्त होती.
बदल झाला तो श्वास रुकवणाऱ्या जलदगतीने झाला. त्याला तिसऱ्या खेपेस शॉक देऊन तिने घरी आणला होता. नेहमीसारखीच याही खेपेस तिची दमछाक आणि तारांबळ

झाली होती. दरवेळी तिचा त्याच्यावरचा राग वाढत चालला होता. दोन घोट पाणी पिऊन ती त्याच्या कॉटशेजारी येऊन बसली होती. त्याच्या अनासक्त, निर्विकार चेहऱ्यावर तिची नजर खिळली होती. हा दैवदुर्विलास अजून कोठवर चालणार असा दु:खद विचार मनात भिरभिरत होता.
त्याची निर्लेप नजर मात्र छतावर खिळली होती. वारा पडला की शांत, काचेसारख्या झालेल्या सरोवरासारखी. आणि एका क्षणात ती नजर बदलली. दिव्यातल्या विझून गेलेल्या ज्योती एकदम शिलगाव्यात तसे डोळे एकदम जाणते झाले... डोळ्यांवरची आजवरची अलिप्तपणाची झापड गळून पडली होती यात शंका नव्हती... पण आता त्या डोळ्यांतून जे काही बाहेर डोकावत होते ते नलिनीच्या परिचयाचे नव्हते; उलट तिला जराशी धास्तीच वाटली... कारण त्या डोळ्यात पेटलेली ज्योत स्वच्छ, सुंदर अशी नव्हती... धूसर होती, लालसर - काळवंडलेली होती... क्षणभर तिला जाणीव झाली की अच्युत ज्या एका नव्या जगात स्वत:ला हरवून बसला होता त्या नव्या जगाचीच ही एक झलक होती... जणू त्या दारावरचा पडदा किंचित हलला होता आणि एका थरारक अनुभवाचा तिला ओझरता स्पर्श झाला होता...
त्या एका स्पर्शाने तिला धक्का बसला होता आणि ती निश्चल झाली होती. हे अनावरण भयानक होते, कल्पनेतही आणता येण्यासारखे नव्हते... जणू काही आजवर जगाच्या सीमरेषेवर अच्युत उभा होता... आणि आता एका लहानग्या धक्क्याने तो सीमेपार लोटला गेला होता... हे त्यांनी दिलेले विजेचे शॉक ! तिला माहीत होते की त्यांच्या तुलनेने ती अडाणी होती आणि कोणालाही ती हे पटवून देऊ शकली नसती, स्पष्टही करून सांगू शकली नसती...
पण तिची मनोमन खात्री होती...
ही ट्रीटमेंट बरोबर नाही हे सांगायचे धैर्य तर तिच्यात नव्हतेच; हॉस्पिटलला दिलेली प्रत्येक भेट ही नरकयात्रेसारखी वाटत होती. मनाचा शरमेने चुराडा होत होता, शरीराची संतापाने लाही होत होती. अच्युतमध्ये सुधारणा होण्याऐवजी एक चमत्कारिक बदल मात्र होत होता. नजरेवरची ती धुरकट छाया कायमची स्थिर झाली होती... खरा अच्युत त्याखाली गडप झाला होता; तिला आता त्याची भीती वाटायला लागली होती; कारण आता त्याची तटस्थता संपली होती आणि तो एक वेगळा, जरासा भयानक पवित्रा घेत होता.
वन्संचे वागणे दिवसागणिक असह्य होऊ लागले होते. अच्युत-नलिनीचा मुक्काम आणि त्यांच्यासाठी होणारा खर्च याबद्दलची त्यांची नाराजी आता त्यांच्याही डोळ्यात स्पष्ट झाली होती. त्या नलिनीशी एक शब्द बोलेनाशा झाल्या होत्या. त्यांचेही वैर तिला टोचायला लागले होते. ही दुहेरी कोंडी असह्य होऊन एकदा तिने शंकररावांपाशी आपले मन मोकळे केले. वाघ का वाघोबा ही वेळ केव्हाच मागे गेली होती. स्पष्ट बोलायची वेळ आली होती... ''वन्संना आमचं राहणं पसंत नाही - आणि त्यांच्यातही काही सुधारणा नाही... हे किती दिवस चालणार असं?'' डोळे पुसता पुसता ती बोलत होती. ''त्यापेक्षा मला आमच्या घरी पोहोचवा - काय व्हायचे असेल ते घरीतरी होऊ दे - बाहेर तरी तमाशा नको...''

शंकररावांनी दोनतीनदा तिला सांगायचा प्रयत्न केला; पण त्यांच्याही शब्दात जोर नव्हता. त्यांचा चांगुलपणा त्यांच्यापुरता मर्यादित होता. वन्संवर काही एका मर्यादेपर्यंतच ते अधिकार गाजवू शकत होते. नलिनीला त्यांचा राग आला नाही. त्यांनी केलेले उपकारच इतके होते की त्यांच्या भाराखाली ती दडपून गेली होती.
अच्युतला कसाबसा गाडीत चढवल्यावर ती जेव्हा शंकररावांचा निरोप घ्यायला मागे वळली (वन्सं लांब उभ्या होत्या) तेव्हा त्यांनी एक पाकीट तिच्या हातात दिले होते. ''डॉक्टरांचे रिपोर्ट आहेत त्यात'' ते म्हणाले होते. गाडी सुरू झाल्यावर तिने पाकीट फोडले होते तेव्हा तिला दिसले होते की त्यात डॉक्टरांचे रिपोर्ट होतेच, शिवाय (दहा-दहाच्या) तीस नोटाही होत्या...
अॅस्पिरीनने डोक्यातल्या वेदना खूपच कमी झाल्या होत्या. वारा येत होता तो गरम होता, पण घामेजलेल्या शरीराला ओलावा देत होता. बाहेरच्या खोलीतून काही आवाज येत नव्हता. अच्युत तसाच कॉटवर पडलेला असेल. क्षणभर ती त्याला विसरू शकत होती आणि जरा शांत विचार करू शकत होती. शांत विचार आवश्यक होता - पण तेव्हा तिच्या मनाला आवश्यक तेवढा तोल किंवा प्रगल्भता आली नव्हती. गेल्या तीन आठवड्यांत आपल्यात एक खूपच मोठे स्थित्यंतर झाले आहे याची तिला आता जाणीव झाली. या तीन आठवड्यांत ती खूप नवे शिकली होती. शेवटच्या मोजणीत ती आणि अच्युत यांना एकमेकांखेरीज इतर कोणीही नव्हते. पती-पत्नी हे नाते तिच्या भोळसट समजुतीपेक्षा फारच व्यापक, सर्वसमावेशक होते. पूर्वी मन कच्चे होते आणि भांबावून जाऊन तिने चारी दिशांना अर्थशून्य धावपळ केली होती. अनुभवाच्या कठोर आघातांनी आता मन घडवले होते. एका निर्धाराच्या साच्यात त्याने नवा आकार घेतला होता... आपल्याला काय करायला हवे हे तिने ओळखले होते.
दोनतीन दिवसांत ऐकू न आलेला घुमण्याचा आवाज पुन्हा एकदा कानावर येत होता. विजेचे शॉक थांबले तरी अच्युतमध्ये होत असलेला बदल थांबला नव्हता. जणू सीमारेषेपलीकडे एक उतार होता आणि त्या उतरणीवरून तो घसरत चालला होता... वेग हळूहळू वाढत वाढत तो खाली खालीच चालला होता. डोळ्यात अधूनमधून येणारी तामसी लाली यत्किंचितही कमी झाली नव्हती. कोणत्यातरी भावनेच्या अनावर आवेगाखाली चेहरा विकृत होत होता. त्यातच आता या घुमण्याच्या आवाजाची भर पडली होती. आवाज वर चढलेला नसे, पण अगदी खोलवरून आल्यासारखा वाटे. सुरुवातीस तिने अच्युतला जागे करण्याचा, हलवण्याचा प्रयत्न केला होता - पण त्याचे लालसर तापट डोळे, आवळलेले दात आणि वेडावाकडा चेहरा पाहून भीतीने तिचे रक्तच गोठले होते आणि शहारून ती मागे सरली होती... तो आवाज आता पुन्हा एकदा येत होता
पण वन्संकडची गोष्ट वेगळी होती. तेथे तिच्या मदतीला नसली तरी सोबतीला खूप माणसे होती. आता ती अच्युतबरोबर एकटीच होती. आणि तिला त्याची भीती वाटायला लागली होती. वरवर विसंगत वाटणारी गोष्ट पण खरी. एके काळी तो तिचा सर्वांत जवळचा होता - पण आता त्याच्यात काहीतरी बदल झाला होता... त्याच्या शरीरात काहीतरी नवे, वेगळे, परके आणि भयानक वावरत होते. तेच त्याच्या लालसर

डोळ्यातून कधीकधी डोकावलेले होते... आणि हा घुमण्याचा आवाज त्याचाच होता... तिला या नव्या अच्युतची भीती वाटायला लागली होती; पण तिच्याखेरीज आता होते तरी कोण? तिची इच्छा असो वा नसो, तिलाच पुढे जायला हवे होते, अच्युतला मदत करायला हवी होती... भिंतीजवळून ती उठली खरी, पण पावले कशी रेंगाळत होती...
नलिनी दारापाशी आली आणि थांबली. घुमण्याचा आवाज अजून येतच होता. क्षणभर तिची नजर खोलीवर एकाग्रच होईना. बाहेरच्या झाडांवरचा हिरवट प्रकाश खोलीत पसरला होता. अच्युत कॉटवरच पडलेला होता; पण मघासारखा निश्चल पडलेला नव्हता. शरीराला आळोखेपिळोखे देत होता. ती खोलीत आली, त्याच्या कॉटजवळ येऊन उभी राहिली. त्याचा चेहरा इतका भेसूर दिसत होता की तिला तिकडे पाहवेनाच. तो डोळे घट्ट मिटून घेत होता, पुन्हा खाडकन उघडीत होता - त्याच्यातली जळजळीत नजर साऱ्या खोलीभर भिरभिर फिरत होती. हातांच्या मुठी घट्ट आवळल्या जात होत्या, परत उघडत होत्या आणि कडक बोटे पंज्यासारखी वाकडी होत होती; आसपासचे काहीतरी ओरबाडून काढायची खटपट करीत होती. शरीरही सारखे वेडेवाकडे होत होते आणि तो घुमण्याचा आवाज आवळलेल्या दातातून सारखा निघत होता... हे उघड होते की, अच्युत समोरच्या जगाची ओळख पार विसरला होता आणि स्वत:च्याच कोणत्या तरी विलक्षण आणि भयानक सृष्टीत कैदी झाला होता... कैदीच; कारण त्याला स्वत:लाही तो अनुभव असह्य होत होता...
ती त्याच्यासाठी काय करू शकत होती? कोणत्या उपायाने ती त्याच्यापर्यंत पोहोचू शकत होती? जेव्हा नाद, स्पर्श, दृष्टी, गंध या रोजच्या अनुभूती निरर्थक होतात, तेव्हा एकमेकांचा संपर्क साधला जाणार तरी कसा? या दोन पातळ्या इतक्या भिन्न होत्या...
अॅटॅक जितका अचानक आला होता तितकाच अचानक ओसरला. अच्युत शांत झाला. दमछाक होऊन श्वास धापांनी येत होता, शरीर अजूनही मधूनच शहारत होतं, चेहऱ्यावरून घामाचे ओघळ वाहत होते... पण ते उत्पाताचे केवळ ठसे होते; उत्पाताची लाट त्याच्यावरून पुढे गेली होती... त्याचा चेहरा एकदम निर्विकार झाला होता...
तुम्हाला आता काय झाले होते? त्याला विचारले तर? तिच्या मनात अनाहूतपणे विचार आला. मग तिला आठवले - आजवर त्याला कोणी हा प्रश्न विचारलाच नव्हता; त्याला दिसतात ते भास, होतात ते भ्रम असेच सर्वजण धरून चालले होते; त्याच्यापेक्षा ती अर्थातच जास्त सज्ञान नव्हती - पण त्याच्यापेक्षा ती एकाबाबतीत तरी जास्त खात्रीने बोलू शकली असती - निकट सहवासाने अच्युतच्या भावनांशी कोणापेक्षाही तीच जास्त सहजपणे एकरूप होऊ शकत होती... त्याच्या मनात जर काही आवेगाचा विचार आला तर त्याचा अनुनाद तिच्याच मनात उमटण्याची जास्त शक्यता होती...
पण तिला या खास परिस्थितीचा फायदा करून घेता यायला हवा होता. याचा नेमका अर्थ तिला आता समजला होता. तिच्या हाकेसरशी अच्युत जर नेहमीच्या जगात येऊ शकत नसला तर मग तिलाच त्याच्या त्या असंदर्भाच्या जगात प्रवेश करायला हवा होता... वेड्याला शांत ठेवण्यासाठी घटकाभर त्याचेच म्हणणे सारे खरे असे भासवतात त्यातलाच हा प्रकार; पण त्यापेक्षाही जास्त गंभीर... कारण येथे केवळ शाब्दिक हवाला

देण्याचा प्रश्न नव्हता... त्याचे विश्वास, त्याचे अनुभव या सर्वांशी तिला खऱ्या अर्थाने एकरूप व्हायला हवे होते... तो होता तेथे ती पोहोचू शकली तरच ती त्याच्या नजरेने पाहू शकेल, त्याचे अनुभव घेऊ शकेल, कदाचित त्याला मदतही करू शकेल...
पण धोका ! धोक्याच्या घंटा अनभिज्ञ मनातही खणखणत होत्या. शहाणपणाचा सुरक्षित किनारा सोडून ती त्याच्या त्या वादळी, अनियमित, अकल्पित, विलक्षण विश्वात प्रवेश करणार होती... तिच्यात प्रतिकाराची शक्ती होती का? का त्या प्रवाहाखाली सापडून तीच कोठच्या कोठे वाहवत जाईल? अग्नीचे स्वरूप माहीत नसेल तरीही रानटी जनावरांना त्यांचा धोका समजतोच...
नलिनी खोलीत आली होती; परत जायचा विचार मनात क्षणभर येऊन गेला होता; तो आता तिने पार झटकून टाकला. एक खुर्ची ओढत कॉटपाशी आणली आणि खुर्चीवर ती ठामपणे बसली. अच्युत आता शांत पडला होता. त्याच्याकडे पाहत ती हलकेच म्हणाली,
''अच्युत ! अच्युत ! इकडे पहा ! मी नलिनी आहे...''
तिचे शब्द ऐकल्याची त्याने कोणतीही खूण दिली नाही; पण ती त्याच त्या संथ आवाजात त्याला हाक मारीत राहिली. तेच ते शब्द... मी नलिनी आहे ! इकडे पहा ! पुन: पुन्हा ते ते शब्द... त्याला काय जाणवत असेल? काय दिसत असेल? काय ऐकू येत असेल? कोणते गंध त्याच्यावरून जात असतील? ती मनाशी विचार करीत होती. हे काम वाटते तितके सोपे नाही याची तिला कल्पना होती. गवताच्या गंजीतली सुई शोधून काढणे यापेक्षा जास्त सोपे - कारण वेळ मिळाला तर गवताची काडी आणि काडी पहाता येईल... कारण केव्हातरी त्यांना शेवट होताच... पण येथे शक्यतांची संख्याच अमर्याद होती... त्यांना खरोखरच अंत नव्हता... तिला आशा एकाच आधारावर वाटत होती. त्याचे आणि आपले जे एक भावनिक ऐक्य आहे, परस्परांच्या निकट सहवासाने मनामनात जो एक सहभावनेचा बंध निर्माण झाला आहे त्याचीच मदत होण्यासारखी होती... बाह्यत: जरी अच्युत पुरता नि:संग झालासा वाटत होता तरी मनाच्या खोलवरच्या कोणत्यातरी पातळीवर तिची जाणीव शाबूत असेल... तेथे कोंडला गेलेला खरा अच्युत मदतीसाठी तळमळत असेल... तिच्या आवाहनाला तेथूनच साद मिळण्याची शक्यता होती... तेथे जर तो बंध अजून शाबूत असला तर त्याचाच आधार घेऊन ती या कोलाहलातून सावकाश सावकाश तिच्या अच्युतपर्यंत पोहोचू शकेल...
या जड, अभेद्य आवरणाखाली अच्युत कोंडला गेला आहे, तिची खात्री होती. त्याच्या मदतीला जाणे ती आपले एकमेव कर्तव्य मानीत होती. या मार्गावर काही धोके असतील हा विचार तिच्या मनात क्षणभरही आला नाही. सर्वत्र ती मदतीसाठी गेली होती आणि निराश होऊन परतली होती. काही करणे शक्य असले तर ते तिलाच करावे लागणार होते. कारण आता दुसरे कोणी नव्हतेच... आणि पाण्यात बुडणाराला वाचवायचे असेल तर त्या पाण्यातच बुडी घ्यायला हवी... किनाऱ्या किनाऱ्यावर राहून काय मदत करता येणार ?
''अच्युत ! इकडे पाहा ना ! मी नलिनी आहे !'' ती त्याच त्या संथ आवाजात म्हणत होती. पुनरावृत्ती हे एक महाप्रभावी शस्त्र आहे. त्याच्या आघाताखाली मी मी

म्हणणाऱ्यांचा दम खचतो; विरोध विरघळतो; पापुद्रे सरकायला लागतात, आतला गाभा उघडा पडतो...
''अच्युत ! इकडे पाहा ना ! मी नलिनी आहे ! अच्युत...'' त्याच्यात काही बदल होत होता का? ढिलेपणाने कॉटवर पडलेले हात जरासे हलत होते का? पंजाची बोटे उघडझाप करीत होती का? त्याचा श्वास जरा जोराने यायला लागला होता का? मान स्वत:शीच हलायला लागली होती का? आधी शंका होती, पण मग शंका राहिली नाही. त्या सर्व हालचाली प्रत्यक्षात दिसत होत्या. मान हलता हलता डोळेही सताड उघडले आणि मानेबरोबरच ती नजरही खोलीच्या छतावरून फिरू लागली... नजरेचा आवाका वाढला आणि ती नजर आता नलिनीच्या चेहऱ्यावरून फिरायला लागली... दरवेळी ती नजर शरीरावरून जाताना नलिनीला शरीरावरून एखादा गरम हवेचा झोत गेल्यासारखे वाटत होते... तिच्या आवर्तित आवाहनांचाच परिणाम, हा परिणाम होता का?... तसा असला तर मग त्याचा अर्थ एकच होता... कोणत्या ना कोणत्या तरी अगम्य मार्गाने तिचा त्याच्या मनाशी संपर्क जुळला होता... जणू काही एका तंतूने दोघांची मने जखडली गेली होती... पण-पण... एक महाभयानक विचार मनात आला... हा तंतू, हा बंध, हा पाश, तिने त्याला त्याच्या कर्दमातून बाहेर ओढून काढण्यासाठी योजला होता... पण समजा तिची शक्ती अपुरी पडली तर... तर तीच त्याच्याकडे त्या तंतूवरून खेचली जाईल... जाईल नव्हे, जात होती... आता, याक्षणी, जात होती... गरम झोतासारखी भासणारी त्याची तप्त जळजळीत नजर ही भावविकृतीची पहिली पायरी होती... बाहेरून येणाऱ्या संवेदना अशा विकृत स्वरूपात तिच्यापर्यंत पोहोचणार होत्या... त्याची नजर एखाद्या भट्टीच्या गरम झोतासारखी जाणवली होती... एखादा नाद काटेरी फांदीसारखा शरीराला टोचेल... काहीही शक्य होईल... आणि मग असे हे परस्पर संदेशनाचे संकेत निकामी झाले की बाह्यजगाशी तिचा संबंधच तुटेल... या गैरसमजांचीच एक अभेद्य भिंत तिच्याभोवती उभी राहील आणि ती त्या कैदखान्यात कायमची बंदिवान होऊन पडेल... जसा अच्युत आता झाला होता तसा ! (आपल्याला होत असणाऱ्या प्रसंगाचे इतके तर्कशुद्ध स्पष्टीकरण कसे सुचले हा विचार मात्र तिच्या डोक्यात आला नाही !) मग तिने काय करावे? तिने प्रयत्न पुढे चालू ठेवावेत की माघार घ्यावी? अच्युतचे डोळे अजूनही छतावरून तिच्यावर असे फिरत होते. अजूनही तिला त्या नजरेची आच जाणवत होती. प्रस्थापित झालेला बंध अजूनही शाबूत होता... त्या क्षणी नलिनीने एक असामान्य धैर्याचा निर्णय घेतला. तो एक क्षण तिचे मन मध्यमवर्गीय सुसंस्कृत स्त्रीची तिची भूमिका विसरले होते; आणि पती-पत्नी संबंधाच्या एका अति उच्च पातळीवर गेले होते... अच्युत असेल तर तिच्या जगण्याचा अर्थ होता, तो नसेल तर तर तिचे जीवन काडीमोल होते या सत्याची प्रतिची तिला आली; पुढचे धोके तिला माहीत नव्हते; तिची शक्ती कमी पडण्याची शक्यता होती; पण तिचे प्रयत्न कमी पडणार नव्हते; तिचे मनाधैर्य कधी खचणार नव्हते; त्या क्षणी अच्युतबद्दलच्या अनिवार प्रेमाने तिचे मन अक्षरश: गहिवरून आले, ती त्याच्याकडे वळली आणि त्याला स्पर्श करीत म्हणाली,
''अच्युत ! इकडे पहा ना ! मी नलिनी आहे !''

अच्युतने तिच्याकडे पाहिले...
दारातून एखादा प्रचंड वाऱ्याचा झोत यावा आणि काही क्षण श्वासच घेता न आल्याने जीव कासावीस व्हावा तशी नलिनीची अवस्था झाली. ती नजर साधी नव्हती. ती नजर स्वत:बरोबर एक अनोखे, अपरिचित विश्वच घेऊन आली होती. आणि ती जाणीव रोजच्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक प्रखर होती. लहानसा वातीचा दिवा सर्चलाइटच्या झोतात निस्तेज व्हावा तसं तिचं रोजचं जग या नव्या अनुभूतीपुढे गडप होत होतं. सागरकिनाऱ्यापाशी पाच पावलं पाण्यात जावं आणि खालून वाहणाऱ्या एखाद्या अदृश्य प्रवाहाने पाय खेचून खोल पाण्यात न्यावं असं झालं होतं.
आसपासची खोली अंधारात होती. नाटकातले पडदे फडफडावेत तशा भिंती एखाद्या काळवाऱ्यावर सापडल्यासारख्या फडफडत होत्या. त्या पडद्यांमागे काहीतरी होतं. भयानक होतं. त्याची एक अगदी ओझरती पुसटशी झलक दिसत होती... पण एवढ्यातच या भिंतींची लक्तरं होऊन त्या वाऱ्यावर फडफडत दूर दूर फेकली जातील... आणि मग त्यांच्यामागे काय होतं ते दिसेल... रोजच्या जगाच्या आतलं किंवा मागचं, नेहमी नजरेआड राहणारं एक भयानक सत्य नजरेसमोर येईल... आता ती फारवेळ स्वतंत्र राहणार नव्हती - दिवे एकामागून एक मालवले जावेत तशा तिच्या जाणिवा मालवल्या जात होत्या... गंध गेला, स्पर्श गेला, ध्वनी गेला, आता दृष्टीही जाणार होती... बाह्यजगाचा एकमेव पाश तुटणार होता... पण अगदी शेवटच्या क्षणी (हे तिला माहीत नव्हतं) ती वाचली. खोलीच्या दारावर कोणाच्या तरी दाणदाण थापांचा आवाज येत होता. पाचसात थापा मारल्यावर तो आवाज थांबला असता तर नलिनी परत एकदा त्या प्रवाहाबरोबर खोलवर खेचली गेली असती; पण तो आवाज थांबला तर नाहीच, उलट आणखी जोराने यायला लागला. प्रत्येक थापेबरोबर मनावरचा अंमल उतरत होता, नेहमीचं जग अधिकाधिक स्पष्ट होत होतं. शेवटी तिच्या आसपास तिच्या परिचयाची खोली स्थिर झाली. मग मेंदूचा शरीरावर ताबा आला.
''हो ! हो ! आले !'' ती मोठ्याने म्हणाली आणि दार उघडण्यासाठी उठली - म्हणजे उठायचा प्रयत्न केला. हातापायांत त्राण नव्हतं, खोली तिच्याभोवती गरगर फिरत होती. तिने डोळे घट्ट मिटून घेतले. कॉटचा पाइप हातांनी घट्ट धरला... मग नजरेवरची ती भोवळ गेली. भिंतीचा आधार घेत घेत ती दारापाशी गेली, तिने दार उघडलं.
दाराबाहेर तिशीच्या वयाचा एक अनोळखी तरुण होता. तो जरासा अधीरतेने आणि चिंताग्रस्त चेहऱ्याने दाराकडे पाहत होता.
''अच्युत? अच्युत आहे का घरात?''
''त्यांना बरं नाही आहे... झोपून राहिलेत आत...''
''तुम्ही त्यांच्या मिसेस का? वहिनी, जरा आत येऊ का? तुम्हाला काही सांगायचं आहे.''
नलिनीचा त्यांच्याबद्दल चांगला ग्रह झाला.
''या ना आत...'' मागे सरत ती म्हणाली. तो आत आला.
''मी गोपाळ - गोपाळ उपाध्ये - अच्युत आणि मी एकाच ऑफिसात काम करतो. मी रजेवर होतो. परत रुजू झाल्यावर समजलं अच्युतला बरं नाही... तुम्ही येऊन गेलात.

त्याचे मेहुणे येऊन गेले... आता कसं आहे? मी भेटू का त्याला?''
''त्यांची प्रकृती अजिबात चांगली नाही.'' नलिनी खुर्चीवर बसत म्हणाली,
''ते तुम्हाला ओळखायचे नाहीत. ते कोणालाच ओळखत नाहीत. मलासुद्धा नाही !''
एकाकी तिचा घसा दाटून आला. डोळयांना पाणी आलं. गोपाळच्या चार साध्या सहानुभूतीच्या शब्दांनी मनाचे बांध फोडले होते. गोपाळ जागच्या जागी चुळबूळ करत होता. तो संपूर्ण परका होता. केवळ शब्दांच्या सांत्वनापलीकडे तो काय करणार?
''वहिनी ! मला पाहू दे तरी त्याला ! कदाचित तो मला ओळखेल!''
नलिनीने काही न बोलता आपल्या खोलीकडे बोट केलं. गोपाळ दारातून आत गेला; पण दोन पावलांवरच थबकला. पुढे जायची त्याची हिंमतच झाली नाही. तसा पाठमोराच तो मागे सरत खोलीबाहेर आला, नलिनीसमोरच्या घडीच्या खुर्चीवर बसला.
''हे केव्हा झालं वहिनी?''
''नोव्हेंबर 24'' ती तारीख मेंदूवर जळत्या लेखणीने कोरली होती.
''जरा खुलासेवार सांगता का? प्लीज?''
''सांगण्यासारखं काही नाहीच. त्या दिवशी ऑफिसमधून जे आले ते असेच आले. खाटेवर पडून राहिले. सुरुवातीसुरुवातीला जरातरी समज होती. दहा दहा वेळा सांगितलं म्हणजे कळायचं... पण तेही कमी कमी होत आता तर पारच सपंलं आहे.''
''इलाज तरी काय केले?''
''इथल्या साध्या डॉक्टराला दाखवलं. ते म्हणत होते शरीरात काही बिघाड नाही. मग वन्संच्याकडे मुंबईत नेलं. मेंटल हॉस्पिटलमध्ये मोठ्या डॉक्टरांनी तपासलं. विजेचे शॉक द्यायची ट्रिटमेंट सुरू केली. मला बिचारीला त्यातलं काही समजल नाही... पण वाटलं होतं, यांना शॉकने बरं वाटण्याऐवजी त्यांच्यात बिघाडच होत आहे... आणि खरं सांगू का? ही महागडी ट्रिटमेंट कशी परवडणार आम्हाला? आजच दुपारी परत आलो मुंबईहून.''
आयुष्याचा जो उत्पाती विध्वंस झाला होता त्याचं वर्णन किती थोड्या शब्दांनी होत होतं !
''वहिनी, मला जेव्हा समजलं अच्युतला बरं नाही तेव्हापासून मी रोज इथे चक्कर टाकतो आहे. आता वाटतं रजेवर गेलो नसतो तर बरं झालं असतं, तुम्हाला माझी मदत झाली असती...''
''काय सांगायचं आहे ते स्पष्ट शब्दात सांगा की !''
''वहिनी, अच्युतचा आजार शारीरिक नाही, वैद्यकीय नाही, त्याला कोणत्याही औषधाने व शॉकने गुण यायचा नाही.''
नलिनीला गोपाळच्या शब्दांचा अर्थच समजेना. खरोखरच समजेना. शारीरिक आजार नाही? म्हणजे मानसिक आजार? म्हणजे वेडाचा एखादा प्रकार, पण त्यावरच इतके दिवस आणि इतके खर्चिक उपचार होत होते ना? गोपाळ म्हणत होता तरी काय? गेले दोन आठवडे तिने जिवाचं जे रान केलं होतं ते काय व्यर्थच होतं. का?
''वहिनी, अच्युतला ज्याला आपण नेहमी आजार समजतो तसं काही झालेलंच नाही - त्याचा प्रकार जरा वेगळाच आहे.''

‘‘मला तुमच्या एकाही शब्दाचा अर्थच समजत नाही !’’
‘‘सांगतो, पण सांगायला जरा शरम वाटते...’’

□□□

2

ऑफिसात जेवणाच्या मधल्या सुटीत तो विषय निघाला होता. गप्पांत कोणता विषय कसा येतो ते मागाहून कोणालाच सांगता येत नाही. कधी कोणीतरी रेल्वेत... बसमधे काहीतरी ऐकलेलं असतं; कधी वर्तमानपत्रातली एखादी बातमी असते; कधी एखादा देशी-विदेशी सिनेमा असतो; कधी एखादी कथा-कादंबरी असते. अच्युत, गोपाळ आणि आणखी दोघंतिघं डबा आणत असत. पदार्थांची देवाणघेवाण होई, तशाच गप्पा रंगत. त्या दिवशी जंतरमंतर, करणी, भानामती, चेटूक असा चटकदार विषय आला. अनुभव सगळेच सांगतात; पण त्यातले खरे किती, वाढवून सांगितलेले किती आणि कल्पित किती हे सांगणे महाकठीण आहे.

पाटील का थोरात, गोपाळच्या आता लक्षात नव्हतं... पण त्यांच्यापैकी कोणीतरी एकाने काळ्या जोगिणीची माहिती सांगितली. त्यांचा अनुभवही 'माझ्या अगदी. जवळच्या मित्राने सांगितलं...' याच प्रकारचा होता, पण गोपाळला त्यात जरा वेगळेपणा जाणवत होता. अशा अर्थी की सांगणारा प्रसंग पदरचं काही घालून जास्त रंगवण्याचा प्रयत्न करीत नव्हता; उलट वर्णन अगदी त्रोटक, तुटपुंजं होतं. जणू काही काही गोष्टी चारचौघात, दिवसा उजेडीसुद्धा सांगण्यासारख्या नव्हत्या. त्याने तिचं वर्णन केलं तेही इतकं रोमांचकारी आणि थरारक होतं की नवीनाचा हव्यास असलेल्यांना तिथे जायचा खासच मोह व्हावा.

गोपाळला एका गोष्टीची अजिबात कल्पना नव्हती. अच्युतच्या मनात सावकाश सावकाश बदल होत होता. हा बदल अगदी खोलवर होता. कोणालाही समजणार नव्हता. नोकरीच्या पगाराची कमाल मर्यादा, महागाईची चढती श्रेणी, बचत करताना होणारी ओढाताण, उद्या एक-दोन मुलं झाल्यावर होणारी खर्चातली वाढ, हा सर्व हिशेब मांडल्यानंतर जे चित्र डोळ्यांसमोर उभं राहत होतं ते विशेष समाधानकारक नव्हतं. त्यांच्या आयुष्यात त्यांना कधीही काहीही कमी पडणार नाही, पण साधारण मध्यमवर्गाची त्यांची पातळी ते कधीही ओलांडू शकणार नव्हते.

अच्युत बहिणीचा हेवा करीत होता अशातली मुळीच गोष्ट नव्हती; पण तिच्या आणि आपल्या संसारातली दरी त्याच्या डोळ्यांसमोरच होती. आणि वर्षावर्षाला ती दरी रुंदावतच जाणार हे उघड होतं. अच्युत पूर्ण स्वार्थी होता असंही नाही; नलिनीचे कष्ट त्याला दिसत होते - तिलाही ऐषोरामाचं, स्वास्थ्याचं, समृद्धीचं, संपन्न आयुष्य मिळायला हवं होतं.

अर्थात महत्त्वाकांक्षा हा काही दोष नाही. बदलाची आवड ही सुधारणेची माता आहे. स्वसंतुष्टता अति घातक ठरते. पण साध्य जितकं महत्त्वाचं तितकंच साधनही महत्त्वाचं आहे. महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी कोणी खडतर परिश्रमांची निवड करतो. कोणी नव्या कलाकसबांची निवड करतो, कोणी देशांतर करतो - पण अच्युतने निवडलेला मार्ग वरवर दिसायला सोपा होता; पण तो सोपेपणा फसवा होता.

अच्युत काळ्या जोगिणीच्या भेटीला गेला.

ज्या मित्राने त्या पहिल्या दिवशीच्या गप्पात काळ्या जोगिणीची माहिती सांगितली होती

त्याच्याकडून अच्युतने हळूहळू (त्याला माहीत होता तेवढा) तपशील काढून घेतला. मुख्य म्हणजे त्या मित्राच्या मित्राचं नाव आणि पत्ता. रविवारी सकाळी (घरी काही खरेदीचं किंवा इतर काम नसलं तर) अच्युत दोन अडीच तास भटकायला बाहेर पडत असे. त्यात नवीन काहीच नव्हतं, आणि नलिनीने त्याला हटकलंही नाही. मित्राच्या मित्राचं नाव परांडे होतं.
पत्ता सापडायला थोडी शोधाशोध करावी लागली. कारण त्या भागाची एवढ्यात इतकी विलक्षण वाढ झाली होती की सर्वच नवे होते. तो पत्ता सहकारी सोसायटीत छत्तीसशे फुटांच्या प्लॉटवर बांधलेल्या एकमजली घराचा होता.
अच्युतने घंटा वाजली तेव्हा समोर पस्तीस वर्षांच्या एका स्त्रीने (बहुधा सौ. परांडे) दार उघडलं. तो अनोळखी, परका होता हे सर्व मानूनही तिचं स्वागत त्याला खूपच थंड वाटलं. तिने अच्युतला आत व्हरांड्यात बोलावलं नाही. दारातून विचारलं,
''आपलं काय काम होतं?''
''परांडे आहेत का? असतील तर त्यांना भेटायच होतं.''
''तुम्ही त्यांच्या कंपनीत कामाला आहात का ?''
''नाही, नाही. माझी त्यांची ओळखही नाही.''
''पण काम काय होतं?''
''जरा खाजगीत बोलायचं होतं.''
त्या स्त्रीच्या नजरेत एकाएकी अस्वस्थता, शंका आली.
''जरा काम सांगितलंत तर मी त्यांना विचारून येते - त्याचं काय आहे, मध्ये त्यांची प्रकृती बिघडली होती. आता आताचं जरा सुधारली आहे. पण सांभाळून राहायचा डॉक्टरांनी सल्ला दिला आहे.''
व्हरांड्यात आतल्या खोलीत उघडणारी एक खिडकी होती. खिडकीचा पडदा जरासा हलला. अच्युतला दिसलं की पडद्याच्या फटीतून कोणीतरी बाहेर पाहत आहे. अच्युतला फक्त डोळा आणि चेहऱ्याचा काहीभाग एवढंच दिसत होतं. कोणीतरी हलक्या आवाजात विचारलं,
''कोण आहे, जानकी?''
''कोणीतरी तुमच्याकडे आलेत - पण नाव सांगत नाहीत, काय काम आहे तेही सांगत नाहीत - म्हणतात खाजगीत बोलायचं आहे...''
''मग येऊ देत की त्यांना आत - या हो इकडे !'' शेवटच्या शब्दांवर आवाज चढला होता. जानकीबाई दारातून दूर झाल्या, पण त्या अच्युतकडे मोठ्या रागाने पाहत होत्या. अच्युत व्हरांड्याच्या दारातून आत गेला. खोली बरीचशी अंधारात होती. तिन्ही-चारी खिडक्यांवर गडद रंगाचे पडदे होते.
''या-या- बसा...'' कोपऱ्यातून आवाज आला तिथे दोन्ही खिडक्यांपासून दूर, कोपऱ्यात, एका आरामखुर्चीत परांडे (तेच असणार, अर्थात!) बसले होते. गळ्यापर्यंत शाल होती. त्यांचा चेहराच फक्त दिसत होता तोही जरा कमी प्रकाशात. अच्युतला जाणीव झाली ती एका कृश, उभ्या चेहऱ्याची, आणि चेहऱ्यातल्या मोठ्यामोठ्या डोळ्यांची.

‘‘या दुखण्यापासून डोळ्यांना प्रखर प्रकाश मानवत नाही. म्हणून जरा पडदे ओढून घेतले आहेत.’’ परांडे आता अगदी खालच्या आवाजात बोलत होते.
‘‘काय काम होतं तुमचं?’’
‘‘परांडे, मला तुमच्याकडून एक पत्ता हवा होता. थोरात नावाचे तुमचे एक मित्र माझ्या ऑफिसात आहेत...’’
‘‘थोरात? !’’ त्या उद्गारात नवल होतं, जराशी भीतीही होती.
‘‘मला कोणता पत्ता हवा आहे तुमच्या ध्यानात आलं?’’
‘‘हो आलं.’’ परांड्यानी आता मान वळवली होती. आता तर त्यांचा चेहरा फारच अंधारात गेला.
‘‘अर्थात मी आग्रह करीत नाही, पत्ता द्या अशी विनंती करतो आणि त्या भेटीबद्दल काही सांगता आलं तर आभारी होईन...’’
कोपऱ्यातून खुसखुसल्याचा आवाज येत होता का? कसला आवाज? हसण्याचा? पण या हसण्यात आनंदाचा लवलेशही नव्हता ! या परांड्यांना आजार झाला तरी कोणता होता? परांड्यांनी मान खाली घातली होती - अस्पष्ट अंधारात त्यांचे खांदे खालीवर होताना दिसत होते. परांडे हसत नव्हते - स्वत:शी हुंदके देत होते.
कोणत्या क्षणी तुम्ही नाव ऐकलंत हो ते? कशी ही दुर्बुद्धी सुचली तुम्हाला? तुम्हाला तो पत्ता द्यायची माझी मुळीच इच्छा नाही हो ! पण माझ्यावर असं बंधन आहे - पत्ता विचारायला येईल त्याला तो दिलाच पाहिजे... सांगतो... लक्षात ठेवा जायची वाट...’’
ती वाट गावाबाहेर जाणारी होती. स्मशानाकडे जाणाऱ्या कॉजवेवरून जाऊन मग नदीच्या काठाने फर्लांगभर जायचं होतं. तिथे एक पुरातन भग्न मंदिर होतं, एक जुनी सराई होती. मंदिरामागे एक जुनी पडकी वास्तू होती. तो पत्ता होता. रात्री आठ वाजल्यानंतरच तिथे भेट होण्याची शक्यता होती.
‘‘तुम्ही कोण असाल ते असा -’’ परांडे म्हणत होते, ‘‘पण माझं ऐका - तिथे जाऊ नका ! पश्चात्ताप पावाल ! मला माहीत आहे आता तुम्ही तिथे गेल्याशिवाय राहाणार नाही - निदान काही मागू नका - मागितलंत तरी किंमत कबूल करू नका ! सौदा फार महागात पडतो !’’ प्रत्येक शब्द त्यांना घशातून ओरबाडून काढावा लागत होता.
‘‘अहो, माझी सव्वा वर्षाची एकुलती एक नात गेली हो !’’ मग त्यांनी दोन्ही हातांनी गळा, छाती, पोट आवळायला, चोळायला सुरुवात केली. ते मान जोरजोराने हलवत होते. मोठमोठ्यानं धापा टाकत होते. जानकीबाई पाण्याचा ग्लास घेऊन आल्या. परांड्यांनी पाण्याचे दोन घोट घेतले. ग्लासातलं पाणी डोळ्यांना लावलं. ते जरासे शांत झालेसे दिसले. जानकीबाई अच्युतकडे वळून रागाने म्हणाल्या,
‘‘झालं ना तुमचं बोलणं? आता जितके लवकर जाल तितकं बरं !’’
अच्युतच्या मनातून कितीतरी प्रश्न विचारायचे होते, पण अर्थात ते अशक्य होतं. तो बाहेरच्या दारापाशी पाच सेकंद थांबला.
‘‘जानकीबाई, माझ्यावर विश्वास ठेवा मला यापैकी काहीही माहिती नव्हतं - नाहीतर मी परांड्यांना कधीही त्रास दिला नसता.’’
‘‘सगळे असंच म्हणतात हो !’’ त्या रागाने म्हणाल्या; पण त्यांनी त्यांच्या मागे दरवाजा

दाण्देशी लावला नाही. त्या दारातच उभ्या होत्या. कदाचित त्या गोष्टी त्यांच्या मनात खूप दिवस साचल्या असतील. आणि गोष्ट अशी तुंबून राहिली की कुजते, सडते, विषारी होते; ती केव्हा एकदा बाहेर फेकतो असं माणसाला होतं - कदाचित त्याही अशी एखादी संधी शोधत असतील. त्या भडाभडा बोलल्या एवढं खरं.
''अहो, मला त्यांनी प्रत्यक्षात एका शब्दानेही काही सांगितलं नाही - पण रात्री झोपेत नाही नाही ते बरळत असतात... आता नुसतं आठवलं तरी अंगावर काटा येतो... नको ! नको ! मला नको ! परत घ्या ! परत घ्या ! रडत रडत सारखे हेच म्हणत असतात... कशाने तरी डोक्यावर परिणाम झालाय त्यांच्या... माझी सव्वा वर्षाची नात मध्ये न्यूमोनिया होऊन वारली... आता आम्हाला का त्याचं दु:ख झालं नाही? पण आयुष्य आहे... गोडाबरोबर कडूही घ्यावचं लागतं... पण याच्यासारखं कोणी वेडं का होतं ? कबूल आहे, यांचा नातीवर फार फार जीव होता. पण हे आपले घेऊन बसलेत कुठल्या तरी जोगतीणीने तिचा बळी घेतला ! काही ऐकायला तयार नाहीत ! आम्ही घरची माणसं हा विषय चुकूनसुद्धा काढत नाही - बरं बाहेरच्यांना दारापासनं परत पाठवू म्हणाल तर तेही यांना मान्य नाही ! म्हणतात एक बळी घेतला तेवढा पुरे नाही का झाला? कोण येईल त्याला आत बोलावत जा... दाराची घंटी वाजली की लागलेच खिडकीतून पहायला ! आणि आता दोन दिवस घरात असा धिंगाणा घालतील की आमचे हाल कुत्रा खाणार नाही ! सारखे त्या दोन खिडक्यांमधल्या कोपयाकडे तोंड करून बसलेले असतात... नको ! नको ! आता नाही ! आता पुन्हा नाही ! म्हणत असतात...''
''पण तुम्ही चांगला डॉक्टरी सल्ला का घेत नाही?''
''अहो सगळं झालं ! पाण्यासारखा पैसा खर्च झाला ! सुधारणा तर झाली नाहीच... प्रकृती जास्त बिघडली मात्र ! आधी निपचितपणे पडून असायचे खाटेवर तेच बरं होतं असं वाटायला लागलयं...''
''पण त्यांना झालयं तरी काय? डॉक्टर काय म्हणतात?''
''काहीतरी शॉक बसला म्हणतात... पण शॉकने असं काही झालं म्हणतात तर वर आणखी शॉक कशाला? पण आपण पडलो अडाणी माणसं... त्या शिकल्या-सवरलेल्यांच्यापुढे काय बोलणार?''
''कशाचा शॉक बसला, काही खास झालं का?''
''तसे अगदी घड्याळ्याच्या काट्यावर वागणारे हो ! एकदोनदा रात्रीचे कोठेतरी मित्राबरोबर गेले होते तेवढचं निमित्त झालं... ओळखीचे कोण सांगतात देवऋष्याकडे जा, मांत्रिकाकडे जा, पंचाक्षरी बोलवा... पण कान कसे तिखट आहेत पहा ! नुसती कुजबूज झाली तरी असं काही ओरडायला लागतात की वाटावं कानात बोटचं घालून घ्यावीत ! असं कोणासमोर न्यायचं म्हणजे हातापायांच्या मुसक्या बांधूनच न्यायला हवं - एखाद्या गुरासारखं ! आपल्यासारख्या पांढरपेशांना कसलं जमायला ते ! लोकांच्या नजरांना पुन्हा जन्मात नजर देता येईल का? आणि सांगणाऱ्यांचं काय जातं हो ! उद्या आपलं काही वेडंबिद्र झालं तर त्यांच्यातलं कुणी येणार आहे का भरपाई करून द्यायला !''

जानकीबाई इतक्या हताश झाल्या होत्या !
‘‘गाव सोडून जा म्हणतात - होतं नव्हतं ते या लहानशा घरात ओतलं - डोक्यावर कर्जाचा डोंगर आहे... आता कुठे जायचं सांगा ! आणि पोट कसं भरायचं? भिक्षा मागून?’’ त्या वैतागून बोलत होत्या... त्याचे प्रश्न आणि त्याच्या शंका - सर्व ओठांवरच थिजलं होतं.
परांड्यांची हकीकत (जी काय दिसली होती, समजली होती ती) विचार करायला लावणारी होती यात शंकाच नव्हती. त्यांचे काही काही उद्गार विलक्षण सूचक होते - भयसूचक होते. परांड्याच्या मनात कोणती सुप्त इच्छा होती ते कळायला काहीच मार्ग नव्हता - पण काहीतरी सौदा झाला होता; त्यांच्या नातीचा मृत्यूही झाला होता. जानकीबाई म्हणत होत्या - तो शारीरिक आजाराने झाला. परांडे म्हणत होत त्यांच्या नातीचा बळी गेला ... त्यांच्यापैकी खरं कोणाचं, खोटं कोणाचं? का एकाच नाण्याच्या या दोन बाजू होत्या? शिवाय परांड्यांच्यावर काही काही बंधनं होती. (असं ते म्हणत होते) चौकशीला येईल त्याला तो पत्ता सांगितलाच पाहिजे ... म्हणजे तो प्रकार त्या एका दुर्दैवी मृत्यूने संपला नव्हता तर ! त्यांच्या मस्तकावर ही सततची टांगती तलवार होती ! फार फार मोठी किंमत मोजावी लागते - परांड्यांनी इशारा दिला होता... पण त्यांच्या शब्दावर कितपत विश्वास ठेवायचा? ती भरकटलेल्या मेंदूच्या एखाद्याची निरर्थक बडबडही असू शकेल.
निर्विवाद गोष्टी दोनच होत्या. काळ्या जोगिणीचा पत्ता त्यांनी दिला होता - म्हणजे तिचं अस्तित्व सत्य होतं, ती काही कोणी मनाने, कल्पनेने रचलेली थाप नव्हती; आणि ते मनात काहीतरी हेतू ठेवून तिथे गेले होते... काहीतरी सौदा झाला होता... म्हणजे त्यांना त्यांचा हेतू साध्य होईल असं आश्वासन देण्यात आलं पाहिजे.
जे काही मनात आलं होतं ते करायचं का नाही? पण एकदम काही निर्णय घेण्यापूर्वी त्या जागेला एक भेट द्यायला काय हरकत होती? एक भेट म्हणजे काही समर्पण नाही... सौदा स्वीकारण्याची सक्ती तर नव्हती ना त्याच्यावर? पर्याय असू शकत होते... त्याचं स्वत:चं शरीर, त्यांचा स्वत:चा आत्मा यांची तो बाजी लावू शकत होता... पण इतरांना कोणालाही कसलीही तोशीस लागू देणार नव्हता. नुसती भेट घ्यायला काय हरकत होती? कदाचित त्या परांड्यांनी सौद्याची त्यांची बाजू पुरी केली नसेल... नातीचा मृत्यू हा सौद्याचा भाग नसेलही - सर्वच वाईट समजून चालण्याचं काय कारण होतं?
त्याच्या नकळत त्याच्या मनाने तिकडे जायचा निर्णय घेतला होता ही खरी गोष्ट होती. हे सर्व विचार समर्थनासारखे होते - आपण करणार आहोत ती गोष्ट धोक्याची नाही, चूक नाही हे तो कदाचित स्वत:चं स्वत:लाच पटवून द्यायचा प्रयत्न करीत असेल.
नलिनीला काहीतरी सांगितल्याशिवाय घराबाहेर पडणं शक्यच नव्हतं.
‘‘एका मित्राकडे मधूनमधून रात्रीचं जमायचं ठरवलं आहे.’’ त्याने तिला सांगितलं, ‘‘नदीपलीकडे राहतो - पाचसात जणं आहोत आम्ही... तेव्हा जरासा उशीर झाला तरी काळजी करू नकोस...’’ तो तिला फसवत होता, पण तिच्यात चांगल्यासाठी. तिला जितकं कमी माहीत असेल तितकं चांगलं. या असल्या गोष्टी तिच्यासारखीच्यासाठी नव्हत्याच.

अजून तो अडाणी होता, सरावलेला नव्हता. कोणत्या गोष्टी टाळायच्या, कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यायचं हे त्याला माहीत नव्हतं. अमावास्येची रात्र आहे त्याला माहीत नव्हतं. आजकालच्या सुशिक्षित लोकांचं तिथी, वार, नक्षत्रं, रास, घटिका, मुहूर्त यांच्याकडे लक्ष असतंच कोठे? आणि समजा वर्तमानपत्रातल्या दोन ओळी त्यांनी वाचल्या... त्या त्यांच्यासाठी केवळ निरर्थक अंक - अक्षरांच्या ओळीच राहणार. त्याला जर त्यातली थोडीशीतरी माहिती असती तर त्याने ती रात्र आणि ती वेळ अगदी आवर्जून टाळली असती.
गावाच्या दिव्यांचा प्रकाश कॉजवेपाशी संपत होता. शेवटचा दिवा नदीकडे तोंड करून उभा होता. कॉजवेखालून खळखळत जाणारं पाणी काळं होतं - मधल्याच एखाद्या तरंगावर प्रकाश चमकत होता. नदी पूर्व-पश्चिम वाहत होती - कॉजवेवरून जाताना पश्चिमेकडचा वारा कपडे फडफड उडवत होता, अंगावर बारीक काटा आणत होता.
कॉजवेनंतरची जमीन सरकारी मालकीची होती, म्हणजे बेवारशीच होती. चोरून गुरं चरायला यायची; चोरून झाडं तोडली जायची; काही टपऱ्याही होत्या; चोरून दारू गाळली जायची; आणखीही काही काही गोष्टी नजरेआड, झाडांच्या अंधाऱ्या आडोशाला चालत असतील. त्या अर्धवट रानटी झाडीतून रस्ता जात होता.
तारका प्रकाश अगदी अंधुक होता. रस्त्याची पांढरी पट्टी जेमतेम दिसत होती. रातकिड्यांची कर्णकर्कश किरकिर चाललेली होती. तो अगदी एकटा होता. आसपासच्या परिस्थितीचा मनावर नकळत ताण येत होता. परांडे फर्लांगभरावर जुनं मंदिर आहे म्हणाले होते - त्यांचा अंतराचा अंदाज चुकला होता? का त्याचंच गणित चुकत होतं? तो किती चालला होता? रस्ता तरी बरोबर सांगितला होता का? का ते त्यांच्या वेडात काहीही बरळले होते? असे विचार मनात येत असतानाच एकदम झाडांची शेवटची रांग दूर झाली. घडीव दगडांच्या प्रशस्त आवारात ते जीर्ण मंदिर समोर आलं. देवाचं मंदिर असेलही एकेकाळी, पण आता ती वास्तू भग्न झाली होती. त्यातलं पावित्र्य गेलं होतं; आता तिथे मनाला धीर देण्याची शक्ती नव्हती; आता त्या कललेल्या, कोसळलेल्या, प्रचंड शीलाखंडांच्या राशीत भीती दडलेली होत. आतल्या अरुंद प्रदक्षिणा मार्गावरून, किंवा उंचा घुमटाच्या आवाज घुमवणाऱ्या गाभाऱ्यात अशा आडवेळी पाय टाकायला मन धजलं नसतं. एकेकाळी शोभेसाठी लावलेल्या झाडांचे आता प्रचंड वृक्ष झाले होते. त्यांच्याच मुळांनी दोन दोन वाव जाडीच्या भिंती पायापासून उखडल्या होत्या. आता रातवाऱ्यावर सळसळणारी पानं प्राचीन ऐश्वर्याच्या आठवणी एकमेकांना सांगत होती... तिथे मन उदास होत होतं. त्याने मंदिराला वळसा घातला. छप्पर खचलेली सराई मागे गेली. आणि काही अंतरावर तो पडका वाडा दिसायला लागला.
एके काळी वाड्याच्या चारी बाजूंनी भिंत होती, पण तिचा बहुतेक भाग पडून गेला होता. पडक्या किडक्या दातांसारखे काही विद्रूप खांब उभे होते. पूर्वी कधी काळी भिंतीच्या आत बाग, फुलझाडांचे किंवा भाजीपाल्याचे वाफे असतील. आता सर्वत्र रानगवत आणि तण माजलं होतं. अच्युतच्या पावलागणिक टोळ आणि रातकिडे हवेत उडत होते, त्यांची किर्रर्र सगळ्या दिशांनी येत होती.

त्या पडक्या भिंतीपाशी उभा राहून अच्युत वाड्याकडे किंवा वाड्याच्या अवशेषांकडे पाहत होता. सर्वत्र अंधार होता. प्रकाशाची चीरसुद्धा कुठे दिसत नव्हती. हालचालींचा वा शब्दांचा एवढासाही आवाज येत नव्हता. त्याची कल्पना होती, त्याच्यासारखेच आणखीही दोनचार इच्छुक तिथे जमलेले असतील. सहवासाला चार लोक असले की मनाचा धीर असा ओसरत नाही.
परांड्याच्या शब्दांची पुन्हा शंका यायला लागली होती. तरीही तो मनाची खात्री करून घेतल्याशिवाय परत जाणार नव्हता. त्याने पडक्या भिंतीवरून आवारात प्रवेश केला. रंग उडालेल्या वाड्यांच्या भिंतीजवळ आला. समोरच्या भिंतीत बंद खिडक्यांची ओळच्या ओळ होती. डोळे आता अर्धप्रकाशाला सरावले होते. वाऱ्यापावसाने उन्हाने खिडक्यांची पालं तडकली होती. सर्व खिडक्यांवर लालसर रंगांच्या रेषांनी मोठमोठ्या फुल्या मारलेल्या होत्या. त्या बचावासाठी होत्या का आव्हानासाठी होत्या, याचा उलगडा होत नव्हता. भिंतीला वळसा घालून तो वाड्याच्या दर्शनी बाजूकडे आला. तिन्ही बाजूंनी कमानी असलेलं उघडं पोर्च होतं. समोर दरवाजा होता. एक दार केव्हाच उचकटून पडलं होतं. दुसरं एकाच बिजागरीवर दारुड्यासारखं लोबंत होतं. आत अंधाराचा डोह होता.
त्याच्या हातात टॉर्च होता, पण त्याचा प्रकाश आत टाकण्याची त्याची इच्छा नव्हती. कोणास ठाऊक प्रकाशात काय येईल ते ! काही क्षण तो पोर्चबाहेरच उभा राहिला, मग दाराकडे निघाला. पायांखाली गवत, वाळकी पानं तुडवली जात होती - त्यांचा सरसर आवाज येत होता. आता त्याचं आगमन कोणापासूनही लपून राहिलेलं नसणार. (वाड्यात खरोखरीच कोणी असलं तर !)
जास्त थांबण्यात अर्थ नव्हता. आधीच मन कच खात होतं. अशा प्रसंगी वेळच शत्रू होत होता. क्षणक्षण उलटत चालला तशी धैर्याला ओहोटी लागली होती. मनाचा हिय्या करून त्याने भराभरा चार पावलं टाकली आणि तो मोठ्या दाराच्या आत आला.
त्याच्या प्रवेशाबरोबर डोक्यावर खूप मोठी फडफड फडफड झाली. पाकोळ्या किंवा वटवाघुळं असावीत. चीं-चीं-चीं आवाज आला. आधी छातीत खूप मोठी धडधड झाली होती... पण आसपास शांतता झाली तशी नाडी मंदावली.
मग तो हसण्याचा आवाज आला खी: ! खी: ! खी: ! करत कोणीतरी हसत होतं. मोठ्या रिकाम्या खोलीत तो आवाज घुमत होता. आवाज कोठून येतो तेच कळत नव्हतं. त्याने हातातला टॉर्च शिलगावला. झगझगीत प्रकाशाची तलवार अंधार कापत गेली. धुळीच्या कणांनी प्रकाशाचा कोन हवेत रेखला होता. आधी प्रकाशाचंच वर्तुळ चारी दिशांना घाईघाईने फिरत होतं. पण मग त्याची गती मंदावली. खोलीच्या भिंतीवरून ते सावकाश फिरायला लागले.
ती एक खूप प्रशस्त खोली होती. भिंतींचा रंग झडला होता, प्लास्टर उडालं होतं, धलपे पडले होते; भिंतीत अनेक दारं होती. दारांवरून टॉर्चचा प्रकाश फिरला... परत जेव्हा त्या रांगेवरून फिरला तेव्हा हिसका बसून थांबला.
एका दारात ती उभी होती. क्षणात तिथे आली होती.
डोक्यापासून पायांपर्यंत एका मळकट काळ्या कपड्याखाली तिचं सर्व अंग झाकलेलं

होतं. अनावृत्त होते ते फक्त डोळे. एका चिंचोळ्या चौकोनी फटीतून त्याच्यावर खिळलेले. टॉर्चच्या प्रकाशात हिरवट लालसर दिसणारे.
काळी जोगीण !
ती तर पुतळ्यासारखी निश्चल होती. मग मघाचा तो हसण्याचा आवाज कोणाचा होता, तिचा? का एखाद्या हस्तकाचा?
त्याच्या मनातली भीती जराशी ओसरली. ही तर एक साधी स्त्री दिसत होती. नाव काळी जोगीण असेलही. लोकांनी दिलेलं; पण तिची जी एक ख्याती होती त्यात कितपत सत्य होतं? तिच्या अंगी खरोखरीच त्या तथाकथित शक्ती असतील तर मग ती अशी एखाद्या भिकाऱ्यासारखी अशा पडक्या जागेत, विटक्या कपड्यात, अंधारात अंधारात का लपून राहत होती?
एका क्षणी तो एका पडिक, जुनाट, रंगहीन खोलीत होता... दुसऱ्या क्षणी त्याच्याभोवती प्रकाशाचा लखलखाट झाला. वर छताला पंचवीस पंचवीस ज्योतींची झुंबरं होती. भिंतीवरचा सनला त्या प्रकाशात चमकत होता. पायाखाली जाजमं होती, गालिचे होते. भिंतीना टेकून हारीने गाद्या-लोड-तक्के होते. मध्यभागी एका मोठ्या धूपपात्रातून धुराची वेटोळी तरंगत वर जात होती... समोरच्या दारावर काचमण्यांचा किणकिणता पडदा होता. त्या पडद्यामागे ती उभी होती. नाजूक हातांच्या पाकळ्यात गोरापान चेहरा होता... मुलायम मखमली त्वचा... अर्धोन्मिलित नेत्र... किंचित विलग झालेले ओठ...
दुसऱ्या क्षणी तो पुन्हा अंधारात होता... पण आता तर त्याच्याभोवती ती जुनाट पडीक खोलीही नव्हती. ती प्रचंड वास्तूही काळाच्या ओझ्याखाली कोसळली होती. आसपास दगडांची रास पडली होती. सर्वत्र तण गवत माजलं होतं, जिथे आधी दाराची चौकट दिसली होती, जिथे क्षणभरापूर्वी काचेच्या मण्यांचा किणकिणता पडदा दिसला होता, तिथे आता फक्त उलथेपालथे पडलेले दगड होते... पण तरीही ती तिथेच उभी होती.
विटकं वस्त्रं मस्तकावरून खाली सरकलं होतं.
तिथे आता दात विचकून हसणारी एक कवटी होती.
त्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळाली होती. टॉर्चच्या प्रकाशात ती खोलीत जाताना दिसली. तिच्यामागोमाग तो त्या खोलीत आला होता. एक दिवा आवरणाखाली जळत होता. वरचे आच्छादन काढताच खोलीत लख्ख प्रकाश पडला. विजेच्या दिव्याच्या तुलनेने तो अंधुक असेल, पण संपूर्ण अंधाराला सरावलेल्या डोळ्यांना तो प्रखर वाटत होता. खोलीत दोन जुनाट, हात नसलेल्या, खिळखिळ्या झालेल्या खुर्च्या होत्या. एकीवर ती बसली होती. संकेत उघड होता. दुसरी त्याने घ्यायची होती.
आता त्याला ती स्पष्टपणे दिसत होती, पण तपशिलात काहीही भर पडली नव्हती. त्या विटक्या काळ्या कपड्याचं शरीरभराचं अवगुंठण तसंच होतं. अजूनही त्याला फक्त तिचे डोळेच दिसत होते. अगदी मागे छद्मी मिस्किल उपरोधिक हास्य लपवणारे डोळे. आता ते एकटक त्याच्यावर खिळले होते. ती नजर मेंदूत फांसासारखी रुतली होती. हलवू म्हटल्याने त्याला डोळे हलवता येत नव्हते.
‘‘तू कशासाठी आला आहेस?’’ आवाज साधा होता; निर्विकार होता. त्यात भावनेची यत्किंचतही छटा नव्हती. त्याला समजलं की मनाशी ठरवलेले शब्द बोलणं अशक्य

आहे. सहज, कुतूहलापायी, अंदाज घेण्यासाठी येण्यासारखी ही जागाच नव्हती. खरोखरच तो एखाद्या त्रयस्थ, स्थितप्रज्ञ, विचक्षण निरीक्षकासारखा आला असता तर त्याला कदाचित वाड्यात प्रवेशही मिळाला नसता; किंवा त्याचा आतवार प्रवेश झाल्यावर मग त्याला बाहेरची वाट बंद झाली असती.
''मला माझ्या दरिद्री, एकसुरी, चणचणीच्या, काबाडकष्टाच्या जिण्याचा कंटाळा आला आहे...'' फोनोग्राफच्या तबकडीसारखे शब्द घडाघडा ओसंडत होते. स्वत:पासूनही लपवलेलं सत्य.
''तुझ्या मनात जे जे असेल ते ते तुला मिळेल.'' त्या आवाजात एक निर्णायकता होती.
''मी मागेन ती किंमत द्यायला तयार आहेस?''
नावालाच प्रश्न होता. खरं विधानच होतं. त्याला खूप वाटत होतं, विचारावं, काय किंमत आहे? विचाराला वेळ किती आहे? पण जीभच रेटली जात नव्हती. काही क्षण विलक्षण तणावाचे गेले.
''म्हणजे तुझी मूक संमती आहे तर... जा आता...''
त्या दिव्यावर आवरण आलं. तो तिच्याकडेच पाहत होता. खोलीत अंधार झाल्यावरही तिचे डोळे त्यांच्याकडे टक लावून पाहताना दिसत होते. ते लहानमोठे होत होते. आणि मग त्यांच्यावर सावकाश पापण्या खाली आल्या.
खोलीत हालचालीचा कोणताही आवाज झाला नाही; पण पाचसात सेकंदांनी त्याने टॉर्च शिलगावला तेव्हा त्याला दिसलं की खोली रिकामी आहे. मनात एक धाडसी विचार आला. वाटलं, तो दिवा घ्यावा, सर्व वाडा शोधावा, सर्व खोल्या, तळघरं, माळे, सर्व काही नीट पाहावं, तो दिव्याच्या मेजाकडे गेला. मेजावर जुनी वेताची टोपली पालथी ठेवली होती. ती त्याने उचलली; पण खाली काहीच नव्हतं. दिवा नाही, काही नाही.
दिवा मालवून तिने बरोबर नेला असेल? पण वात विझल्याचा काहीतरी वास यायला हवा होता. तो आला नव्हता ही त्याची खात्री होती. त्याने टॉर्चसमोरच्या खुर्चीकडे वळवला. खुर्चीच्या बैठकीवर कितीतरी दिवसांची धूळ होती. तिथे कोणी बसल्याची एवढीशीही खूण नव्हती. फरशीवरची धूळही विस्कटली नव्हती. दारापासून आतपर्यंत फक्त त्याच्याच पावलांच्या ठशांची दुहेरी रांग होती. तो खोलीच्या दारातून मधल्या हॉलमध्ये आला.
हॉलच्या तीनही भींतीत अनेक दारं होती. त्या दारांतून कोणीकडे वाटा जात होत्या? आता शोध घेणं अशक्यच होतं. तो एकटा होता, त्याच्याभोवती अंधारलेली, झपाटलेली वास्तू होती. त्याची ज्ञानेंद्रियं विश्वासार्ह राहिली नव्हती. आता एवढ्यातच एखाद्या त्रयस्थाला तो एका रिकाम्या खुर्चीकडे पाहत बसलेला दिसला असता ! नाही, आताची वेळ शोध घेण्याची नव्हती.
हॉलच्या दारातून तो बाहेर पोर्चमध्ये आला. आवारातून पडक्या भिंतीपाशी आला. मागे वळून त्याने टॉर्चचा झोत त्या पडक्या वाड्यावर टाकला.
पोर्चवरच्या बैठ्या कठड्यापाशीच ती उभी होती. आणि पुढे किंचित वाकून त्याच्याकडेच पाहत होती.
कॉजवे येईपर्यंत त्याच्या जिवात जीव नव्हता. रात्रीच्या गडद काळोखात नाही नाही ते

येऊन मिसळलं होतं. देवळाच्या मागे मोठा वड होता. वडाच्या फांदीवर घुबड बसलं होतं. त्याचे दोन निखाऱ्यासारखे डोळे अच्युतवर खिळलेले होते. वडाला वळसा घालून तो मंदिराच्या भिंतीपाशी येईपर्यंत त्या डोळ्यांनी त्याची पाठ सोडली नव्हती.
देवळावरून पुढे जाताना त्याने रात्रीच्या निळ्याकाळ्या आकाशाविरुद्ध रेखल्या गेलेल्या घुमटावर नजर टाकली, मात्र एकाएकी आतली मोठी घंटा खण् ! खण् ! आवाज करायला लागली. तो धूम पळणार होता, पण शेवटच्या क्षणी त्याने स्वत:वर ताबा मिळवला. असं धावपळ करून मागे टाकण्यासारखं हे नव्हतं. त्याला धोका असण्याचं काही कारण नव्हतं. ही फक्त एक चुणूक होती. जनावराला रस्त्यावर ठेवण्यासाठी आसपास हवेत चाबकाचा फट् ! आवाज करतात तसलाच प्रकार. त्याने मनात विरोधाचा विचार आणण्यापूर्वीच त्याला हा इशारा होता.
कॉजवे ओलांडला तेव्हा बारा वाजले होते. (इतका वेळ आपण काय करत होतो? हा मनाला सतावणारा प्रश्न होताच.) वाटेतल्या अमृततुल्यमधे त्याने गरमागरम चहाचा कप घेतला. घरी परत येईपर्यंत एक वाजला होता. कडीचा आवाज होताच नलिनीने दार उघडलं होतं; पण तो कपडे बदलून येईपर्यंत ती परत झोपीही गेली होती.
पण झोप त्याच्यापासून इतकी दूर कधीही नव्हती. रात्रीचे सर्व प्रसंग सर्व तपशिलासह डोळ्यासमोरून पुन्हा पुन्हा सरकत होते. परांड्यांची अवस्था आता पुन: पुन्हा डोळ्यासमोर येत होती. डॉक्टर त्यांना मानसिक विकार झाला आहे म्हणत असतील - पण अच्युतची खात्री झाली होती की खरा प्रकार वेगळाच होता. परांड्यांनी कशाला तरी संमती दिली होती आणि तो सौदा त्यांच्या अंगलट आला होता. स्वत:ची आणि त्याचबरोबर आपल्या घरादाराची, संसाराचीही त्यांनी परवड करून घेतली होती. त्याला स्वत:ची ती गत करून घ्यायची नव्हती. खरं तर तिथल्या तिथेच त्याने ठाम नकार द्यायला हवा होता - पण स्वत:ला फसवण्यात काय अर्थ होता? त्या वातावरणाने, लहानसहान सूचक प्रसंगांनी त्याची अवस्था भयभीत झाली होती. तिच्यात (तिथे खरोखरच एखादी स्त्री असली तर !) मनकवडेपणा होता - त्याच्या मनात विचार येतायेताच तिला तो जाणवत होता. तिच्यात एक प्रकारची मोहिनी टाकण्याची शक्ती होती - त्याच प्रभावाखाली त्याला त्या वाड्याची भूतकाळातली आणि भविष्यकाळातली एक ओझरती अवस्था दिसली होती; पण त्याने कोठेतरी वाचलं होतं की खंबीर मनाच्या विरोधापुढे या शक्तींचा काहीही प्रभाव चालत नाही.
आता सकाळ झाली. दिवसा उजेडी तो त्या पडक्या वाड्याला भेट देणार होता. मग ठरवू काय करायचं ते, तो मनाशी विचार करीत होता.
झोप आली ती खूप उशिरा आली, रात्रीच्या चमत्कारिक प्रसंगाचा वारसा घेऊनच आली. वेड्यावाकड्या स्वप्नांनी त्याची झोप अनेकदा चाळवली गेली; पण सकाळी जाग आली तेव्हा एकही स्वप्न आठवत नव्हतं. क्षणमात्र मनात आशा आली की त्या पडक्या वाड्यातला अनुभव हेही एखादं स्वप्नच असेल, पण अर्थात ही आशा फार वेळ टिकली नाही. सकाळचे सर्व व्यवहार अबोलपणानेच झाले. नलिनीने जेवणाचा डबा तयार केला. तो बाहेर पडला तेव्हा त्याने नलिनीपाशी आपल्या रात्रीच्या संदर्भात एक शब्दही उच्चारला नव्हता.

ऑफेसच्या बसस्टॉपवर गोपाळची रोज गाठ पडत असे. गोपाळच त्याचा त्यातल्या त्यात जवळचा मित्र होता. गोपाळजवळच त्याने डबा दिला आणि आपण जरा उशिरा येत असल्याचं आणि तोपर्यंत जरा 'सांभाळून' घेण्याचा निरोप दिला. अर्थात यात नवीन काहीच नव्हतं. बस निघून गेल्यावर तो माघारी फिरला. काल रात्री जी वाट घेतली होती त्या वाटेला लागला.
आता कॉजवे सायकल-स्कूटर-पादचारी आणि नदीवर आणलेल्या गाई-म्हशी यांनी गजबजून गेला होता. धूळ होती. वेगवेगळे वास होते. नदीच्या उथळ काठावर बेघर लोकांच्या अंघोळी चालल्या होत्या. धोब्यांच्या कपड्यांच्या राशी लागल्या होत्या. रहस्यमयतेचा अंशही नव्हता.
कॉजवे ओलांडला. चढ चढून वर येताच तो उजवीकडे वळला. या भागात पुढे वस्ती नव्हती, कॉलनी नव्हती. काही मळे, बंगले होते, पण त्यांचे दर्शनी भाग फर्लांगभरावरून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर होती. ही मागची दुर्लक्षित बाजू होती.
झाडीतून तिरकस उन्हं पडली होती; पण त्या हलत्या सोनेरी चकत्या होत्या. काही ठिकाणचे काळोखाचे कोष तसेच होते. तो जसजसा पुढे चालला तसतसा गर्दीचा गजबजाट अस्पष्ट होत होत शेवटी लुप्त झाला. पानांची सळसळ आणि कीटकांची किर्रर्र. चारीबाजूला झाडी होती. मागेपुढे रस्ता रिकामा होता. त्याच्या नकळत त्याची नजर सर्व दिशांना फिरत होती. कालच्या रात्रीच्या त्याच्या धैर्याचं आता त्याचं त्यालाच नवल वाटत होतं.
उद्ध्वस्त देवालय आलं. आता त्याचं खरं स्वरूप उघड होत होतं. दीपमाळा ढासळल्या होत्या, तट कोसळले होते, शिखरावरचे कळस नाहीसे झाले होते. पडक्या भिंतीवरून गवत वाढलं होतं. माणसाने आपली प्रार्थना थांबवताच त्या जागेतून देवत्वही गेलं होतं... त्या रिकाम्या झालेल्या वास्तूचा आणखी कशाने तरी ताबा घेतला होता का ? कालचा घंटानाद जर भास नसेल, खरा असेल तर...?
देवळाला वळसा घालून तो मागे आला. सराई देवळाला मागच्या भागात होती. सराईच्या खिडक्या मागच्या भिंतीतून बाहेर उघडत होत्या. खिडक्यांची पालं केव्हाच गेली होती. थंडी-वारा-पाऊस यापासून आडोसा म्हणून कोणीतरी कधीतरी खिडक्यांना गोणपाटाचे पडदे लावले होते... तेही जुने होऊन त्यांना असंख्य छिद्रं पडली होती. पूर्वेकडून आलेलं तिरकं उन त्या पडद्यावर पडल होतं - त्यांना एक खोटी सोनेरी झिलई आली होती; पण अच्युतचं लक्ष एकाएकी मधल्या खोलीच्या खिडकीवर एकवटलं. त्या उन्हाने उजळलेल्या पडद्यामागे कोणीतरी उभं होतं. फक्त काळी छायाकृती दिसत होती. पुरुष का स्त्री हेही सांगता येत नव्हतं. छायाकृतीशिवाय इतर काहीही दिसत नसलं तरी वाटत होतं ती व्यक्ती आपल्या हालचालींवर नजर ठेवून आहे. अच्युतच्या पावलांना एकदम गती आली. या वेळी त्या ठिकाणी कोणी साधा पांथस्थ किंव बेघर असण्याची मुळीही शक्यता नव्हती. नैसर्गिक स्पष्टीकरण म्हणजे फसवाफसवी होती. वीसएक पावलं टाकल्यावर त्याने एक घाईची नजर मागे टाकली; पण ती खिडकी आता रिकामी होती.
आता तो पडका वाडा समोर आला होता. त्या जीर्णशीर्ण भग्न वास्तूत वास्तविक

कारुण्य असायला हवं होतं, मानवी वस्तीची ती शोकांतिका पाहून मन खिन्न व्हायला हवं होतं. आपल्याला काय वाटत आहे हे त्याला नक्की सांगता आलं नसतं. पण ती करुणा किंवा खेद खास नव्हता. सराट्याच्या बोचऱ्या स्पर्शासारखी ती जाणीव होती. जणू त्या वास्तूभोवती एक काटेरी कवच होतं. त्या काळ्या जोगिणीच्या (तशी कोणी असली तर) वास्तव्याचा हा परिणाम होता की तिच्या वास्तव्याचं हे कारण होतं? वास्तू अपवित्र म्हणून तिने निवडली होती का ती आली म्हणून वास्तू अपवित्र झाली होती?
अच्युतने मनाला खेचून ताळ्यावर आणलं. या गंभीर सात्त्विक चर्चांशी त्याचा काय संबंध होता? या वास्तूत काहीही असो त्याच्याशी संबंध तोडायला तो आला होता. तो ठणकावून सांगणार होता की काल रात्री त्याने कोणताही सौदा केला नव्हता.
कालच्याच रात्रीसारखा एका पडक्या भिंतीवरून तो आत आला. पोर्चमधल्या मोठ्या दरवाजातून बाहेरच्या हॉलमध्ये आला. छतावरून भिंतीवर ओल पाझरली होती, त्यांच्यावर हिरवट बुरशी चढली होती. कोळीष्टकांचे जाड जाड पडदे कोपऱ्यातून खाली लोंबत होते. खालची फरशी उखडली होती. सर्वत्र काड्या, कचरा, पक्ष्यांची विष्ठा पसरलेली होती. हॉलच्या मध्यभागी उभा राहून तो तिन्ही भिंतीतल्या दारांकडे पाहत होता. काल रात्री ती उजवीकडच्या दारातून आत गेली होती. आधी तो त्या खोलीत गेला. आता दोन मोडक्या खुर्च्या होत्या. एका मेजावर उपडी केलेली एक वेताची टोपली होती. हीच त्याची कालची शेवटची आठवण होती. तिथे इतर काहीच नव्हतं. तो बाहेर आला. एक एक करीत त्याने खालच्या मजल्यावरच्या सर्व खोल्या पाहिल्या. सर्वत्र धूळ होती. दोन खोल्यांच्या कोपऱ्यात कागदांच्या शेकोट्या पेटवल्याच्या खुणा होत्या.
एकीत बुरसटलेल्या पोत्यांची एक वळकटी होती. फार फार दिवसांपूर्वी कोणीतरी तिचा रात्रीच्या चार घटका टेकण्यासाठी वापर केला होता; पण फार दिवसांपूर्वी. वळकटी उलगडताच उंदीर-उंदरीणीची जोडी आणि पाच-सहा गुलाबी रंगाची पिल्लं सैरावैरा पळाली होती. सर्वत्र मोडक्या खुर्च्या, फळकुटं, जुनी पादत्राणं, मळकट कपडे पसरले होते. खालचा मजला पाहून झाला होता.
हॉलमधूनच वर जिना जात होता. वरच्या मजल्यावर तीन खोल्या होत्या. मोठी चुने गच्ची होती. त्याही खोल्या अडगळीने भरलेल्या होत्या. त्यांच्यावर दोन खोल्या होत्या. एक खोली जिन्यासाठी गेली होती. त्याचा धीर आता बराचसा परत आला होता. विझवून टाकलेल्या भट्टीसारखी इथली आंच आत गेली होती. वरच्या दोन खोल्या पाहिल्या की त्याचं आजचं काम संपणार होतं. खरोखर त्याला तिची मुलाखत नकोच होती. रात्रीच्या छाया अंधारातच ठेवलेल्या बऱ्या. त्यांना दिवसाच्या प्रखर उजेडात आणायलाच नको. मग मनाला संशयाचं संरक्षण राहणार नाही.
वरच्या दोन खोल्या गडीमाणसासाठी असाव्यात. एकीतून दुसरी उघडत होती. दोन्हीत विसकटलेल्या काथ्याचा बाजा होत्या. दोन मोडक्या गंजलेल्या ट्रंका होत्या. खिडक्या पश्चिमेला होत्या. दुपारचं कडक ऊन येत असणार. खिडक्यांना जुने शर्ट बांधले होते. बाहेरची खोली तर रिकामीच होती. आतल्या खोलीत एक जुनं पॉलिश झडलेलं, एका बाजूला कललेलं एक मोठं कपाट वगळता इतर काहीही नव्हतं. अगदी परत जायच्या क्षणी त्याने त्या कपाटाच्या दाराला हात लावला, मात्र...

दार आतून जोराने ढकललं गेलं.
दचकून त्याने समोर पाहिलं.
कपाटाच्या कोपऱ्यात ती उभी होती.
खी: ! खी: खी: ! करून हसत होती.
क्षणभर त्याचं मन, मेंदू पार कोरा झाला. मग सर्व दिशांनी भीती घोंघावत आली. त्याच क्षणी देवळातल्या मोठ्या घंटेचा खण् ! खण् ! खण् ! घंटानाद सुरू झाला.
ती कपाटाबाहेर पाऊल टाकत होती.
''ब-ब-ब'' करीत तो धडपडत मागे सरकला, त्याच्या पायाला बाजेचा स्पर्श झाला, एकदम किंचाळून तो गर्रकन वळला, जिन्यावरून धाडधाड खाली आला; वाड्यातल्या सर्व खोल्यांची दारं दणादणा उघडत मिटत होती. हवेत धूळ उडत होती. झोपेत असलेल्या पाकोळ्या-वाघळं फडफड करीत घिरट्या घालत होती. चीं-चीं-चीं चित्कार करत होती. खी: ! खी: ! हसण्याचा आवाज सर्व खोल्यांतून घुमत होता... तो कसातरी खाली तळमजल्यावर आला... मोठ्या दारापाशी त्याचा पाय कशाला तरी अडकला... त्याचा एकदम झोक गेला आणि तो बाहेरच्या पायरीवर सपशेल पालथा पडला...
त्याला शुद्ध आली तेव्हा (म्हणजे त्याला आसपासच्या परिस्थितीचं आकलन झालं तेव्हा) तो रस्त्याने चालत होता. देऊळ मागे गेलं होतं. निम्मी वाट संपली होती. म्हणजे तो बेशुद्धीत किंवा गुंगीत बराच वेळ चालत असला पाहिजे. त्याने घड्याळात पाहिलं. बारा वाजले होते. बारा ! म्हणजे मधले जवळजवळ अडीच तीन तास बेपत्ता झाले होते ! अडीच तास ! तो काय इतका वेळ बेशुद्ध होता की काय? त्याने कपाळाला, डोक्याला हात लावून पाहिला. रक्त नव्हतं. टेंगूळ नव्हतं. वेदना नव्हती. शुद्ध हरपल्याचं कारण इजेपेक्षा भीतीचा धक्का हेच असलं पाहिजे. पण या मधल्या वेळाचं काय? तो करीत तरी काय होता? तसाच पोर्चमध्ये वेडावाकडा पडला होता? पण ते त्याला पटत नव्हतं. तसं असतं तर शरीर अवघडलं असतं. नाही, तो लागलीच शुद्धीवर आला असला पाहिजे... पुढे काय?
तो काय त्या वाड्यात परत गेला? आत काय आहे ते एकदा समजल्यावर तो स्वेच्छेने तर खासच गेला नसता... पण आता त्याची इच्छाशक्ती कार्यरत नव्हती. कोणी सांगेल तसा तो वागला असला पाहिजे. म्हणजे जवळजवळ दोन तास तो त्या संमोहित, असहाय अवस्थेत होता. तो काय परत आत त्या खोलीत जाऊन तिच्यासमोर त्या मोडक्या खुर्चीवर बसला होता? त्याच्या तोंडून काय त्या सौद्याच्या अटी मान्य करून घेण्यात आल्या होत्या? क्षणभर थरथरत्या शरीराने तो होता तिथेच उभा राहिला.
त्याच्या अंगावरून एकामागून एक शहाऱ्यांच्या सरसरत्या लाटा जात होत्या. तो काय कबूल करून बसला होता?
''माझी लहानशी नात बळी गेली हो !'' परांडे तळतळून म्हणाले होते. बहिणीची दोन गोजिरवाणी मुलं त्याच्या नजरेसमोर आली. भोळ्याभाबड्या नलिनीची आकृती डोळ्यांसमोर आली. त्याने दोन्ही हातांनी कपाळ अगदी गच्च दाबून धरलं. त्याने कशाची कबुली दिली होती?
कोणाला तरी सांगायला हवं होतं. कोणाचा तरी सल्ला घ्यायला हवा होता. अच्युतच्या

नजरेसमोर फक्त गोपाळचंच नाव येत होतं. तो ऑफिसात पोहोचला तेव्हा दोड वाजला होता. जेवणाची सुटी संपून सर्व कर्मचारी कामावर रुजू होण्याच्या बेतात होते. त्या सुमारास अच्युत रिक्रीएशन हॉलमध्ये पोहोचला. गोपाळ डबा संपवून हात धुऊन टेबलापाशी येऊन बसला होता. जेवणानंतरची त्याची सिगारेट शिलगावण्याच्या बेतात होता. त्याची नजर दारातून आत येणाऱ्या अच्युतवर पडली आणि त्याच्या सर्व हालचाली गोठल्या. अच्युतचा चेहराच त्याची मन:स्थिती सांगत होता. गोपाळसमोरच्या खुर्चीवर अच्युत येऊन बसला - कोसळलाच जवळजवळ. डबा त्याने एका हाताने दूर सारला आणि टेबलावर हात ठेवून त्याच्यावर डोकं टेकवून तो सुन्नपणाने बसून राहिला. त्याचा खांदा जोरजोराने हलवून गोपाळ पुन्हा पुन्हा विचारत होता -

''अच्युत ! अरे अच्युत ! अरे काय झालं ते तरी सांग !''

अच्युतचा चेहरा वर आला तेव्हा त्याच्या नजरेत इतकी असहायता आणि इतकी भीती होती की गोपाळला तिकडे पाहवेनाच.

''गोपाळ, इथे एक शब्द बोलता यायचा नाही - आपण बाहेरच कुठेतरी बसू या - बघ ऑफिसात काही सोय होते का -''

गोपाळ दोन मिनिटातच बाहेर आला. अच्युतला त्याने हातानेच बाहेर चालण्याची खूण केली. दुपारच्या कडक उन्हात रस्ते रणरणत होते, रिकामे होते. लहान लहान पार्कमधून बेवारशी लोकांनी झाडांच्या सावल्यांच्या जागा बळकावल्या होत्या. मोठ्या पार्कमधला चौकीदाराच्या नजरेखाली असलेला एक बाक मात्र सुदैवाने मोकळा होता.

''गोपाळ, तू मला मूर्खात काढणार आहेस.'' अच्युत म्हणाला, ''सांगायला कुठून आणि कशी सुरुवात करायची हेच समजत नाही. त्या दिवशी आपण जारण - मारण, चेटुकं, भानामती यासंबंधात गप्पा मारत होतो, आठवलं? त्या थोराताने काळ्या जोगिणीचा किस्सा सांगितला होता, आठवलं? त्या थोरातने ज्याच्या संबंधात तो किस्सा सांगितला होता त्यांचं नाव आहे - परांडे - मी त्यांच्या पत्त्यावर त्यांना जाऊन भेटलो -''

''गोपाळ, ते त्या काळ्या जोगिणीकडे गेले होते; हे अगदी सत्य आहे - पण त्यांना त्या भेटीचा विलक्षण पश्चात्ताप होत होता - ते म्हणत होते त्या नादात त्यांच्या सव्वा वर्ष वयाच्या नातीचा बळी गेला ! त्यांच्या घरचे म्हणताहेत त्यांना भ्रमवेडाचा धक्का बसला आहे आणि त्या त्यांच्या सर्व कल्पना आहेत... ते मला म्हणत होते तिकडे जाऊ नका - पण मला काही इजा होऊ नये अशी त्यांची खरोखरीची इच्छा असती तर त्यांनी मला तो पत्ता दिलाच नसता ! पण तसं नाही... ते म्हणत होते तो पत्ता जो कुणी विचारील त्याला सांगण्याची त्यांच्यावर सक्ती आहे - ते - स्वत:ला गप्प ठेवू शकत नाहीत - मला हे सक्ती प्रकरण कळत नाही - पण एवढं खरं आहे की मला पत्ता सांगितल्यावर ते कोपऱ्याकडे तोंड करून ढसाढसा रडत बसले होते...''

''मग पुढे ! त्या पत्त्यावर गेलास की काय?''

''हो ना ! तोच मूर्खपणा मी केला ! गोपाळ, आता तुला अगदी मनाची गोष्ट सांगतो - या मध्यमवर्गीय संकुचित रखडत्या आयुष्याचा अगदी कंटाळा आला आहे - आहे नाही, होता म्हणतो... कारण आता तेही हातचं जाण्याचा धोका उभा राहिला तशी ते एकदम गोड; हवंहवंस वाटायला लागलं आहे - पण गोपाळ, काहीतरी भलतंच झालं आहे !''

काही वेळ थांबून त्याने स्वत:चे विचार नीट जुळवले.
''गोपाळ ती जागा पार गावाबाहेर, एका खूप जुन्या देवळामागे आहे... एक पडका वाडा आहे... तीन मजली पडका वाडा आहे... परांडे म्हणाले होते ती तिथे फक्त रात्रीचीच भेटते म्हणून मी रात्रीचा आठनंतर गेलो होतो... गोपाळ, ती जागा म्हणजे भुलभुलैय्या आहे... कधी नटलेला - सजलेला दिवाणखाना दिसतो तर कधी पडक्या दगडांची रास दिसते. कधी एखादी रूपमती स्त्री दिसते, कधी सांगाडा-कवटी दिसते... गोपाळ, तिथे माझी शुद्धच हरपल्यासारखी झाली... मला माहीत नाही माझ्या नकळत मी काय काय अटी मान्य केल्यात ते...''
''कालची सर्व रात्र डोळ्याला डोळा नाही. आज सकाळी असा निश्चय करूनच उठलो की तिथे जाऊन स्पष्टपणे सांगायचं की मला काहीही नको, मी काहीही देणार नाही... तिथे गेलो खरा... आधी वाटलं, सारा वाडा रिकामाच आहे -- पण गोपाळ ! ती तिसऱ्या मजल्यावरच्या एका जुनाट लाकडी कपाटात बसली होती... जणू काही माझीच वाट पाहत होती... बाहेर येतायेता पाय अडखळला, खाली आपटलो, शुद्ध क्षणभर गेली... बस् ! तेवढं तिला पुरं होतं ! पुढेच अडीचतीन तास माझ्या स्मरणातच नाहीत... शुद्धच हरपली होती... भानावर आलो तेव्हा कॉजवेच्या रस्त्याने चालत होतो... मधल्या वेळात काय झालं खरोखर आठवत नाही... पण... पण गोपाळ, सारखं वाटत मी परत आत गेलो असलो पाहिजे... त्याच खोलीत त्या काळ्या जोगिणीसमोर बसून काहीतरी कबूल केलं असलं पाहिजे... काय त्याचीच मला भीती वाटते रे ! ते परांडे म्हणत होते माझी छोटी नात गेली... माझ्या ताईला दोन गोजिरवाणी मुलं आहेत... त्यांना काही झालं तर? माझी नलिनी अगदी साधीभोळी आहे, भाबडी आहे... त्या बिचारीला काही झालं तर...?''
अच्युतचा आवाज चिरकत होता. धास्तीने त्याचा जीव घाबराघुबरा झाला होता. त्याला दोष देण्याची ही वेळ नव्हती. या क्षणी त्याला धीर हवा होता. त्याची समजूत काढण्याचीही ही वेळ नव्हती. त्याच्या सांगण्यावरून एक उघड होत होतं. रात्रीच्या आणि सकाळच्या अनुभवावर त्याचा पूर्ण विश्वास होता. गोपाळचं मन या बाबतीत तटस्थ, उघड होतं. अशा गोष्टी घडत असतील किंवा नसतीलही - त्या घडतात असा जो काहींच्या मनात ठाम विश्वास असतो त्याला महत्त्व होतं. या बाधाही खोट्या असतील आणि त्यांचा 'बंदोबस्त' करणारे मांत्रिकही लुच्चे असतील - पण खरी गोष्ट अशी होती की ज्यांच्या अंगात येणं, चेटूक, करणी, भानामती अशा दुष्ट संहारक शक्तींवर विश्वास असतो त्यांचा अर्थात मांत्रिकाच्या शक्तीवरही असतो. शेवटी या तर्क दुष्ट प्रदेशातही मनाची जी एक रॅशनॅलिटी आहे ती काम करत असते. कल्पनेतल्या दगडासाठी कल्पनेतलंच शिरस्त्राण चालतं. कल्पनेतल्याच पावसाला कल्पनेतलीच छत्रीही चालते. मग अशा काल्पनिक करणीचा 'बंदोबस्त' करणारा फसवा मांत्रिकही चालायला हवा.
''अच्युत!'' त्याच्या खांद्यावर हात ठेवत गोपाळ म्हणाला, ''माझ जरा ऐकतोस का? असा धीर सोडून बसू नकोस - त्याने काहीच व्हायचं नाही - आपल्याला काहीतरी हालचाल केली पाहिजे - असं हातपाय गाळून बसलास तर कसं होणार?''
आता प्रथमच अच्युतची मान वर आली.

‘‘आपण काय करू शकणार, गोपाळ?’’
‘‘अच्युत, घटकाभर आपण समजून चालूया की तुला आलेले अनुभव सत्य आहेत, भास नाहीत; त्याहीपुढे समजून चालूया की त्यांच्यात हातचलाखीचा, बनवाबनवीचा, नजरबंदीचा काहीही भाग नाही. म्हणजे तुझा खरोखरच एखाद्या अमानवी, घातकी, क्रूर शक्तीशी संबंध आला आहे. तुला त्या शक्तीपासून धोका निर्माण झाला आहे. ठीक आहे. हे सर्व मान्य केलं; पण मग स्वत:च्या बचावासाठी काही हालचाल करायला नको का? का असंच चुपचाप बसून कत्तलखान्यातल्या बोकडासारखं बळी जायचं?’’
‘‘पण आपल्याला यातलं काय माहीत आहे? आपण काय करू शकणार आहोत सांग ना?’’
‘‘आपण स्वत: नाही - पण इतर कोणाची मदत नाही का घेता येणार?’’
‘‘कोण मदत करणार?’’
‘‘ते पाहू या ! मानलं, तू म्हणतोस तशा काही दुष्ट शक्ती आहेत, आसुरी वासनांनी रक्तासाठी वखवखलेल्या आहेत... पण त्यांनी काही आपलं जग जिंकलेलं नाही ना? सर्वत्र अनाचार-अत्याचार यांचं थैमान माजलेलं नाही ना? सत्शील, सदाचरणी, सज्जन माणसं आपलं आयुष्य समाधानाने जगत आहेत ना? देवदेवतांच्या पूजा-अर्चा चालू आहेतच ना? म्हणजे जशा दुष्ट शक्ती आहेत तशाच काही सुष्ट, संरक्षक शक्तीसुद्धा असल्याच पाहिजेत, नाही का? आपल्याला त्यांचं साहाय्य नाही - का घेता येणार?’’
आता प्रथमच अच्युतच्या नजरेतली असाहाय्यता गेली होती. खांद्यांना जराशी उभारी आली होती. गोपाळच्या हातावर हात ठेवत तो म्हणाला,
‘‘गोपाळ, तुला कल्पना नाही तुझ्या शब्दांनी मला केवढा धीर आला आहे तो ! उरावरचं ओझं कसं हलकं झालं आहे !’’
‘‘असं स्पिरीट हवं, अच्युत ! चल, ऑफिसात चल. निदान हजेरी तरी लाव. दिवस फुकट कशाला घालवतोस? एवढ्यात धीर सोडू नकोस... एकदोन दिवसात मी काहीतरी माहीती काढून आणतो. मग पाहू की काळी जोगीण काय थेर माजवते ते !’’
ही सर्व हकिकत नलिनी विस्मयाने, जवळजवळ अविश्वासाने ऐकत होती. जणू काही ती नाटकाच्या पडद्यामागे बसली होती आणि पडद्याबरोबर तिच्या नजरेआड एक थरारक भयानक नाट्य चाललं होतं. अच्युतच्या मनातल्या सुप्त इच्छा, त्यासाठी त्याने केलेली यातायात सर्व किती निरर्थक होतं. तो जर तिच्याशी चार शब्द बोलला असता तर त्याला समजलं असतं की ती पैशांसाठी, डामडौलासाठी, छानछोकीसाठी हपापलेली नाही आहे. ती तिच्या संसारात सुखी आहे. पायाखालच्या रस्त्यावरची नजर काढून नाही तिथे आकाशाकडे नेली की हमखास ठेच लागते - हे तिला कोणी शिकवावं लागलं नव्हतं; पण अच्युतचं असमाधान केवळ पैशासाठी नसावं - कदाचित ताईने श्रीमंत घरी पडल्यावर त्याला दिलेली कमीपणाची वागणूक हेही असू शकेल... हा प्रदेश धोक्याचा होता... प्राण गेला तरी अच्युत ते मान्य करणार नाही... पण आता या तात्त्विक चर्चेला तरी काय अर्थ होता? जे व्हायचं ते होऊन गेलं होतं... पण काय भयानक प्रकार !
‘‘भाऊजी, तुमचा असल्या गोष्टींवर विश्वास बसतो !’’
‘‘माझा विश्वास बसण्याचा प्रश्न नाही वहिनी - अच्युतचा आहे ना ! त्याला वाटतंय ना तो

कोणत्या तरी अमानवी, घातकी, शक्तिमान अशा प्रेरणेच्या प्रभावाखाली आलेला आहे? आपल्या हातून काय भलतंच होईल या भीतीने त्याचं काळीज धास्तावलं आहे -''
''पण आता तर ते एक शब्दसुद्धा बोलत नाहीत !''
''या प्रकाराने आणखी पुढची पायरी गाठली आहे एवढंच आपण म्हणू शकतो... त्याचा उगम त्याच्याच मनात आहे, का आणखी कोठेतरी बाहेर आहे हे आपल्याला कसं समजणार? आपण तर या बाबतीत अगदीच अनभिज्ञ आहोत!''
''पण तुम्ही तर अच्युतना मदतीची आशा दाखवली होतीत !''
''पण त्याने मला सवडच दिली नाही ना ! आणि नशीब पहा कसा खेळ खेळतं ते - दुसऱ्याच दिवशी सकाळी मला अगदी अचानकपणे फिरतीवर जावं लागलं... थोडीशी जरी कल्पना असती तरी मी ते कसंही करून टाळलं असतं -- अच्युतशी पार्कमध्ये बोलणं झालं त्याच रात्री वणवण करून, अनेकांना भेटून मी एक नाव - पत्ता मिळवला होता, त्यांना भेटायचं ठरवलही होतं... परत येऊन पाहतो तो काय ! अच्युतचा पत्ता नाही ! चौकशी केली तर समजलं की आधी तुम्ही ऑफिसात येऊन गेलात, दुसऱ्या दिवशी कोणी शंकरराव नावाचे त्याचे नातेवाईक येऊन गेले... तिसऱ्या संध्याकाळी मी ऑफिसमधून सरळ इथे आलो... पाहतो तो दाराला कुलूप ! तरी वाटत होतं एखाद्या डॉक्टरांकडे किंवा जास्तीत जास्त एखाद्या हॉस्पिटलमध्ये गेला असेल... पण शेजाऱ्यांकडे चौकशी केली तेव्हा समजलं की आदल्या रात्रीच तुम्ही सगळे मुंबईला गेलात ! कोणालाही कोठे गेलात, केव्हा परत येणार कशाची माहिती नव्हती !''
''अहो, इतकी धावपळ झाली की कोणाशी एक शब्दसुद्धा बोलायची सवड मिळाली नाही -'' यांना कशाला आपला एकाकीपणा सांगायचा !
''वहिनी, तुमचे शेजारी किती चांगले आहेत ! त्यांना अच्युतच्या आजाराने केवढी हळहळ वाटत होती ! तुम्ही एकट्याएकट्याने जी सारी धावपळ करीत होतात त्याचं कौतुक होतं ! साऱ्यांची इच्छा होती अच्युत लवकर खडखडीत बरा होऊन परत यावा !''
नलिनीचा आपल्या कानांवर विश्वास बसत नव्हता ! ज्यांना ती माणूसघाणे, गर्विष्ठ 'स्नॉब' समजत होती ती खरोखरीची इतकी आपुलकीची माणसं होती तर ! फक्त ते समजायला तिला या त्रयस्थाच्या पूर्वग्रहविरहित नजरेची आवश्यकता होती !
तिचं लक्ष मूळ प्रश्नावर आलं.
''कोणता नाव-पत्ता म्हणत होतात?''
''एक भगत म्हणून आहेत. त्यांची एक स्वतंत्र बैठी मठी आहे. पूर्वी गावाबाहेर असेल - आता चारी बाजूनी डेव्हलपमेंट झाली आहे. तिथे ते एकट्यानेच राहत असतात. आसपासच्या लोकांना त्याची खास अशी काही माहिती नाही. तसा त्यांचा कोणाशीही संबंध येत नाही - त्यांच्यापासून आसपासच्यांना काहीही त्रास होत नाही; पण सगळे त्यांना जरा वचकूनच होतेसे दिसले. आपल्याला या भगतांकडेच अच्युतला न्यायला हवा -''
''त्यांना कोठे न्यायचं म्हणजे एक दिव्यच आहे !'' नलिनी म्हणाली.
''नाहीतर असं करू या का? त्या भगतांनाच इथे येतं का ते पाहूया का?''

दोघं एकमेकांशी बोलण्यात इतके गढून गेले होते की त्यांचं आतल्या खोलीच्या दाराकडे लक्षच नव्हतं.
दारातून जेव्हा मोठ्याने हू ! हू ! हू ! असा कण्हण्याचा आवाज आला तेव्हा दचकून त्यांनी मागे वळून पाहिलं.
दारात अच्युत उभा होता - पण क्षणभर नलिनीला हा अच्युतच आहे हे ध्यानातच आलं नाही. केस पिंजारलेले होते. दोन्ही हातांच्या घट्ट आवळलेल्या मुठी कानांपाशी दाबून धरल्या होत्या. डोळे खूप मोठे, विस्फारलेले होते, लालभडक झालेले होते. एखादा खूप मोठा श्वास घेतल्यासारखं तोंड आणि गाल फुगून लाल झाले होते... मानेजवळच्या शिरा तट्ट फुगल्या होत्या. सर्व शरीर खूप हिव भरल्यासारखं थरथर कापत होतं - मधूनच खांद्यांना, छातीत एक झटका येत होता...
अच्युतला पाहून नलिनी थक्कच झाली होती. कितीतरी दिवसांत त्याने आपण होऊन केलेली पहिली हालचाल होती.
पण कसला भयंकर चेहरा ! आणि कसली वेडीवाकडी हालचाल !
त्यापेक्षा तो निपचित पडलेला होता तोच बरा होता... गोपाळच्या सांगण्यातलं एक वाक्य तिला आठवलं - परांड्यांच्या पत्नी म्हणाल्या होत्या, ‘‘आधी नुसते निपचित पडलेले असायचे - पण हे विजेचे शॉक दिल्यापासून असा धिंगाणा सुरू झाला आहे !’’
अच्युतच्याही बाबतीत त्याच प्रकारची पुनरावृत्ती होत होती का काय?
‘‘वहिनी, तुम्ही आता इथेच थांबा... वाटलं तर शेजाऱ्यांना बोला... जमेल तितक्या लवकर मी येतोय... पाहतो ते येताहेत का...’’
मुद्दाम त्याने ‘भगत’ नाव उच्चारलं नाही. कारण त्याच्या मनात अशी एक विचित्र शंका आली होती की आपल्या संभाषणात हे भगतांचे नाव आल्याबरोबर हा अच्युत खाटेवरून उठून दारापाशी आला होता... असं खरोखर असेल तर लक्षण काही चांगलं दिसत नव्हतं... भगतांच्या नुसत्या नावाचा असा परिणाम होत असेल तर अच्युतमध्ये कशाचा तरी संचार झाला आहे, तो कोणत्यातरी अमानवी, दुष्ट शक्तीच्या प्रभावाखाली आहे हेच उघड होत नव्हतं का?

□□□

3

भगत बाहेरच्या लहानश्या अंगणात हात पाठीशी घेऊन येरझारा घालीत होते. पन्नासएक वर्षांपूर्वी ते या मठीत राहायला आले तेव्हा आसपास किर्रर्र झाडी होती. शहर इतक दूर होतं की शहराचे दिवेसुद्धा येथून दिसत नव्हते; पण वर्षे उलटत गेली तशी शहराची वाढ होत गेली होती, आणि आता शहराने त्यांची लहानशी मठी चारीबाजूंनी वेढून टाकली होती. सुरुवातीस सुरुवातीस त्यांना या कलकलाटाचा, गजबजाटाचा खूप राग यायचा - पण स्वत:शी हसून त्यांनी आपल्या वैयक्तिक कार्यक्रमात योग्य तो बदल केला होता. त्यांच्या दररोजच्या साधनेच्या वेळा बदलल्या होत्या. तरीही आसपास एखादा विवाह सोहळा किंवा एखादा सार्वजनिक कार्यक्रम असला तर लाऊडस्पीकर्सचा, लोकांच्या गोंगाटाचा इतका त्रास होई, की त्यांना वाटे आपला मुक्काम या मठीतून हलवावा; पण अर्थात तो विचार पळभराहून जास्त काळ टिकत नसे, आणि त्यात गांभीर्यही नसायचं. कारण त्यांना मठी हलवण्याचा अधिकारच नव्हता. त्यांचं अल्प - दीर्घ जे काही आयुष्य असेल तेवढ्याच कालापुरते ते या वास्तूचे रहिवासी होते. त्यांच्यानंतर पुढचा 'भगत' येईल... जसे ते स्वत: एका रात्री मागच्या 'भगत'ची जागा घ्यायला आले होते.

अर्धशतकापूर्वीच्या त्या निराशेच्या काळरात्री विशीचा एक तरुण पुराच्या उसळत्या पाण्यात जीव देण्यासाठी पुलाच्या कठड्यावर चढला होता तेव्हा एक हाक आली होती...

''थांब !'' अंधारातून एक वृद्ध त्याच्यापाशी पोहोचला होता.

''आयुष्याला इतका विटला आहेस? टाकून द्यायला निघाला आहेस? मग मला दे !'' म्हणाला होता. त्याने नावगाव, कारण काही विचारलं नव्हतं.

''या क्षणापूर्वीपर्यंतचं तुझं आयुष्य विसर. आता नव्याने जगायला शीक. तुझं नाव भगत.'' तो वृद्ध म्हणाला होता आणि त्याला या मठीत घेऊन आला होता. कठीण, कठोर आणि दीर्घ साधनेला सुरुवात झाली होती.

मठीतल्या ग्रंथसंग्रहात नाना भाषांतले, नाना माध्यमांत रेखलेले ग्रंथ होते. काही लाकडांच्या पातळ फळ्यांवर होते. काही भूर्जपत्रांवर होते. काही भाजलेल्या मातीच्या चौकोनावर होते. काही चर्मपृष्ठांवर होते. सर्वच काही संस्कृतात, पालीत, अर्धमागधीत, प्राकृतात नव्हते. काही ब्राह्मी लिपीत होते. काही चित्रलिपीत होते. काही तर मातीत कोरलेल्या त्रिकोनी, चौकानी 'क्यूनीफॉर्म' लिपीत होते. तितक्याच भाषा... प्रत्येक ग्रंथाची 'किल्ली' त्यात होती. त्या 'किल्ली'चाही अर्थ समजून घ्यावा लागत होता - तिथे वृद्धाची मदत व मार्गदर्शन होतं.

''तुझं कुतूहल शमवण्यासाठी मी हे सांगत नाही -'' तो वृद्ध (भगत) एकदा म्हणाला होता, ''आपल्या पिठाची परंपरा तुला माहीत असावी म्हणून हे सांगत आहे. आणखी वर्षभराने मी तुला सविस्तर माहिती असलेला ग्रंथ देईन. तेव्हा त्यात मी माझं टिपण करणार आहे. तूही शेवटच्या दिवशी तुझं टिपण कर. पण एवढं ध्यानात घे - इथे काही नेहमीच अशी आलिशान वास्तू नव्हती. ही मी बांधली. त्याआधी साधी विटांची, मातीच्या

गेलाव्याची इमारत होती. तिच्याही आधी कुडांच्या भिंतीच्या खोल्या होत्या. त्याच्याही आधी लाकडाच्या रिफाडाच्या भिंती होत्या. एकदा अगदी घडीव दगडांचा प्रासाद होता. त्या आधी बांबूच्या भींती होत्या. त्या आधी कच्च्या, न भाजलेल्या मातीच्या भेंड्यांचा आडोसा होता. त्या आधी एक पर्णशाळा होती. त्याही आधी एक वृक्षच फक्त निवाऱ्याला होता. अगदी अगदी पूर्वी एका गुहा होती. पण हे सर्व नश्वर आहे. अनेक नैसर्गिक आणि मानवी आपत्ती आल्या आहेत. कधी पूर आले, कधी धरणीकंप झाले, कधी लढायांच्या क्षेत्रात हे आवार सापडलं... कुंपणाला, भिंतीना, इमारतींना काहीही महत्त्व नाही. हे आपण मर्यादा घातलेलं आवार सुरक्षित आहे. इथे राहणारा 'भगत' - त्याला कधीही, कसलीही इजा वा दुखापत होत नाही. पाण्याच्या प्रवाहात काचेचा चौकोन कितीही दीर्घकाळ ठेवला तरी तो जसा कोरडाच, अस्पर्शित राहतो तसा हा आपला अवकाश आहे... वरवर साधा दिसणारा; पण आसपाच्या कालप्रवाहापासून, जगप्रवाहापासून सर्वस्वी वेगळा आणि अलिप्त असा आहे... आता हे पुन्हा सांगणार नाही... अशी ही अतिप्राचीन परंपरा तुला पुढे चालवायची आहे...''

याच संदर्भात पुन्हा एकदा बोलताना...

''इथल्या गुणधर्मात अनेकांनी अनेक प्रकारची भर घातली आहे. एखाद्या साम्राज्याच्या-राजधानीच्या संरक्षणात, वैभवात सम्राटांचे वारस जशी भर घालतात तसंच... फक्त या रचना अमूर्त आहेत, साध्या नजरांना अदृश्य आहेत... तूही तुझ्या शक्तीप्रमाणे त्यात भर घालशीलच. तुला हा अनुभव येईलच. एखाद्या साध्या टिंबावर नजर एकाग्र केली की अंतर्मनातल्या अगदी खोलवरच्या पातळीवरचे आकार तिथे दिसायला लागतात... असं वाटतं की दैवी चमत्कारानेच काही नव्या शक्तिरचना प्रकट झाल्या आहेत... पण प्रत्यक्षात तसं नाही. ज्या विषयाला आपण वाहून घेतो त्या विषयावर मेंदू आणि बुद्धी दिवसाचे चोवीस तास सतत अथक चिंतन-मनन करत असतात. त्यातून या नव्या कल्पना उदयास येत असतात. आणि दुष्ट शक्तींशी, पापी प्रेरणांशी संघर्ष हा तर आपल्या अल्पजीवनातला अपरिहार्य भाग आहे. ते आपले सततचे आणि कायमचे वैरी आहेत. आणि जशी आपल्यात तशी त्यांच्यातही सतत उत्क्रांती होतच असते... दरवेळी ते नव्या उमेदीने, नव्या उत्साहाने, नव्या आशेने कटकारस्थानं रचत असतात. आपला पराभव होता कामा नये... कसोटीच्या क्षणी आत्मार्पण करावं लागलं तरी चालेल; पण वैऱ्यांच्या हाती काहीही लागता कामा नये... पण आजवर आपला पराजय झालेला नाही... पण त्यांच्या नवनव्या साधना त्यांच्या नाशानंतर आपल्या अंकित होतात... त्यांचीही संरक्षणाच्या व्यूहरचनेत भर पडते...''

पुन्हा ते या विषयावर बोलले नव्हते आणि अर्थात दिवस उलटत चालले तशी त्यांची आवश्यकताही राहिली नव्हती. नव्याने आलेला 'भगत' प्रत्यक्षानुभूतीनेच सर्व आकलन करून घेत होता. एकाएकी त्यांचा प्रयाणाचा दिवस आला. किती अनपेक्षितपणे ! अपरिहार्य असला, ती आणखी लांबणीवर पडावा अशी मनोमन इच्छा झाली. देवांनाही वियोगाचे अश्रू आवरत नाहीत... तो तर साधा मानव ! बुद्धी कितीही कुशाग्र झाली, कितीही प्रगल्भ झाली, तरी विकारांचं आकलन कोणालाच कधीही झालेलं नाही. ते सतत बुद्धीच्या आवाक्याबाहेरच राहिलेले आहेत.

त्या संध्याकाळी वृद्ध भगतांनी तो प्राचीन ग्रंथ काढला. गेली कितीतरी शतकं त्यात विविध हस्ताक्षरांत नोंदी झाल्या होत्या. एक तर (आता काळसर पडलेल्या) लाल रक्तरेषातला तारा होता. त्या कालच्या 'भगतांना' तो रेखाटल्यापुरताच अल्प अवधी मिळाला असेल... आता वृद्ध भगतांनी आपल्या तीन ओळी लिहिल्या आणि ग्रंथ त्याच्या स्वाधीन केला. तो मठीचा उत्तराधिकारी आणि तिथल्या परंपरेचा संरक्षक झाला होता. त्या रात्रीच्या फलाहारानंतर त्यांनी आपल्या खांद्यावरची कशिदा कामाची शाल उतरवली आणि ती आपल्या हातांनी त्याच्या खांद्यावर लपेटली. त्या वस्त्राचा स्पर्शच शक्तिमयी होता.
त्यांनी एक साधं पांढरं उत्तरीय खांद्यावर टाकलं आणि ते निघाले.
''मी आपल्याबरोबर काही अंतर येऊ का?''
''अवश्य चल. पुलावर जेथे तुझी माझी प्रथम भेट झाली तिथपर्यंत यायला काहीच हरकत नाही.''
रात्रीच्या नि:शब्द काळोखापासून ते चालले होते. आता अवस्था शब्दांच्या पलीकडे पोहोचली होती. एकत्र सहवासाचे हे शेवटचे काही क्षण होते. त्या पहिल्या भेटीच्या आठवणी मनात आल्याखेरीज कशा राहतील? पण आज नदीला पूर नव्हता. या वियोगाच्या प्रसंगी तीही मलूलपणे वाहत होती. तो पुलाचा मध्य आला, जिथे कितीतरी दिवसांपूर्वी तो अविचाराने जीव द्यायला निघाला होता.
'भगता'नी त्याला तिथेच थांबवलं, खांद्याला हाताचा पुसटसा स्पर्श केला आणि मग लागलीच ते चालायला लागले.
ती पंधरावीस सेकंद त्याला असा भास झाला की समोर दिसतो तो आपल्या ओळखीचा, परिचयाचा पूल नाहीच... त्या सेतूखाली साधी नदी नाही, एक अतिखोल पाताळदरी आहे, जिच्या तळाशी ती मर्यादानदी वैतरणी वाहत आहे...
भगतांनी पूल ओलांडला. पलीकडच्या तीरावर त्यांच्या स्वागतासाठी अनेक शुभ्र आकृती उपस्थित होत्या...
मग क्षणार्धात ते स्वप्नदृश्य विरघळलं. त्या क्षणापुरती तेजाला, सुगंधाला, सुस्वरांना ओहोटी लागली होती...
मग रोजच्या ज्ञात जगाच्या कठोर रेषा एकत्र आल्या.
जड पावलांनी 'भगत' मठीत परत आले.
ते सहसा मठी सोडून बाहेर जात नसत. मनासमोर अभ्यासाचा जो पसारा उलगडला होता त्यातला या अल्प आयुष्यात किती पूर्ण होतो याचीच त्यांना शंका होती. क्षण आणि क्षण अमूल्य होता. त्यातला एकही दवडायला ते तयार नव्हते.
आसपास वस्ती आली होती. आसपास राहणाऱ्या, वावरणाऱ्या लोकांना आपल्याबद्दल काय वाटतं याचा त्यांनी कधी विचारही केला नव्हता. कारण त्यांचं सर्व आयुष्यच सर्वसामान्यांपेक्षा एका वेगळ्या पातळीवर जगलं जात होतं.
काहींना ते छंदिष्ट वाटत. काहींना ते निरुपद्रवी वाटत.
एका भुरट्या चोराला ते सोपं सावज वाटले होते. एकटाच्या एकटा म्हातारा. खूप मोठं डबोलं मिळेल अशा आशेने एका अंधाऱ्या रात्री त्याने उघड्या फाटकातून उघड्या

दारातून आत प्रवेश केला होता.
फाटकातून आत येताना शेजारच्या लोखंडी गजांच्या कंपाऊंडचा झालेला खण् ! आवाज - तिकडे त्याने लक्ष दिले नव्हतं. आता खोलीत शिरल्यावर मागे फरशीवर पुन्हा खण् ! आवाज झाला तेव्हा त्याने मागे वळून पाहिलं. कंपाऊंडचे दोन लाल गज दाराच्या आत फरशीवर उभे होते. आपोआप झालं होतं की मुद्दाम केलं होतं. कोणास ठाऊक - पण गजांचा वरचा भाग बिनडोळ्यांच्या चेहऱ्यासारखा दिसत होता. त्या खाली अरुंद खांदा होता. त्याखाली दोन अगदी लहान हात होते. खूप उंच शरीराच्या शेवटास दोन लहान जाडसर पाय होते... आता दोन्ही गज सावकाश सावकाश डोलत होते... आणि मध्येच 'खण् !' आवाज होऊन त्याचे जाड पाय फरशीवर आपटले...
नको ! नको ! जातो ! जातो ! पुन्हा कधी येणार नाही ! असं काहीतरी बरळत, जवळजवळ रडतच, कापणाऱ्या पावलांवर तो चोर त्यांच्यातून पळत पळत बाहेर गेला होता... मठीचं आवार संस्कारित, सुरक्षित होतं...
असे हे भगत सायंकाळी अंगणात येरझारा घालत होते.
तो तरुण माणूस त्यांच्या बंगल्याबाहेरच्या रस्त्यावरून दोनतीनदा तरी गेला. आत येण्याआधी मनाचा हिय्या करण्याची पूर्वतयारीही करीत असेल. शेवटी तो एकदम फाटकातून आत आला. भगत वळून समोर येईपर्यंत तो थांबला आणि मग हात जोडून म्हणाला,
''नमस्कार, मी भगतांना भेटायला आलो आहे. ते आहेत का?''
''मीच भगत. तुझं काय काम होतं?''
''माझं नाव गोपाळ उपाध्ये. आपण मला थोडासा वेळ देऊ शकल का? आपल्याला काही सांगायच आहे...''
''ये, आत ये. तिथे सांग काय सांगायचं ते.''
त्यांच्या मागोमाग आत जाता जाता गोपाळ मनाशी नवल करीत होता. हे तर अगदी साधे गृहस्थ दिसतात. एक पाढरंशुभ्र धोतर. तसंच पांढरं शुभ्र उपरणं. वयाने किंचित चोपलेला चेहरा. कपाळाला भस्म. नितळ नजर. जुन्या पिढीतले एखादे कर्मठ ब्राह्मण; पण त्यांच्याविषयी जे कानावर आलं आहे त्या काही अतिशयोक्तीचा भाग तर नसेल ना? आपण नलिनीला दाखवलेली आशा फोलच ठरणार नाही ना?
आतली खोली व्हरांडेवजा होती. तिन्ही बाजूंनी खिडक्या होत्या. सर्व खोली संध्याकाळच्या सोनेरी पिवळ्या प्रकाशाने उजळून निघाली होती. साध्या पण अतिशय आरामशीर खुर्च्या भिंतीनी लागून मांडलेल्या होत्या. एकीत स्वत: बसत दुसरीकडे भगतांनी बोट केलं.
''बस आणि सावकाश सांग कशासाठी माझ्याकडे आला आहेस ते.''
वेळ महत्त्वाचा आहे, गोपाळने मनाशी विचार केला. आडून आडून बोलण्यात, वेळ दवडण्यात अर्थ नव्हता. स्पष्ट शब्दात विचारावं, ते जर काही मदत होणार नाही म्हणाले तर सरळ बाहेरची वाट धरावी.
''भगत, माझ्या एका मित्रावर अगदी विलक्षण आपत्ती आलेली आहे. प्रत्येक मिनिट मोलाचा आहे. तेव्हा माझ्या वागण्यात जर आपल्याला काही गैर आणि अप्रशस्त

आढळलं तर कृपा करून मला साफ करा. भगत, मी असं ऐकलं आहे की एखादा अभागी जीव जर पिशाच्च बाधा, अंगात येणं, करणी, चेटूक, भानामती असल्या सैतानी चक्रात अडकला तर तुम्ही त्याला साहाय्य करून त्यातून सोडवता. हे खरं आहे का ?''
भगत जरासे हसले.
''तू स्पष्ट वक्ता आहेस खरा ! आणि तुला असं म्हणायचं आहे की तुझा मित्र अशा एखाद्या आपत्तीत सापडला आहे?''
''हो.''
''त्याचा तुझ्यापाशी काय पुरावा आहे?''
''तो लाकडाच्या ठोकळ्यासारखा बिछान्यावर पडून असायचा. बाहेरच्या खोलीत मी आणि त्याची पत्नी बोलत असताना तुमच्या नावाचा उल्लेख आला. तुमचं नाव उच्चारलं जाताच तो बिछान्यावरून उठला, झिंगत झिंगत खोलीच्या दारापर्यंत आला... दात आवळून, आग ओकणाऱ्या लाल डोळ्यांनी आमच्याकडे पाहत होता... मी त्याला त्याच्या पत्नीच्या स्वाधीन करून तडक तुमच्याकडे आलो आहे... तिथे काय अनर्थ माजला असेल देवासच माहीत ! ती घरात एकटीच्या एकटी... आणि हा पिसाळलेल्या जनावरासारखा खवळलेला !''
गोपाळचे शब्द ऐकता ऐकत भगत आधी स्तब्ध आणि मग ताठ झाले होते. ते खुर्चीवरून उठले.
''वेळ महत्त्वाचा आहे हे तुझं म्हणणं खरे आहे. ये, आत ये...'' त्यांच्या मागोमाग गोपाळ आतल्या खोलीत गेला. ही अभ्यासाची मनन चिंतनाची खोली होती. एका कपाटातून भगतानी पाचसहा अगरबत्त्या काढल्या, त्याच कपाटातल्या एका काचेच्या बहुकोनी शिशीतून तीनचार चिमटी भस्म एका कागदावर घेतलं, त्याची पुडी केली. दोन्ही गोपाळच्या हातात देत ते म्हणाले,
''तू आता जा. घराबाहेरच अगरबत्ती पेटव आणि एकदम आत जा. भस्माची पातळसर रेघ सर्व दारं आणि खिडक्या यांच्या आतल्या अंगाला खोली ओढ. सर्व अगरबत्त्या एकामागून एक अशा लाव. तोपर्यंत तो बराच शांत झालेला असेल. बहुतेक झोपेल. पण झोपला नाही, जागा राहिला तरी कोणाला काही उपद्रव होणार नाही. उद्या सकाळी तू इथे ये. मग आपण पाहू. जा आता.''
भगतांना एक अर्धवट नमस्कार करून गोपाळ त्यांच्या मठीतून घाईने बाहेर पडला. भगतांचा प्रत्येक शब्दातला आत्मविश्वास इतका दांडगा होता की त्यांच्या शब्दावर शंका घ्यायचा विचारही त्याच्या मनात आला नाही.
नलिनी काही बोलायच्या आत गोपाळ गेलाही होता. अच्युत तसाच दारात हेलकावे खात उभा होता. आता त्याच्या आवळलेल्या दातांतून हं- हं- हं- हं- असा घुमण्याचा आवाज यायला लागला होता. आता त्याने जर काही आक्रस्ताळेपणा केला तर ती एकटी त्याला कशी आवरणार? गोपाळ म्हणाला होता, शेजाऱ्यांची मदत घ्या. आता ती वेळ आली होती. भीड-भाड, लाजलज्जा सर्व काही बाजूला ठेवून ती बाहेरच्या दाराबाहेर आली, दाराला बाहेरून कडी लावली, आणि घाईघाईने जाऊन तिने शेजारच्या दोन्ही दारांवर हाताबुक्क्यांनी आवाज केले. या क्षणी शेजाऱ्यांची आडनावंही

तो विसरला होता.
‘‘काय आहे? कोण आहे? काय झालंय्?’’ विचारत तीन पुरुष व दोन स्त्रिया दारांतून बाहेर आले होते.
‘‘अहो, जरा माझ्याकडे येता का? हे कसं करताहेत पाहता का? गोपाळ भाऊजी गेले आहेत, ते एवढ्यात कोणालातरी घेऊन येतीलच - तोवर जरा चलता का यांना आवरायला?’’
त्या तीन पुरुषांनी क्षणभर एकमेकांकडे पाहिलं. आणि मग एक म्हणाला,
‘‘हो हो चला येतो ना नलिनीताई ! चला, आम्ही आलोच !’’
तिने जरा बिचकतच बाहेरच्या दाराची कडी काढली. मघाशी तिने दिवा लावला होता... पण खोलीत पार अंधार होता. दिवा गेला होता की अच्युतनेच स्वत: तो मालवला होता? खोलीत कोणीतरी जोरजोराने गरगर फिरत होतं, भिंतींवर सामान आपटत होतं... हं - हं- हं- हं- घुमण्याचा आवाज येतच होता.
त्या तिघांनी याची खासच कल्पना केली नव्हती. तरीही त्यांच्यातल्या एकाने प्रसंगावधान राखून बाकीच्यांना सांगितलं,
‘‘आपण दार अडवून उभे राहू... अच्युतरावांना घराबाहेर जाऊ द्यायचं नाही...’’ मग मागे वळून पत्नीला उद्देशून,
‘‘अगं, आपला टेबलावरचा मोठा टॉर्च आणतेस का?’’
टॉर्च येईपर्यंत ते तिघं तसेच दारात उभे होते. खोलीतून तो धडपडीचा, पळण्याचा आणि घुमण्याचा आवाज येतच होता. अच्युतने खरोखरच दाराच्या दिशेने झेप घेतली असती तर त्या तिघांची फळी अभेद्य राहिली असती का नाही शंकाच आहे; पण ती वेळ आलीच नाही. टॉर्च आणणाऱ्या बाईनाच त्यांनी आत झोत टाकायला सांगितलं. अच्युतचा अवतार खरोखरच भितीदायक झाला होता. त्याच्या अंगावरचे कपडे फाटले होते, ठिकठिकाणी धूळ लागली होती. हातांना कोठे कांचेच्या, कोठे खिळ्यांच्या बारीक जखमा झाल्या होत्या. त्यातून आलेल्या रक्ताचे कपड्यांवर आणि तोंडावर डाग पडले होते. तो आपल्या स्वत:च्या कल्पनेच्या विश्वात दंग होता. टॉर्चच्या प्रकाशाकडे किंवा दारात जमलेल्या लोकांकडे त्याचं अजिबात लक्ष नव्हतं. त्या तिघांच्यातला एकजण जरा पुढे झाला आणि म्हणाला,
‘‘अच्युतराव, जरा शांत पडून का राहत नाही तुम्ही? स्वत:ला विनाकारण दमवून कशाला घेता? तुम्हालाच त्रास नाही का होत?’’
अच्युतपुरतं बाह्य जग अस्तित्वातच नव्हतं. हे शब्द त्याच्या गावीही नव्हते. त्याच माणसाने दोन्ही हातांनी उरलेल्या दोघांना खूण केली,
‘‘त्यांची आपल्याकडे पाठ झाली की पुढे होऊन त्यांना एकदम धरू.’’ तो म्हणाला,
‘‘तसेच ओढत पलंगाकडे नेऊ आणि तिथे चादरीने पलंगाच्या कठड्यालाच हातपाय बांधून टाकू.’’
स्त्रियांचं आपल्यावर लक्ष आहे हे त्या तिघांच्या ध्यानात होतं. ते एकटेच असते तर त्यांनी हा धीटपणा दाखवला असताच अशी काही खात्री देता येत नाही; पण आता आवश्यक ते धैर्य दाखवावंच लागलं. अच्युतची पाठ वळताच त्यांच्यातला म्होरक्या म्हणाला,

''आता !''
त्या तिघांनी जाऊन अच्युतला धरला. त्याने थोडीशी धडपड केली; पण तेवढीच. कदाचित त्याच्या कल्पनेतल्या त्या जगात त्याचा जो काही उपक्रम चालला होता त्यासाठी हातपाय मोकळे असलेच पाहिजेत अशी आवश्यकता नसावी. कारण त्यांच्याबरोबर तो निमूटपणे आत गेला, पलंगावर निजवला तसा निपचितपणे पडून राहिला, हातपाय पातळ चादरीनी पलंगाच्या कठड्याला बांधले तरीही त्याने काही विरोध केला नाही. फक्त तोंडाने तो घुमण्याचा आवाज अव्याहतपणे येतच होता.
''नलिनीताई,'' बरोबर आलेल्या स्त्रियांपैकी एक म्हणाली, ''चला, आमच्या घरी जराश्या - आता हे तिघं इथे थांबतील - तुमचं कोण येणार आहे ते आले की मग या - घटकाभर विश्रांती तरी मिळेल.''
त्या म्हणत होत्या ते खरं होतं. या क्षणी तरी अच्युत सर्वांच्याच ओळखीपलीकडे गेला होता. पलंगाशेजारच्या त्या तिघांसारखीच तीही त्याला परकीच झाली होती. ती त्यांच्यामागोमाग त्यांच्या घरात गेली, स्वयंपाकघरात एका खुर्चीवर मागे पाठ लावून, डोळे मिटून बसून राहिली. याक्षणी तिला कसलाही विचार नको होता. काय झालं होतं, का झालं होतं, यापुढे काय होणार होतं... याक्षणी तिला कसलाही विचार नको होता. शरीराला आणि मनाला जराशी विश्रांती हवी होती.
हातात चहाचा कप आला. तो अमृतासारखा मधुर वाटला.
''एखादी गोळी देऊ का? सॅरीडॉन? अॅस्पीरीन?'' त्या विचारत होत्या. हातानेच नकोची खूण करीत नलिनी म्हणाली, ''नुसतं बसू द्या जरा वेळ. आमचे ते गोपाळभाऊजी आले की मला सांगा. आणि तुमच्या सर्वांच्या मदतीचे उपकार कसे मानू मी?''
''विसराहो उपकारांच ! अशावेळी मदत नाही करायची तर मग केव्हा?'' तिच्या हातातला चहाचा कप काढून घेत त्या म्हणाल्या, ''बसून राहा अशाच शांतपणे - तुमचे ते गोपाळराव आले की सांगते...''
तिच्या खांद्यावरची जबाबदारी प्रच्छन्नपणें प्रथमच आता दुसऱ्या कोणीतरी घेतली होती. नलिनी मागे टेकली. कदाचित तिला लहानशी डुलकीसुद्धा लागली असेल. अनेक आवाजांनी तिला दचकून जाग आली. खाली रिक्षाचा आवाज आला आणि त्याचवेळी तिच्या घरातून मोठा आरडाओरडा झाल्याचा आवाज आला. ती एकदम खुर्चीतून उठली.
त्या तिघांपैकी एकजण अच्युतच्या उशाजवळच बसला होता. बाकी दोघांनी बाहेरच्या खोलीतल्या घडीच्या खुर्च्या आणल्या होत्या. तिघंही अच्युतकडेच पाहत होते. त्याची जळती नजर खोलीच्या कोपऱ्या कोपऱ्यातून फिरत होती. त्या विचित्र नजरेला समोर बसलेले ते तिघे दिसत नव्हते... पण नजरेतील भावावरून दुसरंच काहीतरी दिसत असावसं वाटत होतं. तोंडातून तो घुमण्याचा आवाज सतत येतच होता.
''काय विलक्षण प्रकार आहे नाही?''
''नशीब त्याने विरोध केला नाही... नाहीतर कठीण होतं.''
''तसा अंगाने किरकोळ तर आहे -''

‘‘अहो अशा झपाटलेल्या माणसांच्या अंगात भलतंच बळ असतं म्हणतात ! चार चार लोकांना आवरत नाहीत म्हणे !’’
‘‘काय प्रकार आहे हो?’’ हलक्या आवाजात.
‘‘मला तर साधा प्रकार वाटत नाही. तसा माणूस अबोल; पण सरळमार्गी. कोणाच्या अध्यात नाही की मध्यात नाही.’’
‘‘अशी वरवर साधी साळसूद वाटणारी माणसंच शेवटी चकवतात ! काहीतरी भलतचं करून बसतात !’’
‘‘मला नाही तसं वाटत... कसल्यातरी आपत्तीत सापडला आहे हे मात्र खरं... अहो, गेला महिनाभर या घरात काहीतरी गोंधळ चाललेला दिसतोय... खूप वाटलं मदत करावी... पण आपल्याला बोलावल्याखेरीज कशाला नाही तिथे नाक खुपसायला जायचं?’’
‘‘पण त्या बाईची मात्र कमाल आहे ! इतके दिवस बिचारी एकटीच सगळं करते आहे... कुठे मुंबईला नेलं होतं वाटतं... आजच परत आलेले दिसतात.’’
त्या तिघांच्यातली अशी फुटकळ चर्चा चालूच राहीली. खरा प्रकार कोणालाच माहीत नव्हता. शारीरिक वा मानसिक विकारांच्या लक्षणांची कोणालाही काहीही माहिती नव्हती. तेव्हा तर्क-वितर्क आणि कानावर आलेल्या काही दंतकथा याखेरीज ते तरी इतर काय बोलणार? वास्तविक या अचानकपणे गुदरलेल्या प्रसंगाने त्यांचे घरगुती कार्यक्रम पार विस्कटले होते - पण शेवटी शेजारधर्म म्हणून काही होताच. नलिनीचे ते कोणी गोपाळभाऊजी येईपर्यंत तरी त्यांना तिथे थांबणं आवश्यकच होतं.
त्या तिघांपैकी एकाचा अकरा-बारा वर्षांचा मुलगा गॅलरीतून खालच्या रस्त्यावर नजर ठेवून होता. खाली रिक्षा थांबून त्यातून एक गृहस्थ उतरताच त्याने अंदाज केला की सगळे लोक ज्याच्या येण्याची वाट पाहत होते तेच हे. तो धावत धावत नलिनीच्या घरात आला.
‘‘बाबा ! तुम्ही म्हणत होतात ना ते आलेत बरं का !’’
पण त्या क्षणी ते तिघंही कामात गुंतले होते. अच्युतच्या हालचालींत एकदम बदल झाला होता. तो आता सर्व शरीराला झटके देत होता. हातपाय सोडवून घ्यायची खटपट करीत होता. गादीवरून सर्व शरीर उंच उचलून दणदिशी परत खाली आपटत होता. तोंडातून आला घुमण्याऐवजी इतरच वेडेबिद्रे आवाज येत होते.
‘‘बाबा -’’ तो मुलगा परत बोलायला लागला.
‘‘थांब रे ! आता आम्हाला वेळ नाही, दिसत नाही का?’’
‘‘ते आलेत एवढंच सांगायचं होतं !’’ आपलं काम करून तो परत बाहेर गॅलरीत निघून गेला. अच्युतच्या या उलघालीचा संबंध गोपाळच्या येण्याशी असेल अशी त्यांना शंकासुद्धा आली नाही. गोपाळ रिक्षाचे पैसे चुकते करून वाड्यात आला, जिन्याच्या पायऱ्या चढायला लागला तशी अच्युतची धडपड जास्त व्हायला लागली. अगदी वर आल्यावर गोपाळला आठवलं की भगतांनी आपल्याला त्या अगरबत्त्या बाहेरच शिलगावायला सांगितलं आहे. त्यासाठी तो दारापासून पाच पावलावरच थांबला आणि त्याने खांद्यावरच्या थैलीतून त्या अगरबत्त्या काढल्या खिशातल्या काडीपेटीतील काडी

काढून त्यातली एक पेटवली मात्र...
आतल्या खोलीत आकांत माजला.
अच्युतच्या तोंडून डरकाळल्यासारखी एक प्रदीर्घ आरोळी निघाली. दचकून ते तिघं जरासे मागे सरले होते. अच्युतने प्रचंड जोराने जी उसळी घेतली तिच्याबरोबर तो पलंगासह उभा राहिला. त्याचे ते पिंजारलेले केस, लाल लाल डोळे, वासलेल्या तोंडातून येणारे भयंकर आवाज, झेप घालण्यासाठी वर घेतल्यासारखे दिसणारे हात... ''अरे ! अरे ! आवरा ! आवरा त्यांना !'' दोघं मोठ्याने ओरडले... पण त्याच्याजवळ जाणं तितकं सोपं नव्हतं. त्याच्या शरीराला दणक्यामागून दणके बसत होते... प्रत्येक वेळी तो जड लोखंडी पलंग खालच्या फरशीवर दण् ! दण् ! करून आपटत होता...
नलिनी शेजारच्या दारातून ''अगंबाई ! काय झालं?'' म्हणत बाहेर येत असतानाच हातात शिलगावलेली अगरबत्ती घेऊन गोपाळने दारातून एकदम आत झेप घेतली... त्याचक्षणी सर्व आवाज, सर्व हालचाल थांबली. अच्युतच्या अंगात संचारलेली सर्व शक्ती क्षणार्धात ओसरून गेली. वर कठड्याला बांधलेल्या हाताना लोंबकळत तो ढिल्या शरीराने उभा होता... ते तिघं आणि गोपाळ पुढे झाले आणि चौघांनी मिळून पलंग पूर्वीच्या जागी परत आडवा केला. पलंगाशेजारच्याच एका कपाटाच्या दारात गोपाळने ती पेटलेली अगरबत्ती खोचून ठेवली.
त्या मिनिटभराच्या विलक्षण धावपळीनंतरची स्तब्ध शांतता हीसुद्धा विचित्र वाटत होती. खोलीत सर्वजण जमले होते. काही वेळ तरी प्रश्नोत्तरात, स्पष्टीकरणात गेला. गोपाळच्या लक्षात आलं. नलिनीची अवस्था कीव करण्यासारखी झाली आहे. तोच पुढे होत म्हणाला, ''तुम्ही सर्वांनी अच्युत नलिनीला ऐन वेळी खरोखरीच मदत केलीत. आभार मानण्याचा औपचारिकपणा मी दाखवत नाही. पण आता मी आलो आहे - मी सारं पाहतो. एकच विनंती आहे - नलिनीवहिनी दिवसभराच्या धावपळीने आणि काळजीने अगदी थकून गेल्या आहेत. आजची रात्र तुमच्यापैकी कोणाकडे तरी त्यांची झोपण्याची सोय झाली तर...?''
त्यांच वाक्य पुरं व्हायच्या आधीच त्या दोघीही म्हणाल्या,
''अहो खरं तर आम्ही तेच सुचवणार होतो - अवश्य सोय होईल त्यांची !''
पण नलिनीची साशंक होती. ''गोपाळ भाऊजी- ?''
''वहिनी, मी अच्युतची व्यवस्थित काळजी घेतो. खरोखरच तुम्ही यांच्याबरोबर जा - रात्रभर आरामात झोप घ्या - नाहीतर उद्या तुमच्यासाठीच डॉक्टरांना आणायला लागायचं !''
खोलीचं दार आतून बंद करून घेतल्यानंतर प्रथम गोपाळने ती भस्माची पुडी काढली आणि घराबाहेर जाणाऱ्या सर्व दारांच्या उंबऱ्यांत आत आणि सर्व खिडक्यांच्या लाकडी फ्रेमच्या आत त्या भस्माच्या पातळ, पण स्पष्ट आणि सलग अशा रेषा काढल्या. नंतर त्याने अच्युतच्या उशाजवळची अगरबत्ती खुर्चीवर चढून वायरिंगच्या एका फटीत खूप उंचावर (अच्युतच्या सहजासहजी आवाक्यात येणार नाही अशा जागी) खोचून ठेवली. अगरबत्तीच्या धुराला एक दर्प होता. त्यात एक उग्र - कडवट सुवास होता, शिवाय आणखीही काही काही होत ज्याची व्याख्याच करता येत नव्हती; पण त्या धुराचा

अच्युतवर क्षणार्धात झालेला परिणाम विस्मयकारक होता.
अच्युत आता अगदी ढिल्या शरीराने निपचित पडला होता. श्वास अगदी मंदगतीने चालला होता. चेहऱ्यावरचे ते हिंस्त्र, उग्र भाव गेले होते. डोळे मिटलेले होते. हाताचे पंजे उघडून सैलपणे पडलेले होते. गोपाळची खात्री झाली की आता त्याच्यापासून धोका नाही. त्याने अच्युतचे हातपाय मोकळे केले, त्याला कुशीवर वळवला. त्याने डोळेसुद्धा उघडले नाहीत. अच्युतच्या डोळ्यांतून दोन अश्रू मात्र उशीवर ओघळले. कदाचित ते ताणाचे असतील, थकव्याचे असतील किंवा खेदाचे असतील. कळायला काय मार्ग होता? अच्युतची मानवी अस्मिता एका अभेद्य पडद्यामागे बंदिवान झाली होती - शब्द आणि दृष्टी - जगाला जोडणारे दोन पाश - दोन्ही तुटले होते.
सर्व रात्र सावध राहायला हवं होतं. तशी त्याने मनाची तयारी केली होती. अगरबत्तीचा जळण्याचा वेग पाहता ती कमीत कमी पाऊण तास तरी विझणारी नव्हती. (एखादा अपघात वगळता.) म्हणजे सहा अगरबत्त्या संपेपर्यंत पहाटेचे अडीच तरी वाजणार. नाकावाटे श्वासाबरोबर शरीरात जाणारा हा धूर मेंदूपर्यंत पोहोचत असला पाहिजे. ट्रॅक्कीलायझर किंवा सीडेटीव्हसारखाच मेंदूवर काहीतरी परिणाम होत असला पाहिजे - येथपर्यंत त्याचं तर्कशास्त्र चालत होतं; पण मग मनात शंका आली - सीडेटीव्हची गोळी कोणीही घेतली तरी तो लगेच गुंगीत जाणार - मग आपण इतका वेळ या अगरबत्तीचा वास घेत आहोत - आपल्याला कशी काहीच सुस्ताई जाणवत नाही? अच्युतवर पाच सेकंदात केवढा परिणाम झाला ! आपल्याला तर उलट ताजंतवानं, उल्हासित वाटत आहे... आणि मग या दाराखिडक्यांच्या आत ओढलेल्या भस्माच्या रेषा कशासाठी? तर्क एवढाच चालत होता की रोजचे नियम इथे लागू पडत नाहीत - प्रसंगांची ही पातळीच काहीतरी वेगळी होती.
आजची रात्र त्याला जागून काढावी लागणार होती. आणि तशी तो काढणार होता. अच्युतच्या बाहेरच्या खोलीत एकच आरामखुर्ची होती- तीच ओढत त्याने आतल्या खोलीत आणली. इतपत आराम पुरे होता - मागे उशी, अंगावर उबदार शाल वगैरे सोपस्कार केले की पाहता पाहता झोप लागायची - जे व्हायला नको होतं. पाय टेकवायला त्याने समोर फक्त एक पत्र्याची घडीची खुर्ची घेतली आणि तो आरामखुर्चीत बसला.
वेळेचा वैयक्तिक अंदाज कायम चूक असतो. अर्धा तास उलटला असेल म्हणून घड्याळात पाहावं तर जेमतेम दहा मिनिटंच गेलेली असतात. तेव्हा त्याने घड्याळाकडे पाहणंच सोडून दिलं होतं. मात्र दुसरी अगरबत्ती विझत आल्यावर तिच्या जागी तिसरी लावताना त्याने घड्याळाकडे नजर टाकली. रात्रीचे बारा वाजायला काही मिनिटं कमी होती.
कितीही प्रयत्न केला तरी झोप आपल्या चोरपावलांनी येत असते. बाराला एखादा मिनिट कमी असताना त्याला अगदी लहानशी डुलकी लागली असावी. त्यातून तो दचकून जागा झाला. अच्युतची खाट रिकामी होती. (खूप नंतर गोपाळला शंका आली की ती डुलकी नैसर्गिक नसावी - त्या रात्री फारच थोड्या गोष्टी नैसर्गिकपणे होत होत्या.) अच्युत खाटेवरून उतरला असला तर अजिबात आवाज न करता,

चोरट्यासारखा उतरला असला पाहिजे. स्वत:बद्दल किंवा अच्युतबद्दल गोपाळला यत्किंचितही काळजी वाटत नव्हती. केवळ पाच मिनिटांच्या सहवासातच भगतांच्या शब्दावर त्याचा विलक्षण विश्वास बसला होता; पण हा अच्युत गेला होता कोठे? करीत तरी काय होता?
त्या खोलीतला एक मंद रात दिवा सोडला तर घरातले इतर सर्व दिवे बंद होते. अंधार आणि शांतता. अच्युत काही हालचाल करीत असला तर एवढासाही आवाज येत नव्हता. गोपाळही स्वत: अतिशय सावकाश, काळजीने खुर्चीवरून उठला, बाहेरच्या खोलीत दारापाशी आला. दारंखिडक्या स्वत: लावल्याचं त्याला पक्कं आठवत होतं; पण आता गॅलरीतलं दार, दोन्ही खिडक्या सताड उघड्या होत्या. अच्युत दाराच्या दिशेने पावलापावलाने जात होता. रस्त्यावरच्या लांबवरच्या दिव्याचा परावर्तित अस्पष्ट प्रकाश खोलीत येत होता. अच्युत उघड्या दारापाशी पोहोचला आणि थांबला. क्षणभर गोपाळला असा विलक्षण भास झाला की दाराबाहेरच, गॅलरीत, हातभरावर काहीतरी आहे. (काही केल्या डोळ्यांना ते स्पष्ट दिसतच नव्हतं) आणि ते अच्युतला हातांनी बाहेर बोलावत आहे. अच्युतने एक पाय पुढे टाकला... आणि स्स्स् असा आवाज करून मागे घेतला. खालची भस्माची रेषा सोनेरी प्रकाशाने क्षणमात्र लखलखली होती.
व्हारांड्यातल्या खिडकीबाहेर आता ते होते... आणि त्याच्या खाणाखुणांनी (आणि इतर इशाऱ्यांनीही असेल !) अच्युत त्या खिडकीकडे वळला... पण नुसता एक हात गजाकडे जाताच भस्मरेषेतून पुन्हा एकदा ती सोनेरी शलाका लखलखली होती... आणि मग ते तिसऱ्या खिडकीबाहेर होतं... (जी खिडकी जमिनीपासून पंधरा फूट उंचीवर होती !) तिकडे अच्युत वळताच गोपाळने आपली हालचाल केली. घसा मोठ्याने साफ केला, बाहेरच्या खोलीतला दिवा लावला... बाहेर फारसं बारकाईने न पाहता दार आणि दोन्ही खिडक्या झटपट लावून टाकल्या. अच्युत झोपेतून चालत आल्यासारखा होता तिथेच उभा होता. गोपाळने हाताला धरून किंचित ओढताच तो निमूटपणे आतल्या खोलीत आला, खाटेवर झोपला. त्याचे डोळे मिटलेलेच होते.
गोपाळ परत खुर्चीवर बसल्यावर मग आताच्या अनुभवाची प्रतिक्रिया आली. सर्व अंगाला दरदरून घाम फुटला. हातापायांना जोराचं कापरं भरलं. भगतांच्या अगरबत्त्यांनी अच्युत शांत झाला होता आणि संरक्षणासाठी त्या भस्माच्या रेषा होत्या... भगतांची ही मदत झाली नसती तर रात्री काय अनर्थ झाला असता ! अच्युतचं ते थयाथया नाचणारं भेसूर ध्यान... आणि रात्रीच्या काळोखात अंधारातून त्याच्यासाठी आलेलं ते काहीतरी... घरातला त्याचा प्रवेश कोण रोखू शकलं असतं? समजा रात्रीची नलिनी इथे एकटीच असती - त्या बिचारीची काय अवस्था झाली असती.
संभाषणात भगतांचं नाव निघताच अच्युत निष्क्रियता सोडून एकदम उसळून बाहेर आला होता... भगतांच्याकडून गोपाळ परत येताच तर त्याने थैमान घातलं होतं... कोणत्यातरी पाशवी शक्तीच्या पंज्याखाली तो गेला आहे याला यापेक्षा आणखी जास्त कोणतं प्रमाण हवं होतं?
शेवटची अगरबत्ती पावणेचार वाजता विझली होती. साडेपाच वाजेपर्यंतचा पुढचा दीड तास गोपाळला विलक्षण कठीण गेला होता. अच्युतवरचा त्या अगरबत्तीचा लगाम गेला

होता. आता जर का त्याने परत तो रुद्रावतार धारण केला तर गोपाळचा काही धडगत नव्हती; पण सुदैवाने तसं काही झालं नाही. कदाचित पाच साडेपाच तास सतत जळणाऱ्या अगरबत्त्यांच्या धुरातला खोलीतच तरळणारा शेष अच्युतला शांत ठेवण्यास पुरेसा असेल.
साडेपाच वाजता दूधवाले, पेपरवाले, पहिल्या पाळीवर जाणारे कामगार यांची वर्दळ सुरू झाली आणि गोपाळच्या जिवात जीव आला. सहा-सवासहाच्या सुमारास नलिनी त्याच्यासाठी चहाचा कप घेऊन आली. रात्रभर मिळालेल्या विश्रांतीने तिला हुशारी आली होती. चेहऱ्यावरचा फिकटपणा, थकवाही खूप कमी झाला होता. चहा त्याच्या हातात देता देता ती म्हणाली, ''रात्रभर झोपला नाहीत ना, भाऊजी? तुमची मदत नसती तर मी काय केलं असतं ?''
''वहिनी, एवढ्याने काहीच झालं नाही. आता तर कोठे सुरुवात होत आहे. आता एक करा. अच्युतला तसाच झोपू दे. मी आता घरी जातो. दाढी-स्नान वगैरे आटोपून मग त्यावर भगतांकडे जातो. काल त्यांना काहीच सांगायला वेळ मिळाला नाही. आज त्यांना सविस्तर हकिकत सांगतो. बहुतेक ते माझ्याबरोबर इकडेच येतील... जे काय होईल ते सांगायला मी येतोच आहे.'' त्याने खिशातून भस्माची पुडी काढली. ''आणि हे महत्त्वाचं आहे. काय, कसं विचारत बसू नका. दारांखिडक्यांच्या आतल्या बाजूंना मी या भस्माच्या रेषा ओढल्या आहेत. कोणाच्या पायाने त्या पुसल्या जाणार नाहीत याची काळजी घ्या. पुसल्या गेल्या तर परत तिथे रेघ ओढा.''
नलिनीच्या चकित झालेल्या चेहऱ्याकडे पाहत गोपाळ म्हणाला,
''वहिनी, अगदी पुरा पुरा विश्वास बसण्याइतका जहरी अनुभव मला काल रात्री आला आहे. या भगतांच्या मदतीनेच अच्युत या जंजाळातून सुटला तर सुटेल अशी माझी खात्री झाली आहे. तुमची वेणी फणी, स्नान वगैरे आटोपून घ्या... अच्युतला काही चहा-कॉफी हवी का पहा... पण तो झोपेतून जागा झाला नाही तर काळजी करू नका... त्याची झोप साधी नाही आहे... मी काहीतरी निरोप घेऊन इथे येईपर्यंत काहीही करू नका - मग कोणीही कसलाही सल्ला देवो... त्याला घरातून काहीही झालं तरी हलवू नका... आणि त्या भस्माच्या रेषांवर सतत लक्ष ठेवा... आता धीर सोडू नका... आपल्या मदतीला या भगतांसारखे जबरदस्त पुरुष आहेत...''
गोपाळ गेला. नलिनी त्याच्या शब्दांवर खूप विचार करत होती. काल संध्याकाळी तो अचानक हजर झाला होता. तेव्हापासून सर्व परिस्थितीला किती नवीन वळण लागलं होतं ! मनातली निराशा, वैफल्य दूर झालं होतं. आतल्या खोलीत गेल्यावर तिची नजर अच्युतकडे गेली. श्वासोच्छ्वासाने छातीची जी काही लहानशी हालचाल होत होती ती सोडली तर तो संपूर्ण निश्चलपणे पडलेला होता. आता त्याच्या चेहऱ्यावर ताणाच्या, रागाच्या वा वासनेच्या कोणत्याही खुणा नव्हत्या.
''अच्युत ! अच्युत ! इकडे पाहता का?'' तिने हलकेच विचारलं. तिचे शब्द ऐकल्याची कोणतीही खूण त्याच्या चेहऱ्यावर दिसली नाही. गोपाळचे शब्द आठवून ती स्वयंपाकघरात गेली. काल दुपारी गावाहून आल्याच्या क्षणापासून आता प्रथमच तिला अच्युतशिवाय इतर कशाचा विचार करायला फुरसत मिळत होती - किंवा सुचत होतं.

आपण या भगतांवर किती सोयीस्करपणे सर्व सोपवून मोकळे झालो आहोत या विचाराने तिचं तिलाच नवल वाटलं - पण त्यात गैर असं काय होतं? अच्युतला जी काही व्याधी झाली होती तिच्याशी मुकाबला करण्याचं ज्ञान व तेवढी शक्ती तिच्यासारख्या सर्वसामान्य संसारी स्त्रीच्या अंगी कोठून असणार?
घरात तीन आठवड्यांचा पसारा साचला होता. ती मुंबईला घाईघाईतच गेली होती. भाज्या नासून गेल्या होत्या. पाणी शिळं आणि कडवट लागत होतं. स्वयंपाकाच्या भांड्यांची वाळून खापरं झाली होती. केर तर ढीगभर साचला होता; पण या रोजच्या कामाला ती कधीच मागे सरली नव्हती. पदर खोचून ती कामाला लागली.
दोन तासांनी ती स्नान करून, कपडे बदलून बाहेरच्या खोलीत आली तेव्हा घर कसं आरशासारखं लख्ख झालं होतं.
सकाळी नऊच्या सुमारास गोपाळ भगतांच्या मठीकडे निघाला होता. सुरुवातीस त्याला या भेटीतला विलक्षणपणा जाणवला नव्हता; पण जसजसे अच्युतचे विलक्षण अनुभव आणि काल रात्रीचे भयानक प्रसंग आठवायला लागले तसतसं त्याला या सर्वच प्रकारातलं अनैसर्गिकपण जाणवायला लागलं. भगत हे कोणत्या प्रकारचे गृहस्थ आहेत याची अंधुकशी कल्पना यायला लागली. त्याच्या पावलांतला सुरुवातीचा जोश कमी झाला, ती जराशी रेंगाळायला लागली.
भगतांची मठी आली. आजही गोपाळला आत पाय टाकण्याआधी मनाची जरा तयारी करावी लागली; पण आजचं कारण वेगळं होतं. आपण एका किती अपवादात्मक आणि जगविलक्षण वास्तूत प्रवेश करत आहोत याची त्याला पूर्ण कल्पना आली होती.
फाटक उघडं होतं, आतल्या खोलीचं दारही उघडं होतं, गोपाळ आत गेला, एका खुर्चीवर बसला. काही मिनिटांतच आतल्या दारातून भगत बाहेर आले. त्याला पाहताच ते जरा हसून म्हणाले,
''आलास का तू, गोपाळ? काय म्हणतोय तुझा मित्र अच्युत?''
गोपाळ मान हलवत म्हणाला,
''भगत, मी जर संध्याकाळी इथे येऊन तुमच्याकडून काही मदत घेतली नसती तर काल रात्री काय अनर्थ माजला असता याची कल्पनाच करवत नाही!''
''आता अच्युत कसा आहे?''
''अच्युत गाढ झोपेत - एक प्रकारच्या गुंगीतच आहे.''
''ठीक आहे. आता आधी काल रात्री काय झालं ते सांग...''
स्वत:च्या कल्पना बाजूस ठेवून गोपाळने त्याच्या संध्याकाळच्या अच्युतच्या घराला दिलेल्या भेटीपासून थेट आजच्या पहाटेपर्यंत घडलेले सर्व प्रसंग शब्दश:, तपशीलवार वर्णन केले. भगत सर्वकाही शांतपणे ऐकत होते. गोपाळ गप्प बसल्यावर ते म्हणाले,
''आता या अच्युतचा या प्रकरणात कसा संबंध आला ते सांग.''
आणखी वीसएक मिनिटं गोपाळ बोलत होता. त्याच्या बोलण्यात 'काळी जोगीण' हा उल्लेख प्रथम आला तेव्हा भगत एकाएकी ताठ झाले होते. गोपाळची अशी कल्पना झाली की त्यानंतर ते त्याची हकिकत अधिक बारीक लक्ष देऊन ऐकत आहेत. गोपाळची हकिकत संपली आणि तो गप्प बसला. भगत जरा वेळ स्वत:शीच विचार

करीत होते.
''ठीक आहे, गोपाळ, तू गेलास तरी चालेल. या अच्युतचा पत्ता देऊन ठेव. आज संध्याकाळी, जरासा उशिराच मी त्या पत्त्यावर येतो. पाहू काय अवस्था आहे ती त्याची.''
''मी नलिनीवहिनींना सूचना दिली होती की, त्या भस्माच्या रेषा तशाच राहू देत आणि अच्युतला घराबाहेर पडू देऊ नका म्हणून.''
''तो इतका थकला असेल की त्याला हातसुद्धा उचलता यायचा नाही; पण या सूचना योग्य आहेत; पण माझ्या मते दिवसभरात त्याला तसा काही त्रास होणार नाही किंवा झटका येणार नाही. ठीक आहे. तू गेलास तरी चालेल. मी आज संध्याकाळी येतो तिथे.''
गोपाळ गेल्यावर भगतही बाहेर पडले. त्यांनी आपल्यामागे दार नुसतं ओढून घेतलं होतं. भगतांनी एकदम गावाबाहेरच्या त्या प्राचीन मंदिराची वाट धरली होती. रस्त्यांवरून सकाळच्या कामाच्या वेळेच्या वाहतुकीची गर्दी होती; पण भगतांच्या वाटेतून लोक नकळत दूर होत होते. जणूकाही त्यांच्या आसपास एखादा निर्यास होत होता. त्यांना स्वत:ला याची कल्पनाही नव्हती. त्यांनी स्वत:साठी अशा खास वागणुकीची अपेक्षाही केली नसती.
त्यांनी कॉजवे ओलांडला. मंदिराची वाट धरली. एखादा दिव्याचा प्रकाश जाड वस्त्राखाली झाकून ठेवावा तशा भगतांनी आपल्या सर्व शक्ती एका अपारदर्शक कवचामागे दडवून ठेवल्या होत्या. ज्या मानसिक पातळीवर ते वावरत होते, त्या पातळीवरची ही एक प्रकारची अदृश्यताच होती. मंदिराची पडकी वास्तू जवळजवळ आली. मानवाच्या इतिहासात संस्कृतीचे आणि स्वाथ्याचे सतत चढउतार होत असतात. त्याचंच प्रतिबिंब मानवाच्या नगरांवर, वास्तूशिल्पांवर, कलाकृतींवर, सर्वत्र पडत असतं. तेव्हा ती भग्न वास्तू भगतांना खेदकारक किंवा भयानकही वाटली नाही. सांस्कृतिक प्रवासातला तो एक टप्पा होता.
मनात आणलं असतं तर त्याना त्या भग्नखंडित रेषा एकत्र करून मंदिराची मूळ प्रतिमा नजरेसमोर आणता आली असती; पण आता त्यांना मंदिरात स्वारस्य नव्हतं. मागच्या सराईतली ती खोली कोण वापरत होतं हे त्यांना पाहायचं होतं.
महाद्वार पडलं होतं. त्यातून ते आत आले. प्रांगणात मोठमोठे पाषाण होते. प्रदशिक्षणामार्ग कोसळला होता. एरव्ही अंधारात असणारा गाभारा मागची भिंत कोसळल्याने झगझगीत प्रकाशाने उजळला होता. चौथऱ्यावर मूर्ती नव्हती. गाभाऱ्याचं पावित्र्य केव्हाच गेलं होतं. पशुपक्ष्यांनी तिथे आपल्या वस्त्या वसवल्या होत्या. मंदिराला वळसा घालून ते सराईकडे निघाले. अदृश्य वाऱ्याने जमिनीवरचं पीस थरथरावं तशी त्यांना त्या अदृश्य प्रवाहाची जाणीव झाली. काहीतरी मंदिराच्या सर्व वास्तूचा अवकाश विरळपणे व्यापून राहिलं होतं.
सराईच्या बैठ्या इमारतीत तीन खोल्या होत्या. खोल्यांची दारं केव्हाच उखडून गेली होती. सर्व खोल्यांतून धूळ, कचरा काटक्या, कपड्यांच्या चिंध्या, स्वयंपाकाची मोडकी, फुटकीतुटकी भांडी, सतरंज्यांचे विटके तुकडे, सिगारेट-विड्यांची थोटकं, पक्ष्यांची

विष्ठा याचा पसारा पडलेला होता. तशा त्या तीनही खोल्या एकसारख्याच घाण, वापरापलीकडच्या होत्या. भगत मधल्या खोलीत गेले. त्यांच्यामागे ती अदृश्य वावटळही त्या खोलीत आली होती. भिंतीला लपेटून बसली होती. साध्या, अनभिज्ञ मनाला भास झाला असता की खोलीच्या चारी बाजूंनी कोणीतरी आपल्यावर सतत नजर ठेवून आहे, पाळत ठेवून आहे.
भगत खोलीत गेले, खिडकीपाशी उभे राहिले. त्या वावटळीला आता मूर्त स्वरूप येत होतं. आधी खोलीतल्या हलक्यासलक्या वस्तू हलायला लागल्या. कोळीष्टकं, कापसाचे धागे, कपड्यांचे तंतू हवेत तरंगायला लागले. आवतीने जोर धरला. सर्व वस्तू आधी जागच्या जागी, मग गोलाकार फिरायला लागल्या. सर्व सटरफटर वस्तू खोलीच्या मध्यभागी एकत्र येत होत्या. त्यांचा ढीग झाला. मग त्यांचा एक उभाच्या उभा स्तंभ झाला. स्तंभाच्या टोकाला फुटका गोलाकार माठ होता. पुढच्या अंगास लहानमोठ्या आकाराची, पोच आलेली, पिवळ्या - काळ्या रंगांची डब्याची दोन झाकणं होती... मातीच्या मडक्यावर पत्र्याचे चकचकते डोळे - त्यांच्याखाली खांद्याच्या जागी एक आडवी सपाट फळी होती. दोन्ही अंगांना विटक्या सतरंजीच्या तुकड्यांच्या वळकट्यांचे दोन हात होते. हातांच्या शेवटाला धलप्यांचे पंजे होते... अशाच सटरफटर, मोडक्या वस्तूंचे पाय होते... अर्धमानवी आकाराचा हा स्तंभ स्वत:भोवती फिरत फिरत भगतांच्याजवळ येत होता. आठ फूट उंचीवरून ते मडक्याचं मस्तक वाकून त्यांच्याकडे पाहत होतं.
भगतांनी त्याच्याकडे पाठ फिरवली. खिडकीला अडकावलेला गोणपाटाचा तुकडा फर्रकन फाडून काढला. पन्नास-साठ पावलांवर तो पडका वाडा होता. त्याच्या तिसऱ्या मजल्यावरच्या खोल्यांतली शेवटची खोली या बाजूला होती. त्या खोलीच्या कडेच्या भिंतीतली खिडकी येथून बरोबर दिसत होती. ती खिडकी उघडी होती. आता त्या भिंतीवर प्रखर सूर्यप्रकाश पडला होता, त्यामुळे आतलं काहीच दिसत नव्हतं; पण असा भास होत होता की खिडकीच्या आत हाताभरावरच काहीतरी उभं आहे आणि सराईतल्या या मधल्या खोलीच्या खिडकीकडे एकटक पाहत आहे.
अडगळीतून उभा राहिलेला तो बागुलबुवा भगतांच्यावर झडप घालण्याच्या पवित्र्यात होता - आणि आपल्याला (जर बचावाचे काही उपाय वापरले नाहीत तर) गंभीर शारीरिक इजा करण्याची पाशवी शक्ती त्याच्यात एकवटली होती याची त्यांना पूर्ण कल्पना होती; पण याक्षणी त्यांना संघर्ष नको होता. त्यांनी आपली मानसिक मर्यादारेषा - सायकिकल प्रोफाइल - एकदम अत्यंत अरुंद केली. सपाट दिसणारा पत्रा काटकोनातून वळवला की त्याची दिसते न दिसतेशी चिंचोळी केशरेषा होते. ज्या पातळीवर ते बुजगावणं त्यांचा शोध घेत होतं तिथून भगत एकदम अदृश्य झाले होते. तो कृत्रिम अमानवी धातकी आकर आपले मडक्याच मस्तक बैडोलपणे इकडेतिकडे हलवत असतानाच भगत खोलीबाहेर पडले.
ते आता त्या पडक्या वाड्याच्या पोर्चमध्ये आले होते. अजूनही त्यांनी स्वत:ला त्याच त्या अरुंद, जवळजवळ अदृश्य पातळीवरच ठेवलं होतं; पण त्यांनी हॉलमध्ये पाऊल टाकलं मात्र, वरच्या मजल्यावरच्या कोणत्या तरी खोलीचं दार दणादणा आपटायला

लागलं. त्यामागोमाग सर्व वाड्यातलीच दारांखेडक्यांची पालं दाण्दाण् उघडझाप करायला लागली.
इथली जाणीव जास्त तीक्ष्ण, जास्त व्यापक, जास्त मूलग्राही होती. इथे अदृश्यपणे वावरणं अशक्यच होतं; पण आपली ओळख न देता, संघर्ष न करता, आव्हान न देता त्यांना वाड्याची पाहणी करणं शक्य होतं.
दिवाणखान्यात ते पाचसात पावलं गेले असतील नसतील तोच वरून खाली येणाऱ्या जिन्यावरून काळ्या द्रव्याचा लोटच्या लोट सपाट्याने आला. क्षणार्धात त्याला एका स्त्रीचा आकार आला. ती त्यांच्या वाटेत उभी होती. चेहरा काळ्या दगडाचा होता. डोळे पांढऱ्या कवड्यांचे होते. कमरेपर्यंत आलेले केस स्वत:च्याच गतीने हलत होते.
‘‘कोण?... कोण?...’’ म्हणत ती त्यांची वाट आडवीपर्यंत भगत एका फसव्या शीघ्रगतीने तिला वळसा घालून पुढे गेलेही होते. त्यांच्या पाहणीत दगड, विटा, कांच, लाकूड, शिगा, कैच्या यांना महत्त्व नव्हतं. हे जड द्रव्य म्हणजे पुतळयांच्या आत आधारासाठी उभा केलेला सांगाडा होता. त्या दुष्ट शक्तीने या वास्तूत आपलं जाळं कोठे आणि कसं विणलं आहे, ते त्यांना शोधून काढायचं होतं. खालच्या मजल्याच्या, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या सर्व खोल्या त्यांनी नजरेखालून घातल्या.
दारं लागत उघडत होती. झगझगीत प्रकाश - काळामिट्ट अंधार यांची पाठशिवण चालू होती. वस्तूंचे आकार बदलत होते. रंगरूप बदलत होते. एकदा सर्वत्र धूर झाला. आग लागल्यासारखी आंच सर्वत्र पसरली. वास्तूची एक बाजू धगधगत्या लाल ज्वालांत वेढली गेली. एकदा सर्वत्र गारीगार, जीवघेण्या थंडीची लाट पसरली. एकदा सर्व वास्तूत पुराचं लालभडक, फेसाळतं पाणी चढायला लागलं. एकदा हिंस्र श्वापदांच्या गर्जना कानावर आल्या. कधी वरून मस्तकावर प्रचंड शीळा कोसळत आली. कधी पायाखाली एक खोल गर्ता उलगडली...
या साऱ्यांतून भगतांचा शोध चालूच होता.
ज्ञानेंद्रिये आणि मेंदू यांच्यामध्ये एक पडदा उभा केला होता. बाहेरच्या या उत्पाती प्रसंगाचे प्रक्षेप त्या पडद्यावर पडत होते. हे उघड होतं की, हे सारं कृत्रिम आणि फसवं आहे. त्यापैकी काहीही आत मेंदूपर्यंत पोहोचतच नव्हतं. त्यांच्या पाहणीनंतर त्यांना या दुष्टतेच्या शक्तीची आणि व्याप्तीची खरी कल्पना आली होती. तिची मुळं वाड्याखालच्या एक जुन्या, बुजवलेल्या विहिरीतून जमिनीच्या गर्भात खोलवर गेली होती. तिथून हा विषवृक्ष वर आला होता आणि साऱ्या वास्तूत त्याच्या विषारी-किडक्या-दूषित-घातकी शाखांचा विस्तार झाला होता.
त्यांचा सावधपणाचा पवित्राच योग्य ठरला होता. संघर्षाची त्यांची तयारी नव्हती आणि वेळही नव्हती. त्यांना संरक्षणाची फळी आधी मजबूत करायला हवी होती. अच्युत या शक्तीच्या प्रभावाखाली होता. त्यांच्याच गोटात शत्रूचा प्रवेश झालेला होता. ती कीड आधी नाहीशी करायला हवी होती.
दोन्ही जिन्यांवरून ते सावकाश सावकाश खाली आले.
हिरमोड झालेल्या त्या विधुळ्या शक्तीची सर्वत्र आदळआपट चाललीच होती. भगतांना काहीही स्पर्श करू शकत नव्हतं.

दारापाशीच ते थांबले आणि वळले. बाहेर पडताना निरोप म्हणून एक सणसणीत फटका द्यायचा त्यांचा विचार होता. कदाचित त्याने ती सावध होऊन पाळतीवर राहीलही; पण इतका वेळ जो उद्दाम थयथयाट चालला होता त्याला काहीतरी प्रत्युत्तर हवंच होतं.
काही क्षण सर्व हालचाल, आवाज, उलथापालथ थांबली होती.
त्या शांततेत अगदी खालच्या, पण स्पष्ट आवाजात म्हणाले,
''मी आता जातो आहे... पण याद राख... मी परत येणार आहे... आणि परत येईन तेव्हा तुझा भुगा भुगा करणार आहे !''
त्यांनी दाराबाहेर पाऊल टाकलं.
मागे वाड्यातल्या एकूण एक खोल्यांतून विव्हळण्याचे, मोठे हेल काढून रडण्याचे आवाज यायला लागले.
पण भगतांनी मागे वळूनही पाहिले नाही.
भगत मठीवर परत आले तेव्हा बारा वाजत आले होते. मध्यान्हीची त्यांची आन्हिकं उरकल्यावर त्यांनी रोजचा मित आहार घेतला. मग त्यांनी थंड पाण्याने स्नान घेतलं आणि शरीरावरची वस्त्रं ओली असतानाच मठीतील नेहमी बंद असणारी एक खोली उघडली. आत प्रवेश केल्यानंतर त्यांनी आपल्यामागे दार बंद केलं. त्या खोलीत संपूर्ण अंधार होता. प्रकाशाची लहानशीसुद्धा चीर नव्हती. खोलीतल्या सामानाची रचना त्यांना इतकी परिचित होती की कशाला एवढासाही स्पर्श न करता ते खोलीच्या कोपऱ्यात पोहोचले, तिथे एका बैठ्या मेजावर आवरणाखाली असलेल्या एका मृत्तिकापत्रात धगधगते निखारे होते. भगतपरंपरेच्या नोंदवलेल्या इतिहासावर विश्वास ठेवला तर (आणि विश्वास का ठेवू नये? तो इतिहास इतरेजनांवर प्रभाव पाडण्यासाठी, इतरांच्या डोळ्यांसाठी नव्हताच - त्याच्या पिठासाठी होता.) गेली हजारो वर्षं हा अग्निस्फुल्लिंग विझला नव्हता. वादळ, वारा, अग्नी, तुफान, पूर, संघर्ष, युद्ध, भूकंप... साऱ्यातून त्या त्या वेळच्या भगतांनी तो प्रसंगी प्राणांचीही पर्वा न करता जतन केला होता. अखंडता हीही एक शक्तीच होती.
त्या निखाऱ्यांवरून एक काडी पेटवून घेऊन भगतांनी छताला टांगलेले तीन दीप प्रज्वलित केले. त्या प्रकाशात खोलीचं विलक्षण रूप उघड झालं. खोलीच्या छताला लालभडक रंग दिला होता. छतापासून पार खालपर्यंत पोहोचणारे त्याच भडक लाल रंगाचे जाड पडदे खोलीच्या चारी भिंतींवरून खाली आले होते. खालीही त्याच रंगाचा गालिचा होता. सर्व ठिकाणी छतावर आणि खाली गालीच्यावरसुद्धा - जाड पातळ रेषांच्या क्लिष्ट आकृती रेखलेल्या, विणलेल्या किंवा गुंफलेल्या होत्या. या आकृत्या कठीण भूमितीय प्रमेयांसारख्या होत्या. ज्यांना त्यातलं काही गम्य होतं, त्यांना त्यांचा पूर्ण अर्थ समजला असता. ज्यांना काही ज्ञान नव्हतं त्यांच्यासाठी ती नुसते शोभेची नक्षी होती.
या खोलीतला कण आणि कण शक्तीने भारलेला होता. प्रकांड शक्तीने लवलवत होता. शक्ती साठवण्याचे असंख्य प्रकार आहेत. तारेला पीळ देऊन; किंवा जड वस्तू खूप उंचावर नेऊन; किंवा पाणी एखाद्या बंधाऱ्याप्रमाणे अडवून; किंवा एखादी स्प्रिगं दाबून;

किंवा एखाद्या अवाढव्य चक्राला गती देऊन. इथली शक्ती काही शब्द पंक्तींच्या खास ध्वनिरचनेच्या असंख्य पुनरुच्चाराने निर्माण झाली होती, साठवली होती, फक्त तिचं स्वरूप साधं नव्हतं. तिच्याशी सुसंवाद साधला की मनाच्या आकलनाची व्याप्ती वाढत होती, स्थळाच्या बिंदू बिंदूमधलं अंतर नष्ट होत होतं, काळाच्या क्षणाक्षणांमधलं अंतर नष्ट होत होतं... पण हे सर्व जाणत्यांसाठी आहे. इतरांच्या करमणुकीसाठी नाही.

भगत आता एका आरामशीर सोफ्यावर बसले होते. आणि त्यांची नजर समोरच्या सुवर्णरिषांच्या आकृतीवर स्थिर झाली होती. काही वेळानंतर त्या रेषांत गती आली, त्या हलायला लागल्या, वाहायला लागल्या, त्यांची पुनर्रचना होऊ लागली.

भगतांच्या डोळ्यांसमोर तो पडका वाडा साकारला होता. एखाद्या संशोधकाने अनामिक वनस्पतीचा नमुना अरण्यातून आणावा आणि मग प्रयोगशाळेतल्या टेबलावर ठेवून त्याची सूक्ष्मदर्शकाखाली तपासणी करावी तसे भगत आता त्यांनी स्मृतीत साठवलेल्या त्या वाड्यातल्या दुष्ट शक्तीचा प्रचंड विस्तार आठवत होते - तो समोरच्या रेषाकृतीत साकारला जात होता... ते आता त्याची अनेक पातळ्यांवर तपासणी करणार होते; वर्मस्थानं, शक्तिस्थानं जाणून घेणार होते... पण हाही भाग जाणत्यांसाठीच आहे पुढच्या संघर्षासाठी त्यांची तयारी सुरू झाली होती. प्रतिस्पर्ध्याला कमी लेखण्याची चूक त्यांनी कधीही केली नव्हती. कारण प्रत्येक खेपेस दुष्टता काहीतरी नवीन मार्गाने, रूपाने साधनासह येत असे.

ज्यांना यात स्वारस्य आहे त्यांच्यासाठी एकच नोंद. भगतांची ही तपासणी चाललेनी असताना कोणत्या तरी अगम्य मार्गावरून त्याची जाण पडक्या वाड्यात वावरणाऱ्या 'तिला' झाली. तळघरातल्या विहिरीपासून ते पार वरच्या उन्हाने तापलेल्या खोलीपर्यंत ती उसळी खाऊन एखाद्या पिसाळलेल्या हिंस्र श्वापदासारखी झेपावत धडका मारत होती. भगतांच्या चाचणीचा एक सूक्ष्म पण तीक्ष्ण पाश तिच्यापर्यंत पोहोचला होता, तिला विलक्षण अस्वस्थ करीत होता.

नलिनीची भेट घेऊन गोपाळ ऑफिसला गेला होता. सर्व दिवसभर अच्युत त्याच्या ग्लानीत होता. नलिनीने त्याला हलवायचा, जागं करण्याचा एकदाच प्रयत्न केला - पण त्याची गुंगी फार खोल होती. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारची शांती होती. हे उघड दिसत होतं की त्याला कोणतेही मानसिक क्लेष होत नव्हते. संध्याकाळी येतो, भगत म्हणाले होते. तिने ठरवलं की तोपर्यंत काहीच करायचं नाही. अच्युतच्या शरीराची इतकी हेळसांड झाली होती की एका दिवसाच्या उपवासाने त्यात फारसा फरक पडणार नव्हता.

काल रात्रीच्या उत्पाती प्रसंगाने शेजाऱ्यांच्या अलिप्तपणाचं कवंच फुटलं होतं. दुपारी सोबतीसाठी दोघी शेजारणी तिच्या घरी आल्या होत्या. तिला आता एका गोष्टीचं नवल वाटत होतं - अच्युतला जो काही विकार झाला होता त्यात तिचा काय दोष होता? इतरांना सांगायला सुरुवातीस तिला एवढी शरम का वाटली होती? आता तिने दोघींना सुरुवातीपासून ते या क्षणापर्यंतचं सर्व काही सांगितलं. तिच्यासाठी त्यांच्या मनात सहानुभूती तर होतीच; पण सर्व प्रकारच्या मदतीची तयारीसुद्धा होती.

सहाच्या सुमारास गोपाळ ऑफिसमधून परस्परच अच्युतच्या घरी आला. उन्हं उतरली

होती. खोलीचे काही काही भाग सावलीत गेले होते. फार अंधार होण्यापूर्वीच भगत आले तर बरं होईल, गोपाळला वाटत होतं. काल रात्री त्या अगरबत्त्या नसत्या तर आपली काही धडगत लागली नसती हे त्याला पुरेपूर माहीत होतं. खोलीतून गॅलरीत आणि पुन्हा परत आत अशा सतत फेऱ्या चालल्या होत्या.
दिवस मावळला. दिवे लागले. भगत अजून कसे आले नाहीत? तो मनाशी काळजीने विचार करीत होता. साडेसातच्या सुमारास तो गॅलरीत आणखी एक निष्फळ चक्कर टाकून आतल्या खोलीत आला. नेहमीसारखी एक ओझरती नजर त्याने अच्युतकडे टाकली आणि तो जागच्या जागी थिजला.
अच्युतचे डोळे सताड उघडे होते. त्याच्यावरच खिळले होते.
क्षणमात्र गोपाळच्या शरीरातलं सगळं अवसानच ओसरून गेलं. आता आपण खालीच कोसळणार, त्याला वाटलं. डोळे उघडण्याखेरीज अच्युतने इतर काहीही हालचाल केली नव्हती. याक्षणी ते डोळे नितळ होते; पण त्यांच्यात काल रात्रीसारखी ती संतापाची लाल आग केव्हा घुमसायला लागेल याची काय शाश्वती देता येत होती?
''गोपाळ? गोपाळ?'' अच्युत अगदी हलकेचं पुटपुटला.
पावलं रखडत होती; पण गोपाळला पुढे जावंच लागलं.
''गोपाळ? तू इथे कसा?'' अच्युत त्याच घोगऱ्या आवाजात म्हणाला. ''अच्युत, तुझी प्रकृती ठीक नाही आहे-'' कितीतरी दिवसांत अच्युत नैसर्गिक आवाजात बोलला होता ! गोपाळ मनाशी नवल करीत होता; पण त्याला काही समाधान वाटलं असेल तर ते अल्पायुषीच ठरलं. अच्युतचे डोळे एकाएकी विस्फारले. त्यांच्यातली क्षणभराची ओळख पुसली गेली. चेहऱ्याचे, सर्व शरीराचेच स्नायू आवळले जात होते, ताठ होत होते. असं वाटत होतं कोणत्याही क्षणी हा बिछान्यावरून एकदम झेप घेऊन अंगावर झडप घालील...
''गोपाळ!'' दारातून भगतांचा आवाज आला. गोपाळ वळला. आतल्या खोलीतून नलिनीही दारापर्यंत आली होती. अच्युतची नजर सावकाश सावकाश वळली, दारातल्या भगतांवर खिळली.
भगतांच्या खांद्यावर कशीदाकाम केलेली एक शाल होती. ती आता त्यांनी उतरवली. घडी करण्यासाठी समोर धरली. काही क्षण ती ते हवेत हलवत होते. आणि मग दोन्ही टोकं धरून त्यांनी शालीचा हवेत फाट् ! असा जोराचा आवाज केला. इतका जोराचा की गोपाळ आणि नलिनीनेही दचकून क्षणभर डोळे मिटले. त्यांनी डोळे उघडले तेव्हा भगत खोलीत येत होते. अच्युतचे डोळे मिटलेले होते.
भगत अच्युतच्या खाटेपाशी घडीच्या खुर्चीवर बसले होते. मागे गोपाळ, नलिनी होते. खोलीच्या दारात शेजारची तीन-चार माणसं होती; पण भगत अच्युतकडे एकाग्र नजरेने पाहत होते. वरवर पाहता ती नजर साधी वाटत होती. पण भगतांची नजर, श्रवणेंद्रिये, घ्राणेंद्रिये, स्पर्श सर्व काही भारलेलं होतं. नजर अच्युतचा शारीरिक, मानसिक, आत्मिक अशा अनेक पातळ्यांवर वेध घेत होती. मग त्यांनी आपला उजवा हात अगदी हलकेच त्याच्या कपाळावर टेकवला. चैतन्यमयी, पावनमयी अशा शक्तीचा एक स्रोत त्या हाताच्या स्पर्शातून अच्युतच्या सर्व शरीरातून वाहू लागला.

त्या शक्तींच्या स्रोताने आपल्याबरोबर अच्युतच्या मनातील सर्व अशुद्ध, विषारी, घातकी, अमानवी, फसवे प्रभाव पार वाहून नेले. एखादा असह्य धक्का बसल्यासारखी नलिनी एकदम एक पाऊल मागे सरली, आणि डोळ्याना पदर लावून भिंतीपाशी उभी राहिली. इतके दिवस एकटीच ती असह्य ताण वागवत आली होती, गोपाळला वाटलं, तो एकाएकी गेला होता आणि त्याची ही नैसर्गिक आणि स्वाभाविक अशीच प्रतिक्रिया आहे. तिच्या सहनशक्तीचं आणि धैर्याचं त्याला या क्षणाइतकं कौतुक कधीही वाटलं नव्हतं.

अच्युतने डोळे उघडले. त्याच्या चेहऱ्यावर एक थकलेलं, पण प्रसन्न हास्य होतं. गोपाळ आवेगाने पुढे होऊन काहीतरी बोलणार होता, पण भगतांनी त्याला हाताने होता तिथेच उभा राहण्याची खूण केली. कारण मिनिटाभरातच अच्युतच्या चेहऱ्यावर परत ती छाया आली, त्याच्या डोळ्यातली ओळख परत एकदा मालवली, चेहऱ्याचे व शरीराचे स्नायू सैल पडले. गोपाळच्या मनात उपमा आली ती सागराच्या ओहोटीची होती. ओहोटी लागली तरी पाणी एकसारखं मागे हटत नाही... पुन्हा पुन्हा रेती - खडकावर आक्रमण करीतच असते. अच्युत ज्या भारणीखाली सापडला होता ती अशी ओहोटीसारखी सावकाश सावकाश मागे हटत होती. काही मिनिटानंतर त्याचा चेहरा पुन्हा निवळला... याचीच पुनरावृत्ती दोनतीनदा झाली - पण विस्मृतीचा काळ कमी कमी होत गेला आणि शेवटी तो संपूर्ण मुक्त झाला.

आता भगतांनी गोपाळला हातानेच पुढे जाण्याची खूण केली.

गोपाळ त्याच्याशेजारी खाटेवर येऊन बसला आणि त्याच्या खांद्यांवर हात ठेवून म्हणाला,

''आता कसं वाटतं, अच्युत?''

''फार अशक्त वाटतं रे - मला काय झालं होतं?''

''तुला काय काय आठवतं?''

''छे ! छे ! ते स्वप्नच असलं पाहिजे...''

□□□

4

अच्युत ऑफिसमध्ये बसला होता. त्याला गोपाळशी बोलायचं होतं. पण आल्या आल्या त्याला समजलं की गोपाळ तातडीच्या फिरतीवर गेला आहे. आणि किमान दोन दिवस तरी परत येणार नाही. तो नलिनीशी काही बोलला नव्हता; पण कालच्या संध्याकाळपासूनच त्याला काही काही फार विचित्र संवेदना व्हायला लागल्या होत्या. समोर पाहता पाहता एकाएकी त्याला असा भास होई की डोळ्यांसमोरच्या सर्व सृष्टीवर एक पातळसर, धुराच्या वलयासारखा पडदा आला आहे. रंग निस्तेज होत, आवाज क्षीण होत, गंधाची तीक्ष्णता कमी होई, स्पर्श करताना बोटांवर काहीतरी आवरण चढल्यासारखं वाटे... हा बदल केवळ बाह्य सृष्टीतच नव्हता, तर तो पार आत, त्याच्या मनाच्या गाभ्यापर्यंत पोहोचला होता. मनातल्या विचारांची स्पष्टताही कमी झाली होती, बुद्धीची धारही बोथट झाली होती. विचार सुळसुळीत झाले होते. काही केल्या मनात ठामपणे राहत नव्हते. रात्रीच्या विश्रांतीनंतर भास जरा कमी होईल ही आशा फोल ठरली. आपल्याला काय होत आहे हेच त्याला समजत नव्हतं - पण जो काही अनामिक विकार झाला होता त्याची तीव्रता वाढतच चालली होती. खरं तर गोपाळला भेटण्यासाठीच केवळ तो ऑफिसात आला होता. गोपाळने काल संध्याकाळी प्रतिकारासंबंधात, कोणाचं तरी साहाय्य मिळवण्याच्या संदर्भात काहीतरी सांगितल्याचं त्याला अगदी अंधुकपणे आठवत होतं. तेवढी एकच क्षीणसर आशा मनात होती. गोपाळ आलाच नाही हे समजताच त्याचा धीरच खचला. तो त्याच्या टेबलापाशी नुसता बसून होता. आरशावर एखादं तेलकट कीटण चढलं की प्रतिबिंब जशी धूसर होतात तशी ऑफिसची खोली धूसर झाली होती. साहेबांनी बोलावलं आहे म्हणून त्याला निरोप सांगायला आलेल्या प्यूनने त्याच्या चेहऱ्याकडे एकदाच पाहिलं आणि घाईघाईनं आत जाऊन साहेबांना सांगितलं की त्याची प्रकृती काही ठीक दिसत नाही... त्यांना आत बोलावू नका आणि काही विचारूही नका. कारण त्या अनभिज्ञ साध्या माणसालाही अच्युतच्या उघड्या डोळ्यांमागे काहीतरी वेगळंच, अनोळखी, जरासं भीतिदायक दबा धरून बसल्याची जाणीव झाली होती.

वेळ उलटत चालला तशी बाह्यजगावर आलेली ही छाया जास्त जास्त गडद होत चालली होती. जणू काही त्याच्याभोवती एक पातळसर पण अपारदर्शक कोषच तयार होत होता. खोलीचा आकार अस्पष्ट आणि विकृत होत होता, आवाज क्षीण क्षीण होत चालले होते; हवाही कुंद, शिळी वाटायला लागली होती...

केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर तो ऑफिसची वेळ संपेपर्यंत तिथे थांबला आणि मग घरी परत निघाला. बसचे रूट, थांबे, आणि वाट ओळखीचं नसतं तर तो घरी पोहोचलाच नसता. आता त्याला एक कसलातरी उग्र कडवट दर्प जाणवायला लागला होता. आपण अशाच कोणत्यातरी जागी एवढ्यातच गेलो होतो असं त्याला राहून राहून वाटत होतं; पण काही केल्या तो दिवस किंवा वेळ किंवा जागा आठवत नव्हती. तो कसातरी घरातल्या खाटेवर येऊन पडला. आणि त्याचक्षणी त्याच्या आसपासचं, त्याच्या परिचयाचं रोजचं जग त्या अपारदर्शक पडद्याआड गडप झालं.

त्याच्या मनाचा सर्व अवकाश परक्या कशाने तरी व्यापला होता. (पण परकं तरी कसं म्हणायचं? काहीतरी संबंध, ओळख, परिचय होताच, नाही का?) त्याची अस्मिता, स्वत्व, आत्मा हे संकुचित होऊन, दुर्लक्ष असाहाय्य असं एका कोपऱ्यात कोंडलं गेलं होतं. मनाच्या पटलावर भीषण, पण संपूर्ण अनाकलनीय अशा घटना घडत होत्या. त्याला त्यांचा अर्थच आकलन होत नव्हता, कारण मानवी संवेदनपटापेक्षा त्यांची व्याप्ती फारच विस्तृत होती. मिटलेले डोळे बोटांनी दाबले की अंतर्चक्षूना लाटा - निळ्या - जांभळ्या रंगाची झळाळती वर्तुळं दिसतात - पण त्यांचा खरा रंग समजतो का? एखादा प्रचंड स्फोट झाला... त्या आवाजाचा सूर सांगता येईल का? मनातल्या मापकांचे काटे पार शेवटच्या अंकापाशी जाऊन अडले होते...
त्याच्या शरीराच्या बाह्यक्रिया एखाद्या प्रतिक्षिप्त प्रेरणेखाली चालल्या होत्या. सकाळ, दुपार, संध्याकाळ, दिवस, रात्र यांची त्याची जाण मालवली होती. डोळ्यांसमोर वेगवेगळ्या कोनांतून पाहिल्यासारखे कितीतरी देखावे दिसत होते. मानवीच आकृती, पण अतिसूक्ष्म आकार. स्थळांची तशीच काळाचीही सर्वत्र गल्लत झाली होती. देखावे बदलत होते, फिरत होते, मागेपुढे होत होते, लहानमोठे होत होते... कशाचाही अर्थ लावायचा प्रयत्नच त्याने सोडून दिला होता... कारण हे त्याच्यासाठी नव्हतचं... कोणीतरी आपल्या स्मृती चाळून पहाव्यात तसं वाटत होतं... या सर्व देखाव्यांतून लक्षात येण्यासारखा एकच समान धागा होता... वेदना, क्रौर्य, विध्वंस, नाश...
आणि एकाएकी हे पटल विरळ होत होतं. त्याच्याभोवतीचा काळा कोष उलगडला जात होता. हद्दपार झालेलं बाह्यविश्व पुन्हा त्याच्या आकलनाच्या परीघात येत होतं. एकदम नाही, पण लाटालाटांनी, हलके, हलके. जेव्हा तो पूर्ण मुक्त झाला तेव्हा त्याच्या नजरेसमोर एक चेहरा होता.
एक वृद्ध, पण प्रसन्न, सुहास्य चेहरा.
तिथेच गोपाळही होता, गोपाळ त्याच्याजवळ येत होता, खांद्यावर हात ठेवत होता,
‘‘आता कसं वाटतं?’’ विचारत होता.
‘‘फार अशक्त वाटतं रे...’’
‘‘तुला काय काय आठवतं?’’
‘‘छे ! छे ! ते स्वप्नच असलं पाहिजे -’’
आणि मग ते वृद्ध गृहस्थ पुढे आले होते.
‘‘अच्युत, हे भगत. तुला काय झालं होतं ते मला माहीत नाही... पण तू जो आता आमच्यात परत आला आहेस तो या भगतांच्या मदतीनेच आला आहेस... आता ते प्रत्यक्षच बोलतील तुझ्याशी...’’
भगत अच्युतच्या कॉटशेजारच्या घडीच्या पत्र्याच्या खुर्चीवर बसले.
‘‘अच्युत, तू एका फार मोठ्या संकटातून वाचला आहेस. धोका पूर्णपणे टळलेला नाही - पण आता माझ्या मदतीने तू त्याचा प्रतिकार करणार आहेस. खरं तर तू आता खूप थकलेला आहेस, तुला विश्रांतीची गरज आहे... पण वेळही तितकाच महत्त्वाचा आहे... आताच आपण सर्वांनी आणखी नेट लावला पाहिजे. या क्षणापुरता विचार करून विश्रांतीत वेळ घालवला तर हेच काम आणखी कठीण होणार आहे... तेव्हा आता मी

तुला एक कप दूध घ्यायला सांगणार आहे... काही प्रश्न विचारणार आहे... मग दोन तास विश्रांती घ्यायला सांगणार आहे... आणि मग आपल्याला जायचं आहे...''
''कुठे?'' अच्युतने अस्पष्ट आवाजात विचारलं.
''त्या पडक्या वाड्यावर. जिथे ती काळी जोगीण वस्ती करून राहिली आहे. जिथे या सर्व प्रकरणाची सुरुवात झाली तिथे.''
नलिनी आतून दूध घेऊन आली. अच्युतचा नैसर्गिक आवाज तिच्या कानांवर कितीतरी दिवसांनंतर प्रथमच येत होता, पण पुन्हा एकदा तिचं मध्यमवर्गीय मन इतरांसमोर भीड, संकोच आणि लज्जा याखाली कचरलं असावं. कारण तिची मान वर आली नाही, तोंडून शब्दही आला नाही.
अच्युतने दुधाचा कप खाली ठेवताच भगत म्हणाले,
''अच्युत, तुझ्या स्वप्नातल्या देखाव्यांत, तुला तो पडका वाडा दिसला?''
''दिसला असेल... पण आठवत नाही -''
''लक्षात राहण्यासारखी आणखी एखादी जागा दिसली?''
''एकमेकांपाशी उभी असलेली तीन उंच झाडं दिसली.''
त्यांचे इतर प्रश्न लोकांचे वेश, भाषा, कपडे इत्यादींबद्दल होते. साडेनऊच्या सुमारास ते म्हणाले.
''अच्युत, तू आता पडून राहा, झोप आली तर उत्तमच. नाहीतर नुसता पडून विश्रांती घे. साडेअकराच्या सुमारास मी तुला हाक मारणार आहे.''

□□□

5

गोपाळ टॅक्सी आणायला गेला तेव्हा अच्युतसाठी एक कप गरम चहा बनवायला सांगितला होता. अगदी निघायच्या वेळी नलिनी दारापाशी उभी होती. आसपासच्या अंधाराने कदाचित तिची भीड चेपली असावी. अच्युतला हाताला हलकासा स्पर्श करून ती म्हणाली,

‘‘लवकर या परत.’’ आवाज अगदी खालचा होता. घोगरा झाला होता. कदाचित रडण्याने असेल. ती भांबावलेली असली पाहिजे. भगत किंवा गोपाळ यांचे आभार मानण्याचंही भान तिला नव्हतं.

टॅक्सी त्यांनी देवळापलीकडेच सोडली. त्या अरुंद रस्त्यावर मागे फिरायला टॅक्सीला एकदोनदा रिव्हर्स घ्यावे लागले. टॅक्सीचा लाल दिवा दिसेनासा झाल्यावर मग भगत त्या दोघांना म्हणाले, ‘‘अगदी आवश्यकच होतं म्हणून अच्युत तुला इथे आणला आहे - आणि माझं लक्ष इतरत्र गेल्यावर तुझ्याकडे लक्ष द्यायला कोणीतरी हवं म्हणून गोपाळ तुला आणलं आहे. आता माझ्या सूचना नीट ऐकून घ्या. या गोष्टींवर काहींचा विश्वास असतो, काहींचा नसतो; पण त्यांना एक गोष्ट समजत नाही - त्यांच्या विश्वास-अविश्वासावर एखाद्या घटनेचा खरेखोटेपणा अवलंबून नसतो. कारण त्यांच्या विश्वासाला शक्ती नसते. विश्वासात शक्ती असल्याशिवाय त्याचा बाह्यसृष्टीवर काहीही प्रभाव पडत नाही. सांगण्याचा मुद्दा हा की, तुमचे सर्व पूर्वग्रह आता दूर ठेवा. आपण एका अतिशय धोक्याच्या स्थानी जात आहोत. डोळ्यांना काही दिसणार नाही. स्पर्शाला काहीही जाणवणार नाही; पण म्हणजे तेथे काही नाही असं अजिबात समजू नका. उलटपक्षी जे काही दिसेल, ऐकू येईल, हातांना जाणवेल ते खरं असेलच असंही धरून चालू नका. कारण आसपासचा अवकाश भारलेला आहे, विकृत झालेला आहे - अनुभवांच्या संदभरिषा इथे तुटल्या आहेत किंवा पुसल्या गेल्या आहेत - आता दोघंजण शांत उभे राहून माझ्याकडे पहा - माझ्या नजरेला नजर द्या...’’

दोघांना काही समजण्यापूर्वीच ते दोघं संमोहनावस्थेत गेले होते. एक प्रकारच्या हुकमी आवाजात भगतांनी एक खास शब्द उच्चारला. ‘‘हा शब्द ऐकलात की तुम्हाला स्वत:ची ओळख पटेल. तुम्ही भानावर याल. आता मी हे तुम्हाला सांगितलं आहे हे विसरून जा... ठीक आहे... आता जागे व्हा...’’

काय झालं आहे याची त्या दोघांना काहीच कल्पना नव्हती. वेळेची मधली दोन मिनिटं कोरी गेल्याचंही त्यांना भान नव्हतं.

‘‘चला आपण जाऊ या -’’ भगत म्हणाले.

अच्युतला या परिसराची दुष्कीर्ती पूर्ण माहीत होती. तो आपली नजर पायावर ठेवत होता. तसा अंधार असला तरी खालची वाट मळलेली होती, दगड-गोटे, खांच-खळगे नव्हते. धूसर तारकाप्रकाश निळ्याकाळ्या आकाशातून ओघळत होता. एखाद्या अंधार कोठडीतून सुटल्यासारखं त्याच्या जिवाला अगदी मोकळं मोकळं वाटत होतं. हाच आनंद लुटण्याच्या सुखात तो समाधानाने चालत होता.

गोपाळ मात्र कुतूहलाने सर्वत्र पाहत होता. हे भग्न मंदिर आणि तो पडका वाडा यांच्या

संबंधात त्याने कालपासून किती विलक्षण गोष्टी ऐकल्या होत्या ! आयुष्यात अशा गोष्टी द्वितीय किंवा तृतीय हस्ते अनेक वेळा कानावर येतात - प्रत्यक्ष अनुभवायची संधी फार क्वचित वेळा मिळते. त्याला ती मिळाली होती - तिचा तो पुरेपूर फायदा घेणार होता.
झाडीचा शेवटचा पडदा मागे गेला. गोपाळ नवलाने समोर पाहतच राहिला. या सुंदर शिल्पाला अच्युत भग्नमंदिर म्हणतोच कसा? पांढऱ्या रंगाचे तट आकाशात गेले होते. तटाच्या माथ्यावर तेलांच्या दिव्यांची चमचमती रांग होती. प्रचंड महाद्वारं उघडी होती. आत सहस्त्र ज्योतींनी उजळलेल्या दीपमाळा होत्या. आवार आणि गाभारा भाविकांनी गच्च भरला होता. आरतीचा एक सामुदायिक घोष त्याच्यापर्यंत पोहोचत होता... त्याला आत जाऊन दर्शन घ्यायलाच हवं होतं... तो महाद्वाराकडे वळलासुद्धा...
कानात स्फोटासारखा एक आवाज झाला.
समोरचे सर्व दिवे मालवले गेले. उंचतट गेले. गजबजलेलं आवार आणि गाभारा गेला. पूजेचा घोष गेला.
समोर दगडांची रास होती. पडक्या भिंती होत्या. ओसाड पडलेलं प्रांगण होतं. कोसळलेले कळस होते. मंदिराच्या घुमटाभोवती एखाद्या प्रचंड रातपक्ष्यासारखं काहीतरी घिरट्या घालत होतं... स् स् स् स् आवाज करीत ते रात्रीनं गडप झालं.
भगत त्याचा खांदा हलवत होते. गोपाळला वरमल्यासारखं झालं.
‘‘गोपाळ,’’ भगत म्हणाले, ‘‘तू फसलास यात तुझा काहीच दोष नाही. मी मी म्हणणारे त्या भुलभुलैयात सापडून गटांगळ्या खातात. चल पुढे. सावध राहा. मी आहे ना तुझ्या मदतीला !’’
मंदिराची मागची भिंत मागे गेली तसा मंदिरातला घंटानाद सुरू झाला; पण आता त्याला संयम किंवा पावित्र्य नव्हतं. एखाद्या माथेफिरूने दोरी वाटेल तशी ओढावी तसा तो घण् ! घण् ! घण् ! आवाज येत होता. मूर्ती नसलेल्या त्या गाभाऱ्यात आता काय होतं याची कल्पनासुद्धा करायला मन धजत नव्हतं. भगतांच्या स्पर्शाखाली दोघांनी त्या भग्न देवालयाकडे निर्धाराने पाठ फिरवली आणि समोरचा रस्ता धरला.
इतका वेळ खाली पाहून चालत असलेल्या अच्युतने वाड्याचं पोर्च आलं तेव्हा मान वर केली. भयाने काठोकाठ भरलेली ही जागा. इथे मागे काय काय घडलं याचा नुसता विचारच जिवाचा थरकाप करीत होता, नाडीला एखाद्या पिसाटासारखी दौडवीत होता. आणि त्या जागेत हे भगत त्याला अशा मध्यरात्रीच्या सर्वांत अशुभ घटकेला नेत होते. अशा धोक्यात एखाद्याला टाकणारा त्याचा मित्र किंवा मदतनीस कसा असू शकेल?
गोपाळ म्हणत होता या भगतांच्या मदतीनेच केवळ तो त्या भयानक पिंजऱ्यातून सुटला होता; पण हे भगत कोण? त्यांची खरी माहिती कोणाला होती? गोपाळला तरी होती का? चेटूक, जंतर मंतर इत्यादीबद्दल त्यांची प्रसिद्धी असेल - पण ते त्याचा उपयोग कसा करतात याची कोणाला तरी माहिती होती का? त्यांनी आपल्याला एवढंच सांगितलं आहे - ‘मी नेतो तिथे, त्यावेळी चला -’ त्याव्यतिरिक्त काय? ते इथल्याच दुष्ट शक्तीचे हस्तक नसतील कशावरून?
पोर्चमधेच थांबून अच्युतने या भगतांच्याकडे तिरक्या नजरेने पाहिलं. (मोकळ्यावरही प्रकाश अंधुक होता; पोर्चमधे तर प्रकाश त्याहूनही कमी होता. इतक्या कमी प्रकाशात

आपल्याला हे बारकावे कसे दिसले याचा विचारही अच्युतच्या मनात आला नाही) भगतांचा चेहरा आता बदलत होता. ओठांवर एक छद्मी हास्य आलं होतं. खालच्या ओठांवर दात होते. डोळ्यांत एक मिस्किल छटा आली होती. अच्युतची खात्री झाली की वाड्याच्या दरवाजाचा उंबरा ही सीमारेषा आहे. सीमारेषेच्या आतला अवकाश भारलेला, घातकी आहे. सुटका करून घ्यायची असेल तर याच पावली, याच क्षणी हालचाल करायला हवी. हालचाल अनपेक्षित, वेगाची, जोरदार झाली पाहिजे. गोपाळलाही इशारा द्यायला हवा. हे भगत नक्कीच पाठलाग करणार - त्यांनाही एखादा जबरदस्त तडाखा द्यायला हवा. त्याने उजव्या हाताची मूठ आवळली,

''गोपाळ ! पळ ! धोका !'' अशी जोराची आरोळी देण्यासाठी खूप मोठा श्वास घेतला आणि वर नेला...

कानात एक प्रचंड आवाज झाला. डोळ्यांसमोर डोळ्यांना दिपवून टाकणारा लखलखाट झाला. काहीक्षण तो आंधळा आणि बहिराच झाला होता.

मग त्याचे डोळे सावकाश उघडले. समोर काहीच दिसत नव्हतं. अंधारी आली होती म्हणून नव्हे, तर समोर प्रकाशच नव्हता. हाताला होणाऱ्या स्पर्शावरून कळत होतं की डावी-उजवीकडे कोणी कोणी आहेत. भगत आणि गोपाळच अर्थात. विचारांना विलक्षण गती आली होती. आपण फसलो होतो, त्याला समजलं. किती सहज फसलो होतो !

''अच्युत, जे गोपाळला सांगितलं तेच तुला सांगतो. जे काही होत आहे त्यात तुझा एवढासाही दोष नाही. आपल्या ज्या काही निष्ठा असतात, चांगल्या-वाईटाचे आपले जे काही संकेत असतात ते मनात ठामपणे रुजलेले असले की या फसव्या शक्तींचा प्रभाव पडत नाही, पडला तरी टिकत नाही... तेव्हा घाबरण्याचं कारण नाही... चल...''

वाड्यात आणि त्यांच्या आसपास अगदी जाणवण्याइतका बदल झाला. अच्युत-गोपाळसारख्या अनभिज्ञांनाही जाणवलं की जी काही दुष्ट शक्ती त्यांच्या आसपास वावरत होती ती आता तिथे नाही आहे. जणू काही सर्वत्र पसरलेले तंतू आणि पाश त्या शक्तीने मागे खेचले होते. स्वत:ला एका कोषात दडवून ठेवलं होतं.

तो आता एक जुना, जरासा उदासवाणा; पण साधा पडीक वाडा झाला होता. इथे काही अनैसर्गिक शक्ती वावरत असतात, काही वेडेवाकडे प्रकार चालतात याची कोणाला शंकासुद्धा आली नसती. असं वाटत होतं की आता यापुढे भगत आणि त्यांचे सहकारी काय कृती करतात ते पाहण्यासाठी ती शक्ती पार मागे सरली होती, घटनांची वाट पाहत होती.

''या, आत या -'' भगत म्हणाले आणि त्यांनी हॉलमध्ये प्रवेश केला. त्यांच्या खांद्याला एक शबनम थैली लटकत होती. तिच्यातून त्यांनी लहानसा टॉर्च काढला, त्याचा प्रकाश सर्वत्र फिरवला. ते समोरच्या खोलीकडे निघाले. खोलीत पोहोचल्यावर त्यांनी थैलीतून मेणबत्ती काढली. गोपाळने काडीने ती पेटवली. भगतांनी मेणबत्ती मेजावर ठेवली. गोपाळजवळ टॉर्च दिला.

''खालच्या खोल्यातून पाहा - जरा बऱ्या स्थितीतल्या एक-दोन खुर्च्या दिसल्या तर इकडे आण.'' ते ज्या विश्वासाने बोलत होते त्याने गोपाळचा धीर परत आला होता.

तो टॉर्च घेऊन गेला. खोल्यांचो दार उघडल्या मिटल्याचा, सामान सरकवल्याचा आवाज येत होता. पाचएक मिनिटांतच तो पत्र्याच्या दोन घडीच्या खुर्च्या आपल्या मागे ओढत ओढत त्या खोलीत परत आला. भगतांनी टॉर्च घेतला. गोपाळला त्या दोन्ही खुर्च्या उघडून भिंतीपाशी ठेवायला सांगितलं. ते स्वत: एका लाकडी खुर्चीत बसले.
''आपण इथे कशासाठी आलो आहोत?'' शेवटी अच्युतने विचारले.
''तुला फसवून तिने तुझ्याकडून काही काही कबुली करार करून घेतले आहेत. ते इथेच, या खोलीतच झालं आहे. आता आपण ते करार रद्द करून टाकणार आहोत.''
''पण इथे आपल्याखेरीज दुसरं कोणीच नाही !''
''येतील ना ! आपण आल्याचं त्यांना माहीत आहे ! आपण काय करतो ते त्यांना पाहायचं आहे ! आणि ते नाही आले तर आपण त्यांना खेचून आणू की ! दोन-चार मिनिटं वाट पाहू...''
क्षणभर अच्युतला भगतांचा हेवा वाटला. त्यांच्या शब्दाशब्दांत केवढा दांडगा आत्मविश्वास भरून राहिला होता ! पण दुसऱ्याच क्षणी त्याच्या ध्यानात आलं - त्या आत्मविश्वासामागे शक्ती होती - आणि ती शक्ती त्यांनी वर्षान्वर्षांच्या खडतर साधनेतून प्राप्त करून घेतली होती.
तो म्हातारा तसाच बसून त्या तिघांकडे आळीपाळीने पाहत पाचएक मिनिटं झाल्यावर एक मोठा सुस्कारा सोडून भगत उठले. खोलीच्या भिंतीला पाठ लावून आणि दाराकडे तोंड करून ते बसले. हातांच्या पंजाचा कोन करून त्यांनी तो तोंडासमोर धरलं. त्यांच्या खोल श्वसनक्रियेवरून त्या शंकूत ते काहीतरी आवाज करीत असावेत; पण तो इतका खालचा, खर्जातला होता की अच्युत व गोपाळला त्या ध्वनीची अगदी क्षीणसर कंपनेच फक्त जाणवत होती. एकेका पट्टीवर ते तीस - तीस सेकंद, कधी मिनिटभरसुद्धा - स्वर लावत होते. मग त्याच्या किंचित वरची पट्टी... प्रत्येक वस्तूला, प्रत्येक संयुक्त घनरचनेला आपापली एक नैसर्गिक लय असते... त्या लयीशी सुसंवाद साधणारा नाद निर्माण झाला तर त्या रचनेत अनुनाद निर्माण होतो... त्याच लयीवर नाद स्थिर झाला तर त्या रचनेतील कंपनांचा विस्तार वाढत जातो... ही आत्मवर्धित्त क्रिया वेळीच थांबली नाही तर त्या रचनेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात...
भगतांचे स्वर आता श्रवण मर्यादित आले होते. वाड्यातली कोणती ना कोणती वस्तू अनुनाद देत होती - कधी एखादी काच थरथरत होती... कधी एखादं दार थरथरत होतं... भगतांची एकाग्रता तीव्र होती, संसर्गजन्य होती... जास्तीत जास्त शुद्ध आणि जास्तीत जास्त स्थिर नाद काढण्यावर यश अवलंबून होतं.
त्यांचा स्वर वर वर चढत होता. मध्येच एकदा कोणत्यातरी स्वरावर अच्युतच्या डाव्या हाताचा कोपरापासूनचा खालचा भाग फडफडायला लागला होता. दुसऱ्या हाताने घट्ट दाबून धरूनही त्याची फडफड थांबत नव्हती. भगतांचा स्वर चढला तेव्हाच ती थांबली. मधल्या एका स्वरापाशी ते थांबले. त्यांना काहीतरी जाणवलं असलं पाहिजे. त्यांनी बसण्याची बैठक बदलली, पाठ ताठ केली, खूप मोठा श्वास घेतला आणि तो स्वर लावला. आता त्यांनी स्वरातली शक्ती वाढवली होती. स्वर साधा असला तरी त्याच्याबरोबर खालचा आणि वरच्या सप्तकातली प्रगुण कंपने होतीच. शिवाय सुसंवादी

स्वर होतेच. खोल्याखोल्यांतून त्या स्वरांचे प्रतिध्वनी येत होते. वाड्याच्या कानाकोपऱ्यातून साद येत होती. असा हा ध्वनीचा प्रचंड कल्लोळ घुमत घुमत वर गेला...
वरच्या मजल्यावर दाण् दाण् आवाज व्हायला लागला. कोणाच्या तरी धडपडणाऱ्या पावलांचा आवाज यायला लागला. जिन्यावरून कोणीतरी धाडधाड खाली आलं... दुसरा जिना धाडधाड उतरून ते हॉलमध्ये आलं...
काहीतरी काळं खोलीच्या दारापर्यंत कडमडत आलं आणि कोसळलं... स्वराच्या प्रत्येक ललकारीबरोबर त्या काळ्या शरीराला आचके बसत होते... हात-पाय क्षीणसर हालचाली करीत होते... एक हात उंचावून थांबा ! थांबा ! अशी खूण करीत होता... भगतांनी आवाज थांबवला. एखादं वादळ घोंघावत दूर जावं तसा आसपासचा कोलाहल सावकाश सावकाश कमी झाला. अच्युत गोपाळने नकळत श्वास रोखून धरले होते. शरीरं ताठ केली होती... ती आता सैल पडली. (आणि अच्युत आजवर अर्जुनाच्या पांचजन्य शंखाच्या वर्णनाला भाकड कथा समजत आला होता !) रूकलेले श्वास मोठ्या उसाशात बाहेर पडले.
खोलीच्या दारापासचा काळा आकार आता सावकाश हालचाली करायला लागला. हात-पाय सरळ झाले, पाय जवळ आले, हातांचा जमिनीला नेट लागला आणि ती आकृती सरळ झाली.
अच्युतचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना.
तो एक खूप वयस्क, पिकल्या केसांचा, मळकट काळसर कपड्यांतला, थकलेल्या शरीराचा म्हातारा होता.
पायाखालची पायरी चुकल्यासारखा त्याला धक्का बसला होता. इथे काहीतरी चूक असली पाहिजे. त्याने भगतांकडे पाहिलं. अतिशय कठीण चेहऱ्याने ते त्या म्हाताऱ्याकडे एकटक पाहत होते.
''या ! आजोबा आत या !'' भगत शेवटी म्हणाले.
होता.
''शोभतं का तुमच्यासारख्या सभ्य लोकांना हे वागणं ?'' म्हातारा सात्त्विक संतापाने बोलत होता. आवाज घोगरा, थकलेला होता.
''असे चाळे करता? गरीब माणसाला उपद्रव देता?''
''आजोबा, आत या ! पुन्हा सांगणार नाही !'' भगतांचा आवाज तीक्ष्ण, कठीण, धारदार झाला होता. दहा सेकंद वाट पाहून त्यांनी आपले दोन्ही हात परत तोंडापाशी नेले. त्या म्हाताऱ्याला त्यांच्या हालचालींचा अर्थ बरोबर समजलेला दिसला.
''नको ! नको !'' म्हणत तो धडपडत उठला, पाठ वाकवून चालत खोलीत आला. भगतांनी दाखवलेल्या खुर्चीवर बसला. मेणबत्तीच्या प्रकाशात अच्युत आता त्याला नीट पाहू शकत होता. डोक्यावरच्या विरळ झालेल्या केसांपासून ते वयाने थरथरणाऱ्या निळ्या शिरा दाखवणाऱ्या हातांपर्यंत; पाणाळलेले डोळे, चोपलेले, राकट दाढी वाढलेले गाल; दात गेल्याने तोंडाचं झालेलं बोळकं; सुतळीसारख्या गळ्याच्या शिरा; मळकट काळसर (गळ्यापर्यंत बंद असलेला) कोट, तसल्याच रंगाची चुरगळलेली,

डागाळलेली, सैल पाटलोण... अनवाणी पाय... अनवाणी पाय... पण असे कसे? तो तर त्यांच्याकडे चेहरा करून बसला होता... मग पाय उलटे कसे? उलटे पाय... उलटे पाय. त्या उपहासगर्भ हसण्याचा आवाज इतका अचानक आला की अच्युत दचकून मागेच सरला.
खी: ! खी: ! खी: !
म्हातारा ताडकन् उठून उभा राहिला होता आणि हसत होता.
''पाहिलेस का पाय अच्युत? पाहिलेस का?'' तो अच्युतला विचारत होता, पुन्हा पुन्हा हसत होता. म्हणजे ती खूण त्याच्यासाठी होती तर ! उलटे पाय म्हणजे भुतं... पिशाच्चांची खूण ! अच्युत मान वर करून त्या म्हाताऱ्याकडे पाहू लागला. पाण्यातल्या प्रतिबिंबासारखी त्याची आकृती हेलकावे खात होती... लहानमोठी होत होती... डोळ्यांतला थकवा गेला होता... त्यांच्या आत काळ्या गुहा झाल्या होत्या. आत लाल ठिणग्यांची कारंजी उसळत होती... हांताऐवजी आता पंजे होते... पंज्यांच्या शेवटी टणक-अणकुचीदार डागाळलेल्या नख्या होत्या... ते हात लांब लांब होत होते... त्याच्या गळ्याकडे येत होते...
पुन्हा एकदा लखलखाट आणि खणखणाट झाला. क्षणभर खोली अंधारल्यासारखी झाली. दहा-पंधरा सेकंदांनी तोल परत आला. तेव्हा अच्युतला दिसलं की समोरच्या खुर्चीवर ती काळी जोगीण होती.
काळ्या कपड्यांतली कृश आकृती. आता डोक्यावरून पदर पुढे आला होता. चेहऱ्यावर (किंवा चेहऱ्याच्या जागी जे काही होतं त्यावर) सावली पडली होती. दिसत होते फक्त दोन डोळे. त्यांच्यातला लाल अंगार लपत नव्हता. ते अच्युतवरच एकटक खिळलेले होते. भगत किंवा गोपाळ यांना तिच्या हिशेबी काहीही किंमत नव्हती. ती तिच्या घाणेरड्या आवाजात म्हणाली,
''बोलावल्याशिवाय इथे कशासाठी आलास?''
अच्युत असहायपणे भगतांकडे पाहू लागला. त्यांनी हातानेच धीर धरण्यासाठी खूण केली, बोट ओठावर ठेवून गप्प राहण्याची खूण केली.
''मी त्याला घेऊन आलो आहे.'' भगत शांत आवाजात म्हणाले.
एखाद्या चवताळलेल्या वाघिणीसारखी ती त्यांच्याकडे वळली.
''आणि तू कोण नसत्या गोष्टीत चोंबडेपणा करणारा?''
तिची नजर चेहऱ्यावरून जाताच अच्युतला एकदम एखाद्या धगधगत्या भट्टीपासून दूर झाल्यासारखं थंडगार वाटल. त्याच्या सर्व शरीराला दरदरून घाम फुटला होता.
''तूच पहा की ! मी तर तुझ्यासमोरच आहे !'' भगत अगदी साध्या, नैसर्गिक आवाजात बोलत होते.
''इतकी का तुझी नजर आंधळी झाली आहे?''
ती स्वत:शीच रागाने मान हलवत होती.
''मी भगत.''
''भगत? !'' तिला धक्का बसला होता हे उघड होतं.
''पण त्याचा तर मी मागेच फडशा पाडला होता...''

‘‘नाही, फडशा पाडला नाहीस. एक अपारेहाय गोष्ट म्हणून त्यांनी तो सुटकेचा मार्ग स्वीकारला; पण त्यांच्या जागी दुसरा भगत होताच. आता त्या जागी मी आहे. आणि मागचे हिशेब पुरे करणार आहे. त्या आधी एक साधी गोष्ट या अच्युतला फसवून त्याच्याकडून तू काही करार मान्य करून घेतले आहेस... त्या बंधनातून तू त्याला मुक्त कर. त्यासाठीच मी त्याला इथे आणला आहे.’’
‘‘तुम्हा भगतांना या मूर्ख माणसांचा फारच पुळका ! ते आपल्याच लालसांच्या, वासनांच्या, मोहाच्या जाळ्यात स्वत:ला गुरफटून घेत असतात - एखादा कमी किंवा जास्त - एवढी फिकीर कशाला?’’
‘‘एवढी फिकीर अशासाठी की भगत होण्यापूर्वी मीही एक साधा मूर्ख मानवच होतो. आणि तू ज्या काळ्या जोगिणीचा अवतार घेऊन वावरत असतेस तीही पूर्वी एक मूर्ख मानवच होती. त्यांना त्यांची आयुष्यं हवी तशी जगण्याचा पूर्ण अधिकार आहे... चुका केल्या तर त्यांची प्रायश्चित्तं ते भोगतील... त्यात हस्तक्षेप करण्याचा तुला अधिकार नाही... त्याच्यावरची बंधनं काढून घे.’’
‘‘माझ्या हौसे, मौजेकरिता, करमणुकीकरिता मी त्याला ती त्याच्याकडे वळून हे म्हणताच त्याच्या मस्तकात आधी झिणझिण्या आल्या आणि मग मानेवरचा सर्व भागच बधीर झाल्यासारखा वाटला. एखाद्या कळसूत्री बाहुलीसारखा तो खुर्चीवरून उठून उभा राहिला... आपण हे करणार आहोत हेही त्याला माहीत नव्हतं... आणि पुढच्या क्षणी काय करणार आहोत याचीही कल्पना नव्हती... कदाचित एखाद्या सर्कशीतल्या अस्वलासारखा तो लहानशा उड्या मारत नाचेल... कदाचित रस्त्यावर खेळ करणाऱ्या डोंबाऱ्यासारखा कोलांट्या उड्या मारील... कदाचित एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्यासारखा वुफ् ! वुफ् ! गर्रर्रर्र ! करीत लोकांच्या अंगावर झेपासुद्धा घेईल... (हे विचार आणि ही घाणेरडी चित्रं त्याच्या मन:पटलावर कशी उठत होती? कोणीकडून येत होती?) तिच्या क्रूरपणे हसणाऱ्या चेहऱ्यावरून त्याला नजर काढताच येत नव्हती... त्याने एक पाय हवेत उंच उचललासुद्धा -
भगतांनी दोन्ही हातांचे पंजे त्याच्या डोळ्यासमोर मागे पुढे केले.
मेंदूवरची बंधनं गळून पडली. तो एकदम मागे खुर्चीत कोसळला. उभ्या उभ्याच भगत तिच्याकडे वळले.
‘‘आता मी तिसऱ्या खेपेस आणि अखेरचं सांगत आहे... याच्यावरचे तुझे पाश काढून घे. तुला माहीत नसलं तर सांगतो... आज सकाळी मीच या वाड्यात येऊन गेलो आहे... वरच्या तिसऱ्या मजल्यावरच्या खोलीपासून ते थेट तळघरातल्या विहीरीपर्यंतचा सर्व भाग मी पाहिला आहे... आणि आता मी सर्व तयारीनिशी आलो आहे...’’
जे झालं ते क्षणार्धात झालं. एका क्षणी ती खुर्चीवर निश्चल बसली होती. दुसऱ्या क्षणी एखाद्या काळ्या स्फोटासारखी ती अच्युत आणि गोपाळ यांच्यावर झेपावली... भगतांची नजर तिच्यावरून क्षणमात्र हलली... त्या निमिषार्धात ती सावलीसारखी गडप झाली.
भगतांच्या चेहऱ्यावर एक कडवट हास्य होतं.
‘‘ती इतक्या सरळपणे तुला सोडणारच नाही, अच्युत. ठीक आहे. मला इथे वाड्यातच राहावं लागणार आहे. आता तिचा बंदोबस्त केल्याखेरीज मला बाहेर पडताच यायचं

नाही. तुम्ही दोघं अच्युतच्या घरी जा व तेथेच थांबा आणि हे घ्या.''
त्यांनी थैलीतून अंगाऱ्याची पुडी आणि अगरबत्त्या काढल्या. शिवाय त्यांनी पत्ता असलेला एक कागदही त्यांना दिला. आता ते बोलले तेव्हा त्यांचा चेहरा अत्यंत गंभीर झाला होता.
''ती काय म्हणाली तुम्ही ऐकतच होतात. आमच्या परंपरेतल्या मागच्या एका भगतांना तिच्याशी संघर्ष करावा लागला होता. आणि त्यांना यश आलं नव्हतं... त्यांना आयुष्य संपवावं लागलं होतं... सर्व शक्यतांचा विचार करावाच लागतो... मी जर उद्या पहाटेपर्यंत तिकडे परत आलो नाही तर असं समजा की मीही अयशस्वी ठरलो आहे... अशा प्रसंगी तर तुमचा धोका अधिकच वाढेल... सकाळ होता होताच या पत्त्यावर जा. तुम्हाला सर्व मदत मिळेल.''
दोघांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनी त्या दोघांना दाराच्या दिशेन ढकलले.
''जा आता. थांबू नका.'' ते म्हणाले. त्या दोघांना काही बोलायला क्षणाचासुद्धा अवधी मिळाला नाही. भगतांचा शब्द मोडणे अशक्यच होतं. भगत त्यांचा शेवटचा निरोप घेत होते? त्याची गाठ पडल्याला जेमतेम चोवीस ताससुद्धा उलटले नव्हते !
''आमची काही मदत होण्यासारखी नाही का?'' अच्युत म्हणाला.
''नाही, पण तुझ्या मनात हा विचार आला हीच चांगली खूण आहे. माझ्यासाठी मनात सदिच्छा ठेवा. त्यांची शक्ती कमी लेखू नका. आणि आता जा. मला माझ्या कामाला लागलं पाहिजे.''

□□□

6

ते तिघं टॅक्सीतून गेले तेव्हा नलिनी गॅलरीतच उभी होती. आता त्या रिकाम्या घरात एकटीने जायची तिला भीती वाटत होती. काय काय विलक्षण आणि भयानक प्रकार त्या तीन खोल्यांत घडले होते ! तिची अवस्था जाणूनच की काय शेजारीणबाई म्हणाल्या,

‘‘नलिनीताई, त्यांच्यापैकी कोणी परत येईपर्यंत तुम्ही आमच्याकडेच का नाही थांबत? झोपलात तरी चालेल - तेवढीच विश्रांती मिळेल.’’ बाहेरच्या दाराला कडी घालून ती त्यांच्या मागोमाग त्यांच्या घरात गेली.

खरं सांगायचं तर त्या आदल्या रात्री गोपाळने लावलेल्या त्या अगरबत्त्यांच्या उग्र-कडवट दर्प तिन्ही खोल्यांत भरून राहिला होता. त्यानेच असेल; पण तिच्या डोक्यात सारखी कलकल होत होती. त्या दाराखिडक्यांखाली ओढलेल्या भस्मरेषांनाही एक दर्प होता. सकाळी जेव्हा तिने घर साफ केलं. तेव्हा कुंच्याच्या फटकाऱ्यांनी तिने त्या भस्माच्या रेषा उधळून टाकल्या होत्या. पुन्हा त्या ओढण्याचं गोपाळ विसरूनच गेला होता - तिनेही त्याला ती आठवण केली नव्हती.

बाहेरच्या मोकळ्या हवेत तिला खूपच हलकं वाटलं होतं. आता ती शेजारच्या घरात आली होती आणि तिथेच एका खाटेवर आडवी झाली होती. रात्रीचा उशीर झाला होता. सर्वजण चटचट आपापल्या घरात गेले होते. दिवे पटापट मालवले गेले होते, सर्वत्र निजानीज झाली होती.

गेल्या दोन दिवसांतले प्रसंग नलिनी आठवत होती. घटना एकाएकी तिच्या हाताबाहेर गेल्या होत्या. ती केवळ एक तटस्थ निरीक्षक झाली होती; पण अच्युतला मदत मिळत होती ही मुख्य गोष्ट होती.

हो की नाही? पण मग तिला असं अस्वस्थ का वाटत होतं? भगत घरात आले तेव्हा ती तिथे का थांबली नाही? घाईघाईने अगदी मागच्या खोलीत का गेली? अच्युत एवढा रात्रीचा त्या धोक्याच्या ठिकाणाकडे चालला असताना त्याच्यासाठी तिच्या ओठावर सांत्वनाचा-धीराचा एकही शब्द कसा आला नाही? ती त्यांच्यापैकी कोणाच्याच नजरेला नजर का देऊ शकत नव्हती? तिच्या घराबद्दल तिला ही चमत्कारिक नावड एकाएकी कशी उत्पन्न झाली होती?

हे सगळं चूक होतं... कोठेतरी काहीतरी घोटाळा झाला होता...

मनाशी स्वत:चाच स्वतंत्रपणे केलेला तिचा हा शेवटचाच विचार होता. क्षणभरात तिची स्वत:ची जाणीव हरपली. आसपासचा देखावा गरगर फिरत दूर दूर जात एका बिंदूत एकत्र येऊन लुप्त झाला. आवाज क्षीण झाले, नाहीसे झाले, वजनाची जाणीव गेली. सर्वच जाणिवा गेल्या.

तिचा चेहरा कठीण झाला होता. डोळे सताड उघडले होते. श्वास जोराने यायला लागला होता. हातापायांची जागच्या जागीच हालचाल सुरू झाली होती. शरीरात कशाने तरी प्रवेश केला होता - आणि ती रसरसती शक्ती शरीरात सामावली जाऊ शकत नव्हती. ती खाटेवर ताडदिशी उठून बसली. सुदैव, की तिचा हा भयानक अवतार पाहायला

तिथे कोणी नव्हतं. ते खांद्यावरून खाली आलेले मोकळे केस, लाल वटारलेले डोळे, फेंदारलेले नाक, आवळलेले दात, उघडणारी-मिटणारी, ताठ झालेली आकड्यांसारखी बोटं, शरीराला सारखे बसणारे हिसके... पाहणारा खासच किंचाळत लांब पळून गेला असता.
ती खोलीबाहेर गॅलरीत आली. तिच्या घराच्या दारापाशी उभी राहिली. एक पुसट आठवण तिला सारखी तिकडे खेचत होती. कडी काढून तिने दार जोराने आत ढकलंल. (सर्वांचं सुदैव म्हणून दाराच्या आत भस्माच्या रेषा नव्हत्या - नाहीतर ती आत गेलीच नसती - बाहेरच्या अंधाऱ्या रात्रीत गडप झाली असती.) ती आत आली. आपल्यामागे दार लावायची तिला शुद्धही नव्हती. घरात दिवाही लावायची तिला आवश्यकता भासली नाही. तीनही खोल्यांतून ती दाण्दाण् पावलं टाकीत येरझारा घालत होती. वाटेत एखादी खुर्ची किंवा स्टूल आलं तर पायाने जोराने लाथाडत होती... मध्येच दारावर, कपाटावर आदळत होती - पण खांद्याला, पायांना होणाऱ्या वेदनांची तिला शुद्धही नव्हती.
एका ठिकाणी थांबणं नाही. पावलापावलांनी अंधार तुडवणाऱ्या त्या शरीराला विश्रांती नाही. कपाळावरून घामाचे ओघळ वाहत होते. मध्येच कपाळावरून हात फिरला तेव्हा कुंकवाची टिकली मळवट भरल्यासारखी कपाळावर पसरली.
आत - बाहेर - आत बाहेर.
सेकंद, मिनिटं, तास उलटत होते.
मध्येच एकाएकी ती निश्चल झाली. कोपऱ्याकडे नजर लावून मान खाली वाकडी करून ती कशाचा तरी वेध घेत होती. मग स्वत:शीच हलली. तोंड एका हिडीस हास्यात वासलं.
भक्ष्याच्या मागावर असलेल्या हिंस्त्र श्वापदासारखी एक एक पाऊल टाकत ती बाहेरच्या दारापाशी आली. दाराच्या आतल्या बाजूस हाताच्या आकड्यावर उंचावून झेप टाकायच्या पवित्र्यात उभी राहिली. डोळ्यांत आसुरी चकाकी होती. श्वास तर धापा टाकल्यासारखा जोरजोराने येत होता.
खाली रिक्षा थांबली होती.
वर पाहत गोपाळ आणि अच्युत उतरत होते.
शेजाऱ्यांची झोपही सावधच होती. अच्युतच्या घरात जो काही प्रकार घडला तो इतका लोक - विलक्षण होता की सगळेच अस्वस्थ होते. रिक्षाचा आवाज ऐकताच एक दोघ गॅलरीत आले. अच्युतला नेहमीसारखं वावरताना पाहून त्यांची काळजी दूर झाली. (त्याच्या घरात प्रवेश केल्यावर मग काहीना काही जबाबदारी त्यांच्यावर आपोआपच आली होती. आता तो ठीक दिसत होता - म्हणजे त्या जबाबदारीचा शेवट झाला.)
शेजारीण नलिनीला जागी करायला गेली. (जो तो आपापल्या घरात आपापल्या माणसांबरोबर गेलेला बरा.) पण नलिनी कॉटवर नव्हती. उशी कोपऱ्यात भिरकावलेली होती. पलंगपोसाचा चोळामोळा झाला होता. चादर खाली जमिनीवर पडली होती. कोणीतरी अतिशय घाईत उठून निघून गेल्याच्या या खुणा होत्या.
जिन्याच्या तोंडाशीच ते अच्युत आणि गोपाळ यांची वाट पाहत थांबले होते. ‘‘कसं काय

वाटतं आता?'' अच्युतला केलेला प्रश्न औपचारिक होता. अच्युतने हातानेच ठीक आहे अशी खूण केली. ''नलिनी कुठे आहे?'' त्याने विचारलं. ''इथेच झोपंल्या होत्या - एवढ्यात घरात गेलेल्या दिसतात.'' शेजारीण म्हणाली.
एव्हाना गोपाळ घरासमोर पोहोचलाही होता. अच्युतच्या घराचं दार अर्धवट उघड होतं - पण आत दिवा दिसत नव्हता. सगळा अंधार होता. नलिनीचा त्याला जो काही अल्प परिचय झाला होता, त्यावरून सुरक्षिततेबद्दल ती इतकी निष्काळजी राहील असं वाटलं नव्हतं. त्या अंधारलेल्या खोल्यांकडे पाहता पाहता त्याच्या सर्व अंगावर एक बारीकसा काटा आला. हे साधं घर राहिलं नव्हतं. इथे विलक्षण भयानक प्रकार घडले होते आणि अजूनही घडण्याची शक्यता होती. कशावरून त्यांचा शेवट झाला होता? सावधपणाने वावरणं हेच शेवटी फायद्याचं ठरणार होतं.
तो दारापाशी उभा असतानाच अच्युत मागून आला आणि गोपाळ ''अच्युत ! अच्युत !'' म्हणत असतानाच ''नलिनी? नलिनी?'' म्हणत तो घरात गेला. त्याने दाराच्या आत पाय टाकला मात्र, बाजूच्या अंधारातून एखाद्या जनावरासारखं फिसकारत काहीतरी त्याच्या अंगावर जोराने झेप टाकून आलं... ''काय? काय?'' अच्युत म्हणत असतानाच तो खाली पडला... अंधारात काहीतरी झटापट चालली होती. एक आवाज अच्युतचा होता. दुसराही आवाज होता; पण तो माणसाचा वाटचत नव्हता.
या क्षणाइतका शीध्र विचार गोपाळने कधीही केला नव्हता. त्याचा मेंदू विजेच्या गतीने काम करीत होता. नलिनीच स्वत: त्या घातकी प्रेरणेखाली आली होती हे उघड होतं. आणि जो उपाय अच्युतसाठी वापरला होता तोच तिच्यासाठीही वापरावा लागणार होता.
सुदैवाने त्या अगरबत्त्या त्याने अच्युतजवळ दिल्या नव्हत्या. स्वत:पाशीच ठेवल्या होत्या. त्यातली एक त्याने शिलगावली - पण हात कापत होते; एक काडी मोडली; दुसरीही विझली; तिसऱ्या काडीने अगरबत्ती पेटली.
एखाद्या शस्त्रासारखी ती सरळ समोर धरून गोपाळने सपाट्याने घरात प्रवेश केला. पाचसात सेकंदातच झटापटीचे आवाज थांबले. ''बाप रे ! बाप रे !'' पुटपुटत अच्युत उभा राहिला आणि त्याने दिवा लावला.
खाली फरशीवर नलिनी अस्ताव्यस्त अवस्थेत पडली होती.
तिचे केस विस्कटलेले होते; साडीवर धुळीचे - तेलाचे डाग होते; ब्लाऊजची एक बाही फाटून लोंबत होती; कपाळावर कुंकवाचा फराटा होता; चेहरा घामाघूम झाला होता - पण चेहऱ्यावरचा भाव मात्र या साऱ्याशी संपूर्ण विसंगत होता - चेहरा अगदी शांत होता.
''गोपाळ ! हे काय रे !'' अच्युत धापा टाकत म्हणाला.
''आधी आपण वहिनींना खाटेवर झोपवू या -'' गोपाळ म्हणाला. हातातली अगरबत्ती त्याने कपाटाच्या दारात खोचली. दोघांनी नलिनीला उचलून आत कॉटवर झोपवलं. अच्युत ओल्या फडक्याने तिचा चेहरा पुसत होता; तोवर गोपाळ सर्व दाराखिडक्यांच्या आतल्या बाजूला या भस्माच्या रेषा काढत होता. सर्व रेषा एकदा नीट तपासून मग तो आत येऊन बसला. घड्याळात पाहिलं ते रात्रीचे पावणेदोन वाजले होते. पहाट यायला किमान चार तासांचा अवधी होता. अच्युतच्या उशाशी बसून जागून काढलेली रात्र

त्याला आठवली - तिचीच ही पुनरावृत्ती होती.
''अच्युत'' गोपाळ म्हणाला, ''काही काही गोष्टी स्पष्टपणे बोलण्याची वेळ आली आहेस. मला वाटतं. तुला जो विकार झाला होता - सरळच म्हणू की तू जो पछाडला गेला होतास - त्या अवधीत वहिनी तुझ्याबरोबर या घरात एकट्याच होत्या. त्याच पछाडण्याचा संसर्ग त्यांनाही झालेला आहे... केव्हा आणि कसा हे आता कोणीच सांगू शकणार नाही... पण तुझ्या वेळी मदतीला भगत होते - आता ते असतीलच याची शाश्वती देता येत नाही. त्यांचे शेवटचे शब्द मोठे सूचक होते...आठवतं का ?... तेव्हा आता आपल्याला पहाटेपर्यंत वहीनींवर जागता पहारा ठेवला पाहिजे... आणि पहाटेसच भगत परत येतील अशी आशा करत राहिले पाहिजे...''

□□□

7

अच्युत आणि गोपाळ दिसेनासे होईपर्यंत भगत पोर्चच्या दारातच उभे होते. आणि मग ते आत वळले. अच्युतला अर्धवट आठवत असलेली ती तीन उंच झाडांची जागा त्यांच्या ध्यानात होती. वाड्याच्या तळघरात विहीर होती. तिथूनच एखादा चोरमार्ग निघून त्याचं तोंड बाहेर त्या तीन वृक्षांच्यामध्ये उघडत असलं पाहिजे... या वाड्यात जे काही दबा धरून बसलं होतं त्याचे वाड्याबाहेर जाण्याचे सर्व मार्ग बंद करून त्याला वाड्यातच कोंडून त्याचा नाश करायला हवा होता; पण ते एकटे होते. एखादा विश्वासू सहायक जवळ असण्याची या क्षणाइतकी निकड आजवर त्यांना कधीही भासली नव्हती.

इतका वेळ त्यांनी आपला निर्यास गुंठित ठेवला होता. आता त्याची आवश्यकता नव्हती. एका साध्या मानसिक क्रियेने त्यांनी स्वत:वरची ती आवरणं दूर केली. थैलीतून लाल रंगाची कशीदा काम केलेली अगदी पातळसर शाल काढली, ती दोन्ही खांद्यावरून लपेटली. त्याच थैलीत साधी सुताची वाटणारी लड होती. थैलीतल्या शुद्ध, निर्भारित कवचातून बाहेर येताच सुतातून (किंवा सुताभोवती) निळसर-हिरवा प्रकाश चमकायला लागला. आसपासचा अवकाश दुष्ट, विकृत शक्तीने भारल्याची ती खूण होती.

भगत खालच्या सर्व खोल्यांतून फिरत होते. जेवढे जेवढे बाहेर जाणारे दरवाजे आणि खिडक्या दिसल्या तिथे तिथे त्यांनी या सुताचा एक तुकडा लावून त्या वाटा सीलबंद करून टाकल्या. त्यानंतर पहिला मजला व त्यानंतर त्यावरचा मजला, सर्वत्र त्यांनी हीच क्रिया केली. अगदी वरच्या मजल्यावर सुताला प्रकाश नव्हताच - याचा अर्थ ती खाली होती - तळघरात असणार.

भगत खाली आले. पूर्वी जिथे स्वयंपाकघर होतं तिथे आले.

जमिनीतील मोठ्या-आडव्या फळ्यांच दार होतं, आता फळ्या कुजल्या होत्या, तडकल्या होत्या, वाकल्या होत्या. दोन हातांनी दोन फळ्या धरून त्यांनी त्या उचलून बाजूस टाकल्या. खाली फरशीच्या पायऱ्या गेल्या होत्या.

बाहेरच्या खोलीतली मेणबत्ती हातात घेऊन भगत त्या पायऱ्या उतरले. पायऱ्या भिंतीला लागूनच होत्या. भिंतीवर ओल होती, शेवाळ होतं, दुर्गंध होता. पायऱ्याही बुळबुळीत झाल्या होत्या. सुमारे वीस पायऱ्या उतरल्यावर तळघराची फरशी आली.

तळघराच्या मध्यभागी विहिरीचं काळं तोंड होतं.

भगतांच्या मनाला भीतीचा पुसटसाही स्पर्श झाला नव्हता. भीती कोणाला वाटेल? जो आपला जीव, आपलं आयुष्य जपण्याची धडपड करत असतो त्याला. भगतांनी तन-मन-धन यावर केव्हाच पाणी सोडलं होतं. या जीवनात किंवा जीवनानंतरही त्यांना कशाचंही भय नव्हतं. त्यांची काळजी घेणारे इतर होते. अपघाताच्या क्षणी विमानचालक एक लहानशी कळ दाबतो - एक यांत्रिक रचना त्याला बाहेर फेकते, छत्री उघडते, त्याला सुखरूप धरतीवर आणते. त्याला स्वत:च्या बचावाची काळजी करावी लागत नाही. भगतांच्या मनात तशीच एक कळ होती. प्रसंग निकरावर आले, खरोखरच आवाक्याबाहेर जाण्याची चिन्हं दिसू लागली तर वापरण्यासाठी ती कळ

होती. (जशी पूर्वीच्या एका भगतांनी अगदी निरूपाय होऊन वापरली होती.)
भगतांनी मेणबत्ती विहिरीच्या काठावर ठेवली. तिथेच ते स्वत:ही मांडी घालून बसले. थैलीतून त्यांनी एका जाडसर कागदाची कापून बनवलेली मानवी बाह्यरेषांची आकृती त्याने काढली. पायांखाली कोरा कागद होता. त्याला मागे घडी घालताच ती आकृती फरशीवर ताठ उभी राहिली. स्वत: भगत संरक्षित असल्याने त्यांना आसपासच्या अवकाशात कोणत्या विध्वंसक शक्तींचा नंगानाच चालला आहे याची कल्पनाच आली नव्हती. त्यांच्या थैलीच्या संरक्षणाबाहेर येताच ती कागदी बाहुली पाहता पाहता धुरकटली, काजळली, होरपळून गेली.
त्यांच्या मनात सतत ती तीन झाडांच्या मधली बाहेरची वाट येत होती. कोणतं तरी आमिष दाखवून त्या जोगिणीला वाड्यात आणण्याची त्यांची खटपट होती - की लगोलग मागे विहिरीचा मार्ग बंद करून टाकता आला असता. वरच्या मजल्यावर वापरलेल्या सुताच्या लडीतीलच सूत त्यांनी काढलं, मेणबत्तीच्या मध्यभागी गाठ मारून बांधलं, आणि मेणबत्ती बरोबर आडवी करून त्या सुताने सावकाश खाली विहिरीत सोडली. सुताभोवती हिरवट-निळसर चकाकी आली होती. सुताला तर नाहीच, मेणबत्तीलासुद्धा स्पर्श होणार नव्हता.
विहीर चांगली सहा फूट व्यासाची होती. भिंतीजवळून मेणबत्ती जसजशी खाली जात चालली तसतसा तिच्या प्रकाशात हिरवट शेवाळाने लेथाडलेला, ओलसर फरशांचा काठ येत चालला. त्या प्रकाशात भगताना दिसलं की विहिरीच्या भिंतीत अनेक लहानमोठ्या कपारी आहेत. कदाचित त्या खालच्या खडकात बऱ्याच लांबपर्यंत आतवर गेलेल्या असतील. लपण्याच्या जागा असंख्य होत्या. विहिरीत स्वत:च उतरण्याचा विचार त्यांना सोडून द्यावा लागला. त्यांनी मेणबत्ती हलकेच वर ओढून घेतली आणि काठावर परत ठेवली.
गेली अनेक वर्षे या पडक्या वाड्यावर वावर करणाऱ्या, काळ्या जोगिणीच्या रूपात वावरणाऱ्या त्या पाशवी शक्तीने वाड्याचा अवकाश स्वत:ला हवा तसा 'घडवून' घेतलेला असणार यात शंका नव्हती. कोणत्या ठिकाणी 'असणे' तिला कठीण नसलं तरी या वाड्याची जागा सर्वांत जास्त सोयीची असणार. शक्यतोवर ती या वाड्यालाच धरून राहण्याचा प्रयत्न करील अशी त्यांची अटकळ होती. आणि दुसरा असाही एक तर्क होता की (एव्हाना तिला त्यांचं अस्तित्व खासच जाणवलेलं असणार) ते आता काय करणार आहेत यासंबंधीच्या एका कुतूहलाने ती विहिरीत वरवरच वावरत असणार. निदान असा अंदाज करून एक नवा प्रयत्न करायला हरकत नव्हती.
थैलीतून त्यांनी एक लहानशी शिशी काढली. त्यात काळ्या पोतीच्या मण्यांसारखे अगदी लहान काळे गोलसर मणी होते. त्यातले पंचवीस-तीस त्यांनी चिमटीत घेतले आणि ठराविक लकबीने एका शब्दाचा उच्चार करून ते मणी विहिरीत टाकले. हिरवट निळ्या प्रकाशाने सर्व मणी क्षणमात्र चमचमले आणि मग पाण्यात पडले. क्षणार्धात ते पाण्यात विरघळले आणि त्यांचा एक अतिशय पातळ थर पाण्यावर पसरला.
अनेक पाखरं फडफडल्यासारखी विहिरीत फडफड झाली. असं वाटत होतं की काहीतरी बोजड पण लिबलिबीत असं विहिरीच्या आतल्या भिंतीवरून दगडांच्या

फटींचा आधार घेत गोल गोल फिरत आहे... खालच्या पाण्यावर कशाचातरी स्पर्श झाला...
हु स् स् स्... ! आवाज होऊन काहीतरी सपाट्याने वर आलं...
विहिरीच्या समोरच्या काठावर ती काळी जोगीण होती.
आता ती कोठे जाऊ शकत नव्हती. तिचे बाहेर जाण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. तिच्या आकाराचं ते स्वस्थपणे निरीक्षण करू शकत होते.
डोळ्यांवरून काळपट कापडाचा पदर खाली आला होता. पदराखालून दोन लाल डोळ्यांची नजर त्यांच्यावर रोखलेली होती. त्या डोळ्यांखाली चेहऱ्याच्या अस्पष्ट रेषा होत्या. दुर्बल, गलितगात्र वाटणारं हे बाह्यरूप फसवं होतं. भयानक शक्ती तिच्या कराग्रांवर नाचत होत्या. पाषाणांसारख्या जड वस्तू, तशाच मनातल्या विचारचित्रांसारख्या अत्यंत तरळ वस्तू ती तितक्याच सहजपणे हाताळू शकत होती.
थैली खांद्याला लटकावून, मेणबत्ती हातात उचलून घेऊन भगत विहिरीला वळसा घालून तिच्या दिशेने निघाले. अर्धेअधिक अंतर कापल्यावर ते थांबले. ती तिच्या खसखसत्या आवाजात म्हणाली,
''थांबलास का रे थेरड्या? ये की पुढे !''
भगत काहीच बोलले नाहीत. शांतपणे तिच्याकडे पाहत उभे राहिले.
''भयाने गारठालास का थंडीने गारठलास थेरड्या? ये की पुढे !''
भगतांनी स्वत:शीच मान हलवली, थैलीत हात घातला आणि एकमेकांत गुंफलेल्या तीन काळ्या दोऱ्यांची पातळसर साखळी बोटांनी वर काढली. ती साखळी पुढे करीत ते म्हणाले,
''केलेल्या पापांच्या पश्चात्तापाची आणि त्यांच्या परिमार्जनाची संधी तुला दिली पाहिजे. ती आमची आद्यपरंपरा आहे. ही आमच्या पिठाची शृंखला आहे. ये, हिचा स्वीकार कर, ही गळ्यात घाल... आपल्या पापांचा जाहीर उच्चार कर, प्रायश्चित्त घे आणि पवित्र हो. तो मार्ग सर्वांसाठी खुला आहे. ये ही संधी दवडू नकोस.''
कठीण शब्दांनी अगर आसुडाच्या फटकाऱ्यांनी चवताळली नसती इतकी ती भगतांच्या या साध्या, सौजन्यपूर्ण शब्दांनी चवताळली. संताप तिच्या शरीरात मावत नव्हता. हातांच्या बोटांतून ठिणग्या उडत होत्या. तिच्या आसपासची हवा घुसळली जात होती.
''मला तू क्षमा करणार थेरड्या? तू? त्या दरिद्री झोपडीत बसून राख चिवडणारा तू ढोंगी ! त्या लाल अलवणाच्या खोलीत धुराच्या खकाण्यात चिंध्या आणि पानं आणि कौलं यांच्यावरच्या रेघोट्या गिरवत बसणारा तू कपटी ! खरं तर पन्नास वर्षांपूर्वीच तू माझ्या हातात सापडला होतास - पण अगदी पाण्यात उडी घेणार होतास तेवढ्यात तो थेरडा भगत तिथे कडमडला... ठीक आहे ! तेव्हा नाही तर आता !''
तिने हात वर केले तसं ते काळं वस्त्र अजस्र पंखांसारखं घड्याघड्यांनी उलगडलं. जणू काही रात्रीच्या आकाशाचेचे ते खंड होते; पण त्यांच्यावर चितारलेली तारकानक्षत्रं विकृत होती...
भगतांच्यापासून पाच पावलांवर येऊन ती थांबली. पवित्रा तसाच झेप घेण्याचा होता.

काळे पंख सावकाश सावकाश हलत होते... तो काळवारा त्यांच्यावरून जात होता... वर्षे, दशके, शतके, सहस्रके, युगेयुगे ओलांडण्याची त्या काळवाऱ्यात शक्ती होती. एकेका हेलकाव्यासरशी मानवाची साम्राज्य उभी राहत होती. धुळीला मिळत होती... जगांच्या उलथापालथी करणारा तो ब्रह्मांडवारा भगतांच्यावरून जात होता आणि त्यांनी खांद्याभोवती पहेनलेल्या शालीत मागे कोणतीही खूण वा मागमूस न ठेवता शोषला जात होता, शिरत होता, नाहीसा होत होता.

''सांग थेरड्या तुला मृत्यू कसा हवा? तुझं नाक-तोंड दाबून तुला गुदमरवून मारू? का तुझं शरीर आगीवर धरून त्याची काळी खापरं करून टाकू? तुझ्या शरीरातले सर्व रस आटवून टाकून तुला चोयटीसारखा चौथा करू? का तुझ्या पोटात वखवखवलेले कृमी कीटक सोडून शरीर आतून कुरतडून काढू? का तुझ्या शरीरावर दाहक आम्लाचा फवारा सोडून त्वचा- मांस- मज्जा- रूधीर वितळवून टाकू आणि मागे एक सांगाडा ठेवू? सांग ! तुला मृत्यू कसा हवा?''

भगतांनी आता खांद्यावरची शाल उलगडली होती. तिची दोन टोकं दोन हातात धरून ती पाठीमागे पसरली होती. शालीवरचं कशीदाकाम आता स्वत:च्या तेजाने तळपत होतं. रेषा वाहत होत्या. चक्रं गरगर फिरत होती. भगतांचा चेहरा कठीण झाला होता. आपल्याला शारीरिक इजा करण्याची तिच्यात शक्ती आहे याबद्दल त्यांना काहीही शंका नव्हती.

''मृत्यू माझा शत्रू नाही, मित्र आहे.'' ते म्हणाले, ''त्याची मला कधीच भीती वाटली नाही - आम्हा भगतांना मृत्यू कधीही भेडसावत नाही... वेळ येते तेव्हा आम्ही त्याचे हसत स्वागत करतो... तुला अनुभवानेच हे माहीत असायला हवं!''

''हो ! तो एक माझ्याहातून सुटला खरा ! पण तू नाही सुटणार !''

तिने झेप घेतली. भगतानी शरीराभोवती शाल आणली. त्या शालीतच तिची बहुतेक सर्व शक्ती शोषली गेली. एक अगदी लहान अंश भगतांच्या शरीरापर्यंत पोहोचला... पण तो क्षण असह्य वेदनांचा होता. शरीर आंचेवर धरलं होतं. शरीर चरकात पिळवटलं जात होतं. शरीरात सहस्रावधी तीक्ष्ण शस्त्रे घुसत होती...

मग ती लाट त्यांच्यावरून गेली होती. त्यांनी डोळे उघडले.

अंधाऱ्या तळघरात लालपिवळा प्रकाश कसला होता.

त्यांनी मागे नजर टाकली. तिच्या शरीराभोवतीच्या काळपट वस्त्राने पेट घेतला होता. ज्वाला धडधडत होत्या. तिचा वेश हाही मायावीच होता. वस्त्राच्या प्रतिमेसाठी अंतर्द्रव्यच वापरलं होतं. अग्नी हाही संकेतच होता. नाश हा त्याचा अर्थ होता.

तिने शरीराचं रूप बदललं. मानवी वेश टाकून दिला. ती एखाद्या खडकासारखी किंवा लाकडीतुळईसारखी झाली असेल - पण शालीच्या स्पर्शाने घुसलेलं शल्य नाश करीतच असणार... फक्त तो आता अदृश्य पातळीवर होतं इतकंच.

शरीर सावरण्यासाठी त्यांना काही मिनिटांची विश्रांती आवश्यक होती. तळघरातल्या अवकाश त्यासाठी अयोग्य होता. ते मागे न पाहता पायऱ्या चढून वर आले, वरच्या दिवाणखान्यात मध्यभागी बसले आणि डोळे मिटून सर्व शक्ती त्यांनी आत ओढून घेतल्या.

त्यांच्यामागोमाग सावलीसारखी आलेली ती काळी आकृती त्यांच्या आकलनाच्या परीघाबाहेरच होती (कदाचित क्षणभरापूर्वीच्या त्या आघाताचाही हा परिणाम असेल.) भगतांनी डोळे मिटताच त्या काळ्या आकाराने त्यांच्याभोवती उलट्यासुलट्या अशा अनेक फेऱ्या मारल्या. आणि मग ती आकृती धुरासारखी हलकी आणि विरळ झाली, हवेत वर वर चढली. आढ्यात कोपऱ्याला एक लहान छिद्र होतं. त्यातून धुरासारखी ती बाहेर पडली आणि रात्रीच्या काळोखात तरंगत गडप झाली.
स्वत:ला सावरण्यासाठी तेवढे दहापंधरा सेकंद भगतांना पुरेसे होते. त्यांनी डोळे उघडले - आणि तत्क्षणीच त्यांना वाड्यातला बदल जाणवला. 'ती' वाड्यातून गेली होती. तिचे बाहेर जाण्याचे सर्व मार्ग बंद करण्याचे त्यांचे प्रयत्न शेवटी फसले होते. कोणती तरी चोरवाट उघडी राहिली होती.
आणि ती कोठे गेली असणार हे आरशासारखं स्पष्ट होतं.
अच्युतकडे, अर्थात ! ज्या अच्युतने भगतांचा या प्रकरणात प्रवेश करवला होता, एखाद्या पाळीव कुत्र्यासारखा बांधलेला जो अच्युत तिच्या बंधनातून मुक्त होण्याच्या आशा बाळगून होता, त्या अच्युतकडे, अर्थात ! त्याला धडा शिकवण्यासाठी. त्याच्या गळ्याभोवतालची तात आणखी घट्ट आवळण्यासाठी.
त्यांना लवकरात लवकर तिथे पोहोचायला हवं होतं.
पण ही आडबाजूची जागा. आता वाहन मिळणंही अशक्य होतं. निदान कॉजवे लागेपर्यंत तरी नाहीच नाही. आणि वाड्याच्या शुद्धीकरणांचं कामही त्यांना आता लांबणीवर टाकावं लागणार होतं.
त्यांनी थैली खांद्याला लावली, शालीची घडी केली, तीही खांद्यावर टाकली, ते मोठ्या दारापाशी आले.
खाली ठेवलेल्या सुतावरची निळसर हिरवी चकाकी गेली होती. त्यांचा आधीचा तर्क खरा होता याचाच हा पुरावा होता. पोर्चमधून ते देवळामागच्या रस्त्यावर आले.
दोन्ही अंगाला संपूर्ण निर्जन रस्ता नजरेच्या अंतापर्यंत पसरला होता. कॉजवेच्या दिशेने झपाझप पावलं टाकत ते निघाले.
यापेक्षा जास्त वेगाने जाता आलं असतं; पण शरीरातल्या शक्तीचा अपव्यय करून चालणार नव्हतं; कारण संघर्ष अजून संपला नव्हता. तिची शेवटची गाठ अजून पडायची होती.

□□□

8

गोपाळ आणि अच्युतच्या रात्रीच्या त्या जागरणाला एक वेगळीच धार आली होती. केवळ रात्र उलटल्याने, पहाट झाल्याने त्यांचे प्रश्न सुटणार नव्हते. कारण आता मदतीला भगत असतीलच याची खात्री नव्हती.
गोपाळने अच्युतला खाटेशेजारी बसवलं आणि स्वयंपाकघरात शोधाशोध करून दोन कप कडक कॉफी बनवली. दोघंही त्या रात्री विलक्षण अनुभवातून गेले होते, शरीर आणि मनं थकली होती; पण सर्वांत जास्त जागरूक राहण्याची ही वेळ होती.
कॉफी घेता घेता दोघं बोलत होते. होत असलेल्या प्रसंगावर चर्चा म्हणजे दोन अनभिज्ञांचे तर्कवितर्क होते - पण त्या खेरीज रोजच्या साध्या विषयावर बोलणंही अशक्यच होतं - कारण काल रात्रीपासून त्यांचा प्रवेश एका सर्वस्वी अनोख्या अकल्पनीय अनुभवविश्वात झाला होता.
एक अगरबत्ती संपत आली - तिथे गोपाळने दुसरी लावली.
दुसरी संपत आली - त्याजागी त्याने तिसरी लावली.
रात्रीचे तीन वाजले होते. त्याने एक भलीमोठी जांभई दिली. तिसरी संपत आली आणि तो उठायला लागला तेव्हा अच्युत त्याला म्हणाला,
‘‘गोपाळ, तू बसरे आता - मी बदलतो.’’
कोणता योगायोग अर्थपूर्ण असतो? कोणता निसर्गाची लहर असतो?
अच्युतच्या लहानशा घराभोवती एक अदृश्य वादळ गरगरत होतं. आत प्रवेश करण्यासाठी सूक्ष्म का होईना वाट शोधत होतं. प्रवेशाच्या सर्व वाटा बंद होत्या. त्या भस्मरेषांना स्पर्श म्हणजे अग्नीचा दाहक, भस्म करणारा स्पर्श.
एका खिडकीचं पाल पूर्ण बंद झालं नव्हतं, थोडासा भाग बाहेर होता.
अच्युत नवीन शिलगावलेली अगरबत्ती घेऊन वर कपाटात खोचण्यासाठी नेत होता.
वाऱ्याची जोराची वावटळ आली.
खिडकीचं पाल खाड् ! आवाज करून बाहेरच्या भिंतीवर आपटलं.
आवाज इतका जोराचा आणि इतका संपूर्ण अनपेक्षित होता की ऑ? करून अच्युत दचकला. अगरबत्तीचं जळतं टोक कपाटाच्या दारावर आपटलं... ती एक ठिणगी खाली पडली - अगरबत्ती विझली.
नलिनीचे डोळे खाडकन् उघडले. विस्फारले. आतली बुबुळं गरगर फिरायला लागली. आणि मग ही ! असा आवाज करून ती कॉटवर ताडदिशी उठून बसली.
‘‘गोपाळ!’’ अच्युत मोठ्याने ओरडला.
गोपाळचं प्रसंगावधान शाबूत होतं. तो खुर्चीतून सपाट्याने उभा राहिला. त्याने अच्युतचा एक हात धरला, त्याला खोलीबाहेर ओढत नेला,
‘‘आधी बाहेर चल ! बाहेर !’’ तो ओरडत म्हणाला. घराच्या बाहेरच्या दाराला कडी होती, बोल्ट लावला होता. थरथरणाऱ्या बोटांना ते कधी सापडणारच नाहीत की काय, गोपाळला वाटलं. एकाच क्षुल्लक गोष्टीमुळे ते वाचले. नलिनी खाटेवरून वेगाने उतरायला गेली. सर्व अंगभर पातळसर चादर घातलेली होती. त्या चादरीत दोन्ही पाय

गुंडाळले गेले, आणि तो कॉटपाशीच खाली पडली. तिने शांतपणे पाय मोकळे केले असते तर तिने या दोघांना केव्हाच गाठलं असतं - पण -शांतपणा 'तिच्या' स्वभावातच नव्हता. ती जोरजोराने पाय झाडत होती, तोंडाने फिसकारल्यासारखे आवाज करीत होती, जमिनीवर गडबडा लोळत होती...
शेवटी तिने हातांनी चादरीचे पदर हातात धरून तिच्या अक्षरश: चिंध्या केल्या, त्या दूर फेकून दिल्या आणि घाईघाईने ती उभी राहिली - इतकी घाईने की पुन्हा एकदा तिचा तोल जवळजवळ गेलाच. आणि मग ती सपाट्याने त्यांच्या मागोमाग आली.
गोपाळने दार कसंतरी उघडलं, अच्युतला बाहेर ढकललं आणि त्याचं पाऊल बाहेर पडतं न पडतं तोच ती तेथपर्यंत येऊन पोहोचली. त्याला धरण्यासाठी तिने हवेतून हाताचा सपका मारलाही होता... त्या हाताची नखं त्याच्या शर्टची पाठ फाडून गेली. पाठीजवळून एखादा जळता निखारा गेल्यासारखी त्याला आच आणवली. मग तो बाहेर होता.
आणि ती दाराच्या आत उभी होती.
खोलीत दिवा नव्हता. लांबवरच्या ट्यूबलाईटचा अस्पष्ट प्रकाश तिच्यापर्यंत पोहोचत होता - आणि तेच बरं, तिच्यापासून दोन हातांवर उभ्या असलेल्या अच्युतला वाटलं. अर्धवट दिसतंय तेच पुरेसं भयानक आहे. आत होती ती त्याची प्रिय नलिनी नव्हतीच. दुसरंच काहीतरी तिच्या शरीरात शिरलं होतं... तिच्या चेहऱ्यावर असे सैतानी, राक्षसी, क्रूर भाव कधी येणार नाहीत. ती अशी हातांच्या आकड्या करून, दात विचकून, पायांनी एखाद्या गुरासारखी जमीन घासत, त्याच्यावर हल्ला करण्यासाठी - वखवखून उभी राहणारच नाही...
''अच्युत'' गोपाळ हलकेच म्हणाला, ''मागे सरक तिच्या नजरेच्या टप्प्यात उभा राहूच नकोस. संतापाने ती काहीतरी आदळआपट करील. जखम झाली तर ती मात्र होईल वहिनींच्या शरीराला... ये... इकडे ये.''
तो नजरेआड झाला तसा नलिनीचा संतापाने थयथयाट झाला. ती सारखी घरभर नाचत होती, पुन्हा दाराशी येऊन थांबत होती.
तसूभर रुंदीची भस्मरेषाच तेवढी तिला घरात कोंडून ठेवत होती.
अच्युतसाठी ते काही क्षण आयुष्यातले सर्वांत वाईट गेले. आधीच बाहेर थंडी होती. त्यात ते दोघं नुसत्या बनियनमध्ये घाईघाईने बाहेर आले होते. आणि झालेल्या प्रसंगाने त्यांची शरीरं घामाने पार ओलीचिंब झाली होती. थंडीने आणि भीतीने शरीरावर शहाऱ्यामागून शहारे उठत होते. अच्युत गॅलरीचा कठडा हातांनी घट्ट धरून शरीरावर कसातरी ताबा मिळवण्याची खटपट करीत होता.
या शारीरिक कष्टात मनात अपराधीपणाची टोचं होती. त्याच्याच गबाळेपणाने हा प्रसंग त्यांच्यावर ओढवला होता. आणि त्याची नलिनी ! त्याच्यामुळेच ती बिचारी परत एकदा त्या भयानक अंधारकोठडीत ढकलली गेली होती... तिथली अवस्था त्याने स्वत:च अनुभवली होती... त्याचं मन तिच्यासाठी कळवळत होतं...
आणि सर्वांत वाईट भाग म्हणजे भगतांच्या परत येण्याची शाश्वती नव्हती. त्याचं घर त्याला बंद झालं होतं. त्याची प्रिय पत्नी एका अकल्पनीय जीवघेण्या सापळ्यात

अडकलो होतो आणि या संकटातून सुटण्याचा कोणताही मार्ग त्याला दिसत नव्हता. शारीरिक, मानसिक, सांसारिक दु:ख-शोक-वियोगाचा, निराशेचा हा नीचतम बिंदू होता.
पण एक म्हण आहे ना?
उष:कालापूर्वीची रात्रीची घटिका सर्वांत तमोमय असते.
''अच्युत ! अच्युत !'' गोपाळ त्याचा खांदा जोरजोराने हलवत होता.
''अच्युत ! ते बघ !'' भगत आले !''
त्या जादूच्या शब्दांनी अच्युत भानावर आला.
एका आलिशान गाडीतून भगत खाली उतरले होते. गाडीच्या ड्रायव्हरशी ते दोन शब्द बोलले, एक हात वर करून त्यांनी त्याचा निरोप घेतला आणि गाडी गेल्यावर ते मागे वळले.
त्यांची नजर वर गॅलरीकडे गेली.
त्या दोघांना गॅलरीत पाहताच ते जागच्या जागीच थांबले.
मग त्यांनी आधी तोंडावर बोट ठेवून त्यांना गप्प राहण्याची खूण केली. आणि मग त्याच हाताने खूण करून खाली यायला सांगितलं. ते दोघे तसेच अनवाणी पायांनी, अर्धवट कपड्यात खाली उतरून रस्त्यावर भगतांच्याजवळ आले. त्यांचे घामेजलेले, घाबरेघाबुरे चेहरे पाहताच भगत म्हणाले,
''काहीतरी घोटाळा झाला आहे खास ! काय झालं आहे?''
''भगत ! भगत ! ती... ती... माझी नलिनी -'' अच्युतचा आवाज एकदम गहिवरला. त्याने मान खाली घातली.
''गोपाळ? तू सांग बरं !''
''भगत, आम्ही वाड्यावरून परत येऊन घरात जायच्या बेतात होतो. अगदी नशिबाने मी मागे होतो, तुमचं भस्म आणि तुमच्या अगरबत्त्या माझ्या हातातच होत्या. भगत, दाराच्या आतच या नलिनीवहिनी दबा धरून बसल्या होत्या. अच्युतने आत पाय टाकताच त्याच्यावर त्यांनी झेप घेतली - मी वेड्यासारखा त्याच्या मदतीला जाणार होतो - पण ऐनवेळी सावधपणा सुचला. आतून अगदी वाईट, घाणरेडे आवाज येत होते; पण मी बाहेरच थांबलो, एक अगरबत्ती पेटवली आणि मग आत गेलो. त्या क्षणी सर्व शांतता झाली. वहिनी खाली पडल्या होत्या. काय त्यांचा अवतार ! छे छे ! पाहवत नव्हतं त्यांच्याकडे !''
''पण मग आता तुम्ही बाहेर कसे? खोलीत का नाही?''
''भगत, वहिनींच्या शरीरात जे काही आहे त्याच्या मदतीसाठी बाहेर काहीतरी होतं. अच्युत दहा-पंधरा मिनिटांपूर्वी अगरबत्ती लावत होता - तोच खिडकीच्या दाराचा कडाड् ! आवाज झाला - अगरबत्तीचं जळतं टोक हाताच्या हिसक्याने कपाटावर आपटलं - अगरबत्ती विझली. त्या क्षणी या वहिनी ताडदिशी उठून बसल्या. मी धावपळ करून अच्युतला कसातरी बाहेर आणला. दारापाशी त्याने मला जवळजवळ धरलंच -''
गोपाळने भगतांकडे पाठ केली. त्याच्या शर्टच्या पाठीच्या चिंध्या होऊन खाली लोंबत

होत्या. पाठीवर एक लांबट लाल चट्टा होता.
''मी खोलीत गेल्यागेल्या घरातल्या सर्व दारंखिडक्यांच्याआत त्या भस्माच्या रेघा मारलेल्या होत्या. केवळ त्यांच्यामुळेच त्या घरात कोंडल्या गेल्या आहेत. नाहीतर - नाहीतर -''
गोपाळच्या अंगावरून एक सरसरता शहारा गेला.
''अस्सं.'' भगत शेवटी म्हणाले. ''म्हणजे ती तिथून सुटली ती इथे आली तर ! ठीक आहे तर. म्हणजे नाटकाचा अखेरचा अंक आता व्हायचा आहे म्हणायचा ! हरकत नाही. तुम्ही आता वर चला. शेजाऱ्यांच्या घरी बसा. त्यांना आपण खूप त्रास दिला आहे. आशा करू या की ही शेवटचीच वेळ असेल.''
त्या दोघांच्या चेहऱ्याकडे पाहून ते जरासे हसले. त्यांनी दोघांच्या खांद्यावर हात टेकवला. भगतांच्या हातांचा साधा स्पर्शही बरोबर आशा, चेतना, उल्हास, धीर घेऊन येत होता. त्या स्पर्शाखाली त्याच्या शरीरातली मरगळ कमी झाली, मनावरची सावटं दूर झाली. जग वाटलं होतं तितकं काळंकुट्ट नव्हतं. आशेचा सोनेरी किरण दिसत होता.
त्यांच्या खांद्यावरून हात काढून घेतल्यानंतर मागे वळून न पाहता भगत जिन्याने सरळ वर गेले, गॅलरीतून अच्युतच्या घराच्या दारापर्यंत गेले, आणि दाराबाहेर क्षणभरही न थांबता त्यांनी आत पाय टाकला.
आत चवताळलेला पशू होता. आधीच समज पशूच्या पातळीची आणि आता जबड्यातलं भक्ष्य हिसकावलं गेल्याने जो पिसाटपणा आला होता त्यात उरलंसुरलं तारतम्य पार गेलेलं.
आत कोण आलं आहे हे न पाहताच तिने झेप घेतली.
एखाद्या पाषाणाच्या स्तंभावर आदळल्यासारखी ती तितक्याच जोराने मागे फेकली गेली. दारापाशी भगतांनी दिव्याच्या बटणासाठी अंदाजाने हात फिरवला. हाताला बटण लागताच दिवा लागला. दिवा लागला, पण पुढच्याच क्षणी फाड् ! आवाज होऊन त्याचा स्फोट झाला. खाली काचांचा सडा पडला. खोली पुन्हा अंधारात बुडाली.
एक सुस्कारा सोडून भगतांनी थैलीतून परत एकदा त्यांची मेणबत्ती काढली. ती हातात धरून दुसऱ्या हाताने काडेपेटी उघडून शिलगावली. अंधारात त्यांच्याभोवती जे काही घिरट्या घालत होतं, तिकडे त्यांचं कांडीमात्रही लक्ष नव्हतं. मेणबत्ती चांगली पेटल्यावर तिच्या प्रकाशात त्यांनी तिन्ही खोल्यांची पाहणी केली आणि मधल्या खोलीतलीच मध्यावरची मोकळी जागा निवडली. तिथे खाली जमिनीवर ती मेणबत्ती ठेवली. एक सोसाट्याचा वारा भिरभिरत खोलीत आला. खोलीतले कपडे, पडदे, कॅलेंडर त्या वाऱ्यावर फडफडत होती, हवेवर उडत होती; पण त्या मेणबत्तीची ज्योत संथ जळत होती. त्या संथ सोनेरी ज्योतीला तो पिसाट वारा स्पर्शही करू शकत नव्हता.
भगत खाली बसले. त्यांनी समोरच त्यांच्या भस्माची एक रचना मांडली. त्यांच्या लाल खोलीतल्या मखमली पडद्यांवरील एका आकृतीशी तिचं बरंच साम्य होतं. मग त्यांनी स्वत:चं आसन त्या वर्तुळात मांडलं. वर्तुळात प्रवेश करण्याचासुद्धा एक खास विधी होता - एक पदन्यास होता. एक हजारांशं सेकंदात एक असे सलग फोटो घेणारा एखादा कॅमेरा लावला असता तर त्या चित्रपटीत दिसलं असतं की मध्येच त्यांची

आकृती जराशी अस्पष्ट झाली, आणि मग परत स्पष्ट झाली. ज्यांना यात कुतूहल आहे त्यांच्यासाठी - त्यांनी अस्तित्वाच्या एका जराशा वेगळ्या पातळीत प्रवेश केला होता. काचेखाली असलेल्या चित्रावर काचेवर पडलेल्या शाईचा डाग पडत नाही, ओतलेल्या आम्लाचा दाह पोहोचत नाही, (काच मजबूत असली तर) घातलेल्या घावाने जखम होत नाही... असो. स्पष्टीकरणं शेवटी मर्यादितच राहतात.
त्यांनी वर्तुळात आपली बैठक मांडताच ती खोलीत आली होती. रिंगणाबाहेर एखाद्या पशूसारखी हातपायांवर बसली होती. तोंड पुढे करून त्यांना वाकुल्या दाखवत होती. दात विचकत होती. भगतांनी दोन्ही हातांची एक क्लिष्ट हालचाल केली. एखादा आवाज खूप अंतरावर पोहोचायला वेळ लागावा तसा त्या हालचालीचा परिणाम तिच्यापर्यंत पोहोचायला काही सेकंद जावे लागले. वर्मी प्रहार झाल्यासारखी ती उसळली... भगतांवर तिने हाताने एक जोराचा प्रहार केला.
पाहणाऱ्याला वाटलं असतं आपलीच नजरचूक होत आहे. भगत जिथे बसले होते तिथून तिच्या हाताचा सपका गेला; पण त्यांना त्या हाताचा स्पर्शही झाला नाही. वार जणू आरश्यातल्या एखाद्या प्रतिबिंबावरच झाला होता. भगत तसेच शांतपणे, पापणीही न हलवता बसले होते.
तिचा मात्र तोल गेला. एक पाय भस्म रेषेवर पडला मात्र -
वेडेवाकडे आवाज करीत, विव्हळत, हात पाय झाडत ती एकदम मागे सरली... खोलीभर थयथया नाचायला लागली...
हा क्षण भगतांनी निवडला.
त्यांच्यासमोरच्या रचनेत भगतांनी अगदी लहानसा बदल केला.
'त्यांच्या' अवकाशात प्रवेश करण्यासाठी त्यांनी एक अगदी अरुंद अशी वाट खुली केली होती. वाट केवळ खुली झाली नव्हती, त्या दिशेला एक खास 'उतार' निर्माण झाला होता. कागदाचा आकार बदलून त्यावरची पाऱ्याची गोळी जशी हवी तिकडे नेता येते तशीच त्यांनी एक 'उतारा' ची वाट खुली केली होती.
'त्या' अवकाशातील घडामोडींचा परिणाम 'इकडे' जाणवण्यासाठी काही अवधी जावा लागत होता; पण काही वेळाने तो परिणाम दिसायला लागला. साठवलेल्या पाण्याला तळाशी नळावाटे वाट करून दिली की हळूहळू एक आवर्त साकार होतं - खोलीत तशीच एक आवर्ताकार 'ओढ' निर्माण झाली होती... आणि विव्हळणाऱ्या, थयाथया नाचणाऱ्या, भिंतीवर हाताच्या मुठी आपटणाऱ्या त्या (नलिनीच्या देहात वावरणाऱ्या) 'तिच्या'वरही त्या आकर्षणाचा प्रभाव पडायला लागला.
कदाचित तिला ते जाणवलं असावं. अजूनही त्या भस्मरेषेच्या स्पर्शाची वेदना होतीच. स्वत:शी विव्हळत ती अगदी लांब, बाहेरच्या खोलीत कोपऱ्यात अंग चोरून बसली होती; पण भगतांनी स्थित केलेला आकर्षणाचा प्रवाह तिला खेचत होता. पायाचा नेट देऊन ती विरोध करत होती, खिडकीचे गज धरून ठेवत होती... पण कशाचीही मदत होत नव्हती... ती ओढ विरोध जुमानणारी नव्हती, अनिरुद्ध होती... 'ती' सावकाश सावकाश त्या भगतांच्या वर्तुळाकडे खेचली जात होती.
वर्तुळरेषेवर पोहोचल्यावर तिला आवाज फुटला. ''नको ! नको !'' ती म्हणत होती,

रडत होती... पण पुराच्या पाण्याबरोबर पालापाचोळा खेचला जावा तशी ती वर्तुळाच्या कडेवरून त्या मधल्या घडीतून भगतांच्या अवकाशात कोसळली...
त्या अवकाशाचे गुणधर्म वेगळे होते, नियम वेगळे होते. मुख्य म्हणजे ती तिथे नलिनीच्या परक्या, उपऱ्या देहाचा (स्वत:च्या संरक्षणासाठी, एक ढाल म्हणून) वापर करू शकत नव्हती. ते शरीर तिला सोडावं लागलं. नलिनी एका बाजूस ग्लानीत गेल्यासारखी पडून राहिली.
वर्तुळाबाहेरून खोलीतून पाहणाऱ्याला ती एक पाचसहा चौरसफुटांची जागा वाटली असती - पण ते दृश्य फसवं होतं. आतला विस्तार अफाट होता. द्रव्य हे अत्यंत संकुचित असं अवकाशाचंच एक रूप आहे अशी एक उपपत्र आहे. कदाचित या वेगळ्या मितीत द्रव्याच्या काही भागांचं अवकाशात परिवर्तन होत असेल... काहीही असो, तिथे स्थळाला मर्यादा नव्हती.
मानव जर तिथपर्यंत पोहोचू शकला असता तर तो त्याच्या मनात व शरीरात साठवलेल्या सर्व शक्यता प्रत्यक्षात आणू शकला असता - पण मानवाची प्रगती अर्ध्या वाटेवरच रोखली गेली... पंचेंद्रियाच्या आकर्षणाच्या जाळ्यातून फार फार थोडेच इथपर्यंत पोहोचत होते... पण तिथे त्यांच्या इच्छांना, विचारांना, शब्दांना तीक्ष्ण शस्त्रासारखी धार होती...
हा अवकाश भगतांनी संघर्षासाठी निवडला होता.
एका रम्य बगीच्यात, सुगंधी फुलांनी बहरलेल्या वृक्षाच्या शीतल छायेत भगत बसले होते. पायांखाली मखमलीसारखी मऊ हिरवळ होती. मंद वारा अंगावरून जात होता. पक्ष्यांचे मधुर आवाज येत होते.
एकाएकी पक्ष्यांची किलबिल थांबली. हवेतला गारवा गेला. गरम वाऱ्याची वावटळ आली. अंग भाजणारा गरम वारा. पायाखालचं गवत वाळून त्याच्या पिवळ्या काड्या झाल्या. झाडावरची पानं पिवळी पडली, उष्ण वाऱ्यावर उडून गेली... निष्प्राण पक्ष्यांची कलेवरं खाली पडत होती... निष्पर्ण वृक्षाच्या जाड फांदीवर गिधाड बसलं होतं. मृत पक्ष्यांच्या शरीरांची त्वचा उकलत होती, आतून पांढुरक्या आळ्या वळवळत बाहेर येत होत्या.
तिच्या येण्याच्या या खुणा होत्या.
ती आली. काळ्या जोगिणीच्या रूपात - वेशात - आकारात आली.
हे मृत, सडकं, दुर्गंधयुक्त जग तिच्याच मनाचं प्रतिबिंब होतं. तिच्या जगात विरलेली स्वप्नं होती; आयुष्याने केलेल्या फसगती होत्या; मायावी मोहामागे लागून सर्वस्व हरवलेल्यांचे आक्रोश होते; उदात्त, आशादायी, उत्साही अशांना तिथे प्रवेश नव्हता. ते निराशेचं, व्याकुळतेचं, वेदनांचं काळं कहारी जग होतं. देवमार्ग सोडलेल्यांचा शेवट तिथे होत होता.

□□□

9

तेव्हा शेवटी ते दोघं समोरासमोर आले होते. एकदा भगतांनी तिला पश्चात्तापाची, प्रायाश्चित्तानंतर पुण्यामार्गावर परत येण्याची संधी दिली होती - ती तिने झिडकारली होती.
तेव्हा मग आता संघर्षाला पर्यायच नव्हता.
असे कितीतरी संघर्ष पूर्वी झाले होते. त्यांच्या आयुष्यात आणि त्यांच्या आधीच्या भगतांच्या आयुष्यात. आता या खास अवकाशात त्यांना त्यांच्या पूर्वासुरीचे सर्व ज्ञान व अनुभव उपलब्ध होते.
मानव आपलं अल्प आयुष्य समाधानाने आणि गर्वाने जगत असतो. आपल्या कर्तृत्वाची त्याला मोठी प्रौढी असते.
त्याला कोठे माहीत असतं की त्याच्या लहानशा जगाचा चक्काचूर करण्यासाठी, त्याचं अमूल्य मन गुलामीत डांबण्यासाठी अनेक दुष्ट अमानवी शक्ती सतत धडपडत असतात.
आणि भगतांसारख्या काही सिद्धपुरूषांनी मानवाच्या या नाजूक, क्षणभंगुर जगाभोवती संरक्षणाची साखळी सतत अखंड ठेवली नसती तर मानवी संस्कृती पाशवी अनाचारात केव्हाच बुडून गेली असती... अशा या संरक्षक साखळीमधले भगत हेही एक अग्रदूत होते.
त्यांच्यापैकी पूर्वी एकाची या काळ्या जोगिणीशी गाठ पडली होती आणि त्यांना माघार घ्यावी लागत होती. आधीच्याच धारदार शस्त्राला या जुन्या आठवणीने आणखी ताव चढला होता.
आघात झाला तो अचानकपणे आला. त्या वज्रमुठीखाली एखाद्या प्रचंड पाषाणाचाही चक्काचूर झाला असता. अर्थात तो त्यांच्यावरून सहज ओघळून गेला; पण तिने असा ओबड़धोबड मार्ग वापरावा ही नवलाची गोष्ट होती - तेव्हा ही केवळ हूलच असली पाहिजे... खरा हल्ला दुसऱ्याच मार्गाने होणार होता... तेवढ्यात त्यांच्या आसपासची जमीन खाली पोटात स्फोट झाल्यासारखी उफाळून वर आली...
जमिनीच्या गर्भातून लक्षावेधी विषारी कीटक लाटेसारखे बाहेर आले... मुंगीचा चिवटपणा, विंचवाचा विखार आणि सापाची शीघ्र गती... तिच्या विकृत कल्पनेत निर्माण झालेल्या या अनैसर्गिक कीटकांत या सर्वांचा मिलाफ होता... त्यांच्या शरीरांवर चकचकत्या काळ्या रंगाची कठीण कवचं होती... पैलू पैलूंची भिंगं असलेले मोठमोठे डोळे होते... पुढे विषारी सोंडा होत्या... त्यांच्या लाखांच्या संख्येने ते आले... भगतांच्या अंगाभोवतीच्या शालीत ते गडप झाले...
आसपासचा देखावा बदलत होता. परिसराला एक ओळखीचा आकार येत होता. ते भग्न मंदिर. त्यामागचा पडका वाडा. ते पोर्च... त्यांनी निर्माण केलेल्या अवकाशावर ती आपला ठसा उठवू पाहत होती. भगत शांतपणे त्यांचा क्षण येण्याची वाट पाहत होते. पोर्चला, भिंतीना, वरच्या मजल्याला क्षणाक्षणाला घनता, स्थिरता, सत्यता येत होती. वाडा जवळजवळ पूर्णावस्थेत उभा राहिला - आणि त्याच क्षणी आकाशातून कडाड् !

आवाज करीत वीज कोसळली. केवळ एकच नाही. डोळे दिपवणाऱ्या झगझगीत निळ्यापांढऱ्या लवलवत्या दाहक रेषांच्या आसूडांखाली तो वाडा दुभंगला, कोसळला, त्याच्या भिंतींचा चक्काचूर झाला... लोखंड वितळलं, लाकडं करपून गेली... उरला तो फक्त वर चढणारा धूर...
पण भगतांना किंचितसा अशक्तपणा जाणवत होता. रात्रीच्या पूर्वार्धात एक झटापट झालीच होती. त्यानंतर आता हा समराचा प्रसंग. त्यांना हा संघर्ष लांबवायचा नव्हता. एकच, पण निर्णायक घाव घालायचा होता.
फक्त काही अवधी हवा होता. त्यासाठी एक क्रिया होती. ती ते एकदाच वापरू शकत होते. ती क्रिया अनेकांनी अनेक मार्गांनी सिद्ध केली होती. भगतांनी आपलं आसन बदललं. सर्व शरीर आत आक्रसलं गेलं. बाह्यजगाला कमीत कमी पृष्ठाभाग उघडा ठेवला. आणि मग सर्व जोर एकवटून त्या शक्तिशब्दाचा उच्चार केला...
त्यांच्या शरीरापासून सुरू झालेली स्तंभनाची लाट त्या सर्व अवकाशात पसरत गेली. ध्वनी, हालचाल सर्व थांबलं. एवढंच नाही, प्रत्यक्ष कालप्रवाहही रोखला गेला. स्तंभनाची लाट अवकाशसीमेवर आपटून तिचे कण खाली पडत राहतील, तोपर्यंत ही संपूर्ण निश्चलता होती... तोपर्यंत त्यांना अवधी होता...
भगतांनी तो पडका वाडा नजरेसमोर आणला. ती शक्ती त्या काळ्या जोगिणीच्याच स्वरूपात का वावरते? इतर सर्व नकली आकार तिने टाकले होते; पण हा आकार टाकला नव्हता किंवा तिला टाकता आला नव्हता. का? कदाचित तेथेच कोठेतरी तिचं वर्मस्थान असेल.
त्यांनी त्या वाड्याची पाहणी केली होती. तेव्हा तिथलं सर्व काही आपल्या स्मृतीत साठवून ठेवलं होतं. आता त्यांनी ते पोर्च, त्या खोल्या, ते तळघर, ती विहीर, सर्वकाही सावकाश सावकाश नजरेसमोररून सरकारवलं. तळघराच्या एका कोपऱ्यावरून गेलेली नजर परत तिथे आली. त्या काळ्या घडीव फरशीखाली काहीतरी असल्याची त्यांना जाणीव झाली होती.
त्यांच्या तीक्ष्ण धारदार नजरेखाली तो घन दगड पारदर्शक झाला. त्या जड पाषाणाखाली एक सांगाडा होता. सांगाड्याच्या भोवती जीर्ण वस्त्राचे अवशेष होते. त्यांच्या नजरेच्या प्रभावाखाली त्या सांगाड्यावर मांस - सधिर - अस्थी - त्वचा यांचं आवरण आलं... खून करून तिथे गाडून टाकलेल्या एका सुंदर, तरुण स्त्रीचा तो देह होता... एखाद्या सर्चलाइटसारखा त्यांच्या विचारांचा झोत त्या मृतदेहाच्या मस्तकावर स्थिरावला... त्या मृत मेंदूत चित्रं होती...
वाड्याच्या धनवान मालकाने मंदिराच्या मठाधिपतीस लाच देऊन विकत घेतला होता. आणि संध्याकाळी मठाधिपतीच्या सेवेसाठी आलेल्या त्या तरुण जोगिणीस हस्तकांकरवी पळवून आणलं होतं... त्याच्या रंगमहालात ती त्याच्या राक्षसी वासनांना बळी पडली होती... तिचा संताप, विरोध, घृणा आणि तिरस्कार असह्य होऊन शेवटी त्याने तिचा प्राण घेतला होता... आपल्या या अधम कृत्याचा पुरावा तळघरात गाडून टाकला होता; पण तिचा अतृप्त सुडासाठी तळमळणारा आत्मा त्याला शांती लाभू देणार नव्हता. मातीत पुरल्याने डागाळलेल्या विटक्या काळ्या कपड्यात लपटेलेला,

सुडाचौ लाल जळतौ ज्योत डोळ्यात वागवणारा तिचा आकार आधौ तळघरात, मग सर्व वाड्यात संचार करू लागला. सर्व वाडाच तिने झपाटून टाकला. नोकरचाकर पळून गेले. कुटुंबातल्या माणसांनी पाठ फिरवली. साऱ्या घराण्याची वाताहात झाली.
अत्याचार झाला होता तो क्षणिक वासनेच्या आहारी गेल्याने. मालक स्वभावाने नीच किंवा क्रुरकर्मा नव्हता. त्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला होता. लौकिक अर्थाने त्याने प्रायश्चित्त स्वीकारलं होतं - पण खरा पश्चात्ताप मनात होता. त्या प्रांजळ, प्रामाणिक पश्चात्तापाने ती जोगीण शांत झाली होती.
ती जोगीण शांत झाली होती !
भगतांना हवं होतं ते सापडलं होतं.
जगावरची बंधनं गेली होती. थांबलेला कालचक्र फिरायला लागलं. भगताच्या हातात त्यांना हवं ते अमोघ शस्त्र आलं होतं. त्यांनी आता आपलं आसन मोडलं, आणि ते ताठ उभे राहिले. इतका वेळ दूर दूर राहणारी ती आता त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली. एक हात वर करून भगत म्हणाले,
‘‘तुला आता ही शेवटची संधी आहे. आताच्या आता, या क्षणी, देह सोडून दे. फक्त तेवढंच तुला वाचवू शकेल.’’
त्यांची कल्पनाच खरी ठरली. तो मतिहीन पशू आपल्याच घमेंडीत राहिला. आघातासाठी तिने पंजे उगारलेसुद्धा.
‘‘थांब !’’ भगत गरजले. आपल्या थैलीतून त्यांनी ती सुताची लड काढली. त्या सुताने तो जीर्णविटक्या मातीच्या डागांचा काळ्या वस्त्रातला देह वेठिला. भगत बोलेले तेव्हा त्यांच्या आवाजात विलक्षण अधिकार होता, हुकमत होती.
‘‘या देहाचा वापर करून तू तुझी मर्यादा ओलांडली आहेस. आमच्या सीमेत अतिक्रमण केलं आहेस. हा देह वापरण्याचा तुला अधिकार नव्हता. त्या जोगिणीने तिच्यावर अत्याचार करणाऱ्या अपराध्याला क्षमा केली होती. तिचा मृतदेह त्या वाड्याच्या तळघरात विसावायला हवा होता. त्याचा तू अनाधिकाराने वापर केला आहेस. त्या देहाची विटंबना केली आहेस. तो देह मी आता ताब्यात घेतला आहे. तुला तो देह सोडून देण्याचा मी इशारा दिला होता - तो तू मानला नाहीस - आता त्या देहाबरोबर तूही माझ्या ताब्यात आलेली आहेस... त्या देहाचा एक कणही वापरण्यास मी या क्षणापासून तुला बंदी करीत आहे...’’
त्या देहात जे क्रूर अमानवी अस्तित्व वावरतं होतं त्याचा संताप झाला असेल - पण आता त्या संतापाचं किंवा कोणत्याच भावनेचं प्रदर्शन करण्यासाठीसुद्धा तो देह त्याला वापरता येत नव्हता. त्या देहावरचं त्याचं नियंत्रण गेलं होतं. तो देह आता भगतांच्या नियंत्रणाखाली होता. आणि या बंदिवासाचा शेवट काय होणार, हेही त्याला पुरेपूर माहीत होतं.
त्याच गोठलेल्या पवित्र्यात ती काळी जोगीण उभी होती.
भगतांनी थैलीतून निळसर रंगाच्या जाड काचेची एक लहानशी कुपी काढली. त्याच रंगाच्या काचेचं वर बूच होतं, ते काढलं. ती कुपी त्यांनी जोगिणीच्या तोंडापाशी धरली. मग त्यांनी काही खास शब्दाच्या उच्चारास सुरुवात केली.

एकदा... दोनदा... तीनदा...
जोगिणीच्या शरीरात वास करणारं ते आता असाहाय्य झालं होतं. त्या शरीराचा कोणताही आधार त्याला नव्हता. वरून येणाऱ्या त्या हाकेला विरोधही अशक्य होता. शेवटी ती हाक त्याला मानावीच लागली.
जोगिणीच्या उघड्या तोंडातून एकाएकी एक धगधगत्या लाल रंगाची ठिणगी त्या कुपीत पडली. कुपी मागे घेऊन भगतांनी ती सीलबंद केली आणि आपल्या थैलीत ठेवून दिली.
ती लाल ठिणगी म्हणजे भगतांच्या त्या खास अवकाशातलं त्याचं संक्षेप पावलेलं रूप होतं. त्याच्या स्वत:च्या अवकाशात ते एखाद्या वणव्यासारखं आसमंत व्यापून राहिलं असतं - सगळ्याचा स्वाहाकार केला असता - पण इथे नाही. स्वत:च्या मूर्खपणामुळेच ते या पिंजऱ्यात अडकलं होतं. शेवटी तेही आद्यशक्तीचाच अंश होतं, अविनाशी होतं; पण या अवकाशाच्या शृंखला तोडणं त्याच्या शक्तीबाहेरचं होतं. हा अवकाश त्याला एखाद्या अवाढव्य निळ्या घुमटासारखां दिसत होता. आपल्या सोयीची एखादी रचना करण्याचं स्वातंत्र्यही त्याला नव्हतं. नाहीतर आपल्या अतिदीर्घ आयुष्यातील काही काही मनोरंजक, क्षणिक समाधान देणारे देखावे त्याने निर्माण केले असते - त्या अघोरी नाटकांतून राग, लोभ, द्वेष, प्रेम, मत्सर, भीती, तिरस्कार, घृणा इत्यादी भावनांचे आविष्कार करणारे मर्त्य जीव मात्र त्या त्या प्रसंगातून पुन्हा पुन्हा गेले असते - याच्या क्षणभराच्या करमणुकीसाठी! पण तेही आता शक्य नव्हतं... आता फक्त कालक्रमणा करीत राहायचं.
आणि एक (पुसटशी) आशा करीत राहायचं.
एक पुसटशी आशा करीत राहायचं की कधीतरी एखाद्या अशुभ योगायोगाने भगतांच्या अतिखाजगी संग्रहातली ही कुपी चोरीस जाईल किंवा एखाद्या नैसर्गिक अपघाताने उघड्याववर येईल... आणि एखादा मूर्ख लोभी माणूस धनाच्या लोभाने कुपीचं टोपण उघडील...
मग त्याचे दिवस ! मग त्याची सत्ता ! मग त्याचे खेळ !
पण तोपर्यंत... तोपर्यंत वाट पाहत राहणे.
त्याने आपल्या जाणिवा घड्याघड्यांनी आत घेतल्या. द्रव्य कठीण झालं. त्याचं स्वरूप आता एखाद्या माणकाच्या लाल स्फटिकासारखं होतं. ती ठिणगी पार मालवली होती.
शिशीच्या तळाशी तो माणिक पडला होता.
भगतही आता त्यांच्या शक्तीच्या मर्यादेपाशी पोहोचले होते; पण अजून एक महत्त्वाचं काम बाकी होतं. आणि ते तितक्याच प्रमाणशीरपणे व्हायला हवं होतं. त्यानी स्वत:भोवती निर्माण केलेला खास अवकाश खाली घ्यायचा होता. रोजच्या जगाच्या एका सहा-सात फुटांच्या गोलाकार जागेत हा अवाढव्य अवकाश अवतीर्ण झाला होता. त्याचा एकाएकी नाश झाला तर इम्पोल्जन (उलटा स्फोट) होण्याची शक्यता होती. आसपासच्या भागात त्याचा परिणाम एखाद्या भूकंपासारखा जाणवला असता.
उंच इमारत उतरवताना काही एका क्रमाने वरच्या मजल्याचे धीरे काढून घेतले जातात तसे काही एका विशिष्ट क्रमाने भगतांनी त्या अवकाशाचे ताण काढून घेतले... तो स्वत:तच कोसळून नाश पावला. त्याच क्षणी तिथे पडलेल्या काळ्या जोगिणीचं

अवमानेत, अवहेलना झालेलं, मृत शरीरही नाहीसं झालं. आता तरी तिला खरी शांती लाभू दे, भगत मनातल्या मनात प्रार्थना करीत होते.
आता ते खोलीत मोकळेपणाने वावरू शकत होते.
नलिनी त्याच त्या ग्लानीच्या अवस्थेतून निजून होती.
भगतांनी आपल्याजवळची एक लहानशी सोनेरी गोळी तिच्या ओठांवर ठेवली. क्षणार्धात नलिनीचे डोळे उघडले.
''नलिनी, एकच प्रश्न विचारतो, तुझा यात संबंध कसा आला?''
''गोपाळ भाऊजी यायच्या आधी, आम्ही दोघं घरात एकटेच असताना, मी यांना सतत हाका मारल्या होत्या - अच्युत ! जागे व्हा ! मी नलिनी आहे ! मध्येच त्यांचे डोळे उघडले होते. त्यांची लाल जळजळती नजर माझ्यावरून गेली होती. एखादी भट्टी उघडल्यासारखी आंच जाणवली होती... मला वाटतं एक-दोन सेकंद भानच हरपलं होतं...''
''तोच तो क्षण. आता सर्व धोका टळला आहे. आता तू शांत झोपणार आहेस. अच्युतला मुंबईहून इथे आणल्यापासून ते गोपाळ तुझ्या घरी हजर होईपर्यंतचे सर्व प्रसंग तू पार विसरणार आहेस. तसेच गेल्या चोवीस तासांत तुला आलेले सर्व चमत्कारिक अनुभव तू विसरणार आहेस. तुला त्यांची कधीही आठवण येणार नाही. आता चल - तू झोप.''
तिला त्यांनी आधार देऊन उठवली, कॉटपाशी आणली, कॉटवर झोपवली. तिच्या डोळ्यातली भीती सावकाश सावकाश ओसरली.
भगतांनी तिच्या कपाळावर एक हात टेकवला.
पहाता पहाता तिचा चेहरा निवळला. ती गाढ झोपेत गेली.

□□□

10

भगत जेव्हा अच्युतच्या दारापाशी आले तेव्हा पहाटेचा मोतिया प्रकाश आकाशातून सर्वत्र पसरत होता. ते गॅलरीत आले तोच शेजारच्या घरातून अच्युत आणि गोपाळ घाईघाईने त्यांच्याजवळ आले. त्यांना रात्री क्षणभराचीही झोप लागलेली दिसत नव्हती. चेहरे भयभीत, चिंताक्रांत होते. ते दोघे काही बोलायच्या आतच त्यांनी दोघांच्या खांद्यावर हात ठेवले आणि ते म्हणाले,

''अच्युत, गोपाळ, इथल्या सर्व प्रकारचा आणि अच्युतला झालेल्या विकाराचा मी पूर्ण बंदोबस्त केलेला आहे. आता पुन्हा तुमच्यापैकी कोणालाही कसलाही त्रास देणार नाही. गोपाळ, तू त्या परांड्यांच्याकडे जाऊन त्यांना भेट - तेही आता अगदी संपूर्णपणे पूर्ववत झालेले असतील.''

''पण भगत -'' गोपाळ काहीतरी विचारणार होता.

''थांब.'' ते हसत म्हणाले, ''आताची वेळ स्पष्टीकरणाची नाही. आधी तुम्ही आत जा. नलिनी गाढ झोपलेली आहे. तिला आजचा सर्व दिवस झोपू द्यात. संध्याकाळी तिला जाग येईल तेव्हा ती पूर्ववत झालेली असेल. मग एक-दोन दिवसात केव्हातरी तुम्ही तिघंही मठीवर या. तिथे मी तुम्हाला सर्व काही सविस्तर सांगेन. तुमच्या कोणत्याही आणि कितीही शंका असल्या तरी त्या साऱ्यांचं निरसन करीन. जाता जाता एकच गोष्ट ध्यानात ठेवा - नलिनी फार भयंकर अनुभवातून गेलेली आहे. मी तिला त्या सर्व प्रसंगांचं पूर्ण विस्मरण दिलेलं आहे. तिला काहीही विचारू नका. तिला काहीही आठवणार नाही. ती जर माझ्याकडे तुमच्याबरोबर आली तर माझ्या पद्धतीने मी तिला सर्व काही सांगेन. आता जा - आणि सुखाने राहा.''

ते दोघं यावर काय बोलणार? भगत जाण्यासाठी वळले तेव्हा ते दोघं त्यांच्या मागोमाग वळले. जिना उतरताच गोपाळ म्हणाला,

''भगत थांबा - मी टॅक्सी आणतो -''

''नको.''

त्या दोघांनी त्यांना हात जोडून नमस्कार केला. आणि मग ते भगतांच्या कृश, किंचित वाकलेल्या, झपाझप चाललेल्या पाठमोऱ्या आकृतीकडे नुसते पाहतच उभे राहीले.

□□□

11

सूर्योदयाच्या घटकेस भगत मठीवर पोचले. थैलीतली निळी कुपी त्यांनी हातात घेतली. स्नानगृहात गेल्यावरही त्यांनी ती आपल्या नजरेआड होऊ दिली नव्हती. आणि मग ओल्या वस्त्रानिशी ते त्यांच्या त्या खास खोलीत आले आणि एका बसक्या कपाटातल्या खालच्या खान्यात ती कुपी ठेवली तेव्हाच त्यांना हायसं वाटलं. (त्या खान्यात तशाच आणखीही काही कुप्या होत्या.)
मग त्यांनी सोफ्यावरची आपली नेहमीची जागा घेतली.
समोरच्या रचनेवर नजर खिळवली, आणि मगच इतका वेळ केवळ जबर इच्छाशक्तीने शरीरातला दिलेली उभारी त्यांनी ओसरू दिली. शरीरावर आणि मनावर त्यांनी अवास्तव मागण्या केल्या होत्या.
त्यांचं शरीरावरचं आणि मनावरचं नियंत्रण या आधी सुटलं असतं, तर एखादं फेफरं आलेल्या अभाग्यासारखे हातपाय झाडत ते कोठेतरी कोसळले असते. शेवटी मानवी शरीर आणि मन यांच्या धारणशक्तीला (ती कितीही घडवलेली असली तरीही) काही मर्यादा आहेच !
आता ते सुखरूप होते, योग्य स्थानी होते.
त्यांनी डोळे मिटले. बाह्य जगाची जाणीव संपूर्ण मालवून टाकली.
कोचावर त्यांचं शरीर वेड्यावाकड्या अवस्थेत कोसळलं.
पण समोरच्या पडद्यामागे एक फुगवटा आला होता.
जणू काही त्या पडद्यामागे कोणीतरी उभंच होतं. आणि पडद्यामागचं ते खोलीभर फिरायला लागलं तसा पडद्यामागचा फुगवटा भिंतीला लागून खोलीभर फिरायला लागला.
संपूर्ण शांततेत पडद्याची किणकिण किती मोठी वाटत होती ! पडदा सावकाश दूर झाला. संपूर्ण शुभ्रवस्त्रात लपेटलेली एक कृश आकृती पडद्यामागून बाहेर आली.
निश्चल पडलेल्या भगतांच्या मस्तकावर त्या आकृतीने आपला अत्यंत कृश, जवळजवळ पारदर्शक हात काही सेकंद टेकवला.
आणि मग आली तशीच ती आकृती पडद्यामागे गेली.
पडद्यामागचा फुगवटा हळूहळू ओसरला.
इतका वेळ थांबलेली घड्याळांची टकटक आता सुरू झाली.
भगतांनी डोळे उघडले.
खोलीत अतिशय मंद सुवास पसरला होता.
त्यांचा सर्व थकवा पूर्णपणे गेला होता.
शरीरात, मनात पूर्वीसारखाच उत्साह, तरतरी होती.
आपल्यामागे त्या खोलीचं दार बंद करून भगत बाहेरच्या दिवाणखान्यात आले.
सूर्याच्या तिरकस सोनेरी किरणाची तिरीप खोलीत आली होती. सर्व खोली प्रसन्न प्रकाशात उजळून निघाली होती.
पुन्हा संघर्षाची, संकटांची सावटं येणारच होती. दर वेळीच ते इतके भाग्यवान ठरतीलच

याचीही शाश्वती नव्हती.
पण ते सर्व भविष्यात होतं. आताचा प्रसन्न, सुगंधित, सुवर्णाच्या झालरीचा क्षण पूर्णतेने उपभोग घेण्यासाठी होता. अशा या सुखाच्या अमृताच्या देणगीबद्दल त्यांनी त्यांच्या दैवताचे मनोमन शतश: आभार मानले.

□□□